रा.क्र.- १८८८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय कादंबरी
सं. नं. ११७५५

# चितूरगडचा वेढा.

हें पुस्तक

नागेशराव विनायक बापट,

यांनीं लिहिलें.

" तालमें ताल भोपाल, और सब तलैया है. "
" गडमें गड चितोरगड, और सब गडैया है. "

किंमत ७ आणे.

म. ग्रं. सं. ठाणें

# चितूरगडचा वेढा.

हें पुस्तक

नागेशराव विनायक बापट, वांईकर,

'श्रीमंत पहिले बाजीरावसाहेब पेशवे,' 'छत्रपति संभाजी महाराज,' 'दादोजी कोंडदेव,' 'पानपतची मोहीम,' इ. इ. ग्रंथांचे कर्ते

यांनीं लिहिलें.

तें

मुंबई येथें

जावजी दादाजी यांच्या

'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

---

आवृत्ती पहिली.

---

इ. स. १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदून सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपल्या स्वाधीन ठेविले आहेत.

---

इ. स. १८९९.

---

किंमत ७ आणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

श्रीमंत

## मातुःश्री कमासाहेब शिर्के, बडोदें,

यांस,

**परवानगीनें**

हें पुस्तक कृतज्ञतापूर्वक सन्मान

बुद्धीनें

**ग्रंथकर्ते यांनीं समर्पण केलें**

असे.

# प्रस्तावना.

चितूरगड हा किल्ला रजपुतान्यांत उदेपूर संस्थानच्या ताब्यांत आहे. तें रजपुताना—माळवा रेलवेचें एक स्टेशन आहे. तेथून उदेपुरास एक आगगाडीचा फांटा गेला आहे. हा किल्ला अजमीरच्या दक्षिणेस ११५ मैलांवर आहे. तो विंध्याद्रिपर्वताचाच एक भाग असून जमिनीपासून सुमारें ५०० फूट उंच आहे. त्याचा दक्षिणोत्तर विस्तार सुमारें साडेतीन मैल आहे. हल्लीं तो गड पडक्या स्थितींत असून त्याची तटबंदी अगदीं जीर्ण झाली आहे. तरी तटबंदीवर जुन्या तोफा आहेत त्या पाहिल्या ह्मणजे तो गड शत्रूवर तुटून पडण्याच्या तयारीनेंच उभा आहे कीं काय, किंवा कोणी भीमरूपी बलाढ्य मल्ल दंड ठोकून मांडीवर थाप मारून मान व छाती पुढें झुकती ठेवून कुस्ती करण्यासाठीं तयार झाला आहे कीं काय, असा भास होतो. गडाचा 'रामपोळ' या नांवाचा थोरला दरवाजा जमिनीपासून सुमारें ३५० फूट उंचीवर आहे. पूर्वीं रजपूत लोकांनीं मुसलमानांच्या छलापासून मुक्त होण्याकरितां या गडावरून पुष्कळ लढाया मारल्या होत्या. लुखमूशी या नांवाचा एक रजपूत राजा या ठिकाणीं होऊन गेला. त्याच्या कारकीर्दीत इ० सन १३०३ सालीं अल्लाउद्दिन खिलजी यानें किल्ल्यावर हल्ला करून तो उडवून दिल्हा. त्या

वेळेस हजारों रजपूत स्त्रियांनीं आपल्या पुरातन चालीप्रमाणें जोहार करून अग्निकाष्ठें भक्षण केलीं. किल्ल्यांतील तळघरांत अग्नि पेटवून त्यांत उड्या टाकून त्यांनीं जीव दिले, असें इतिहास व दंतकथा सांगतात. राण्याची चुलती राणी पद्मिनी या नांवाची होती, ती अत्यंत रूपवती होती. तिला बलात्कारानें हस्तगत करण्यासाठींच अल्लाउद्दिनानें चितूरावर स्वारी करून किल्ल्याला वेढा देऊन बसला होता. तो किल्ला अभेद्य आहे अशी त्याची ख्याति होती. तो बनास नदीच्या किनाऱ्यावर उंच व लांबट अशा एका पहाडावर असून त्याचा पडकोट त्या पहाडाच्या कडेकडेवर बांधलेला आहे. 'टाड्चें राजस्तान' या पुस्तकांत किल्ल्याचा नकाशा दिला आहे. त्या आधारानें एक वुड्कट् तयार करवून त्याचें चित्रही या पुस्तकाच्या आरंभीं जोडलें आहे. त्यांत एक विजयश्रीद्योतक स्तंभ आहे. त्याचें शिल्पपाटव फारच चांगलें आहे. तो फार विशाल व सुरेख असून त्याची उंची १२० फूट आहे. त्याचें वर्णन टाड्नें फार सुंदर केलें आहे. गडावर सुंदर सुंदर जुनीं देवालयें, मोठमोठे तलाव व पडके राजवाडे अद्यापि पाहण्यासारखे आहेत.

पुढें इ० सन १५६७ सालीं अकबरशाहानें चितूरास वेढा दिला. तो हिंदुस्तानांत मोंगल घराण्याचें राज्य मजबूत पायावर स्थापन करणारा बादशाहा होऊन गेला. त्यानें एक जगविख्यात व प्रचंड राजघराणें स्थापन केलें. तो एक उत्तम राज्यव्यवस्थापक व राज्यसूत्रचालक राजा होऊन गेला. त्याच्या राज्यव्यवस्थेच्या धोरणानेंच हल्लींचें सार्वभौम इंग्रजराष्ट्रही हिंदुस्तानांत राज्य करीत आहे. चितूराला वेढा पडला त्या वेळेस मेवाडचा राणा उदेसिंग हा चितूरचा राजा होता. तो अकबरशाहाच्या भयानें चितूरगड सोडून आपल्या मुलांमाणसांसुद्धां राजपिंपळ्याच्या

जंगलांत पळून गेला. मागें त्या गडावरचा किल्लेदार बसंतसिंग व त्याचे अनुयायी रजपूत शिपाई यांनीं व त्यांच्या स्त्रियांनीं अकबरशाहाबरोबर मोठा संग्राम केला. शेवटीं जोहार घेऊन त्यांनीं आपले प्राण दिले; पण, शत्रूला शरण गेले नाहींत. या जगांत सुखानें संसारयात्रा करण्यास स्त्री व पुरुष यांना परस्परांची जरूर असते. एक नसलें तर दुसरें संसारसुखाला मुकतें. चितूरगडावर जशीं कित्येक सुंदर सुंदर सरोवरें होतीं, त्याचप्रमाणें तेथें रजपूत स्त्रिया हीं एक प्रकारचीं प्रेमजलानें तुडुंब भरलेलीं मानससरोवरें, आणि तेथील पुरुष हे त्या सरोवरांवर विहार करणारे राजहंसपक्षी, होत. मानससरोवरें एकाएकीं आटून गेलीं, किंवा नाहींशीं झालीं, तर राजहंसांचा तेथें काय उपयोग ? आणि राजहंस ब्रह्मलोकास निघून गेले तर, त्या सरोवरांची शोभा पाहून त्यांच्या प्रेमोदकांत यथेच्छ क्रीडा करावी कोणीं ? तात्पर्य, राजहंस आणि मानससरोवरें हीं परस्परावलंबी आहेत. एक नसलें तर दुसऱ्याची शोभा नाहीं. असो, चितूरगड अकबरशाहानें सर केल्यावर पुढें राणा उमरावसिंह यानें डोंगरी प्रदेशांत उदेपूर या नांवाचें एक टोलेजंग शहर वसविलें. तेंच हल्लीं उदेपूर राज्याचें राजधानीशहर आहे. एका इंग्रजी पुस्तकाच्या आधारानें ही चितूरगडच्या वेढ्याची सविस्तर हकिकत लिहिली आहे. हींत मुख्यत्वानें किल्लेदाराची स्त्री गुलाबबाई हिचा मानी स्वभाव, धाडस, स्वधर्मश्रद्धा व स्वजात्याभिमान, वगैरे गुण व्यक्त होतात. ही एक त्या वेळीं इतिहासप्रसिद्ध नरसिंगपूरची शूर दुर्गावती राणी, किंवा अलीकडची झांशीवाली लक्ष्मीबाई राणी होऊन गेली, असें ह्मटलें तरी चालेल. अकबरशाहासारख्या तेजस्वी पुरुषाला तिनें बिलकुल दाद दिली नाहीं, किंवा जुमानलें नाहीं. तिनें आपल्याला चितेंत जाळून घेतलें, आपल्या देशभगिनींना जाळून टाकलें, फार तर काय प्रत्यक्ष पोट-

च्या पोरींनाही तीच वाट दाखविली; पण, शेवटपर्यंत ती शत्रूला शरण गेली नाहीं इतकेंच नव्हे, तर सूड उगविण्यासाठीं तिनें आपल्या गानवादनपटुत्वानें व शौर्यानें अकबरशाहाला मोहित करून टाकलें; ह्मणून या भूगंधर्वतनयेचें चरित्र बरेंच मोहक व हृदयंगम झालें आहे. 'येरे येरे दिवसा, आणि भररे पोटा' अशी ही पड घेऊन राहणारी उदरपरायण स्त्री नव्हती. 'रागीट मनुष्याचें प्रभुत्व अग्नींत टाकलेल्या मीठासारखें क्षणांत नाहींसें होतें.' असें एका ग्रंथकारानें ह्मटलें आहे, तें हिला लागू पडतें. वास्तविक पाहिलें असतां, अकबरशाहाची योग्यता व हिची योग्यता यांमध्यें जमीनअस्मानाचें अंतर होतें. काजव्यानें ह्मणावें, मी आपल्या उजेडानें सूर्याला दिपवीन; मुंगीनें ह्मणावें, मी पृथ्वी फोडून पाताळांत प्रवेश करीन; किंवा टिटवीनें ह्मणावें, मी समुद्र शोषून टाकीन; अशा प्रकारचा तिचा तो बालिश प्रयत्न होता, तरी दगडापेक्षांही कठिण बनून भीषण संग्रामभूमीवर उभी राहून तिनें वीरश्रीच्या एका प्रसिद्ध लालाबरोबर तरवारीचे दोन हात केले, हें काय थोडें केलें ? तिचें देवाजवळ मागणेंच होतें कीं, 'देवा, माझे प्राण गेले तर जावोत; पण, माझी अब्रू संभाळ, माझी लज्जा राख.'

पूर्वी रजपूत लोकांत कित्येक वर्णनीय पुरुष व स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनीं आपल्या देशाचें वैभव राखण्यासाठीं काय काय केलें, त्यांच्या अंगीं देशाभिमान व कुलाभिमान कसा सोज्वल रीतीनें वास करीत होता, स्वातंत्र्य कायम राखण्यासाठीं त्यांचें मन कसें स्फुरत होतें, महत्व टाकून स्वदेशहितार्थ आपलें तन, मन, धन कसें अर्पण करीत आणि अश्रांत श्रम घेत, इत्यादि गोष्टी या पुस्तकापासून वाचकांनीं ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत.

नुसतें लढाईचेंच वर्णन दिल्यानें वाचकांची तृप्ति होणार नाहीं असें समजून, अकबरशाहा व त्याचे प्रतिस्पर्धी रजपूत लोक यांचा थोडासा वृत्तांत या पुस्तकाच्या आरंभीं व शेवटीं देऊन मध्यें चितूरगडच्या लढाईचें वर्णन दिलें आहे. तें जितकें भरपूर व साधार देववेल तितकें दिलें आहे. प्रसंगविशेषीं व स्थलविशेषीं, कोठें पोक्त, उदात्त व उन्नत विचार; कोठें कोटिक्रम व नम्र परिहास; व कोठें शब्दप्रहार आणि सत्यनिरूपण; हे प्रकार पाहण्यांत येतील. पुस्तकाची भाषासरणि जितकी साधी, गंभीर, सालंकृत, सुबोध व सुरस करवेल तितकी केली आहे. यांत मुख्य वीर व भयानक रसांचेच प्रसंग भरले आहेत. क्वचित् स्थलीं शृंगाररसाचीही थोडीशी झांक दिसून येईल.

या खेपेसही हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें श्रेय निर्णयसागर छापखान्याचे मालक यांनींच घेतलें आहे, तर मराठी भाषेच्या उत्कर्षाविषयीं उत्सुक असलेले लोक यांस उदार आश्रय देतील, अशी आशा आहे.

**ग्रंथकर्ता.**

723

# प्रकाशकारांची प्रस्तावना.

चांगल्या चांगल्या ग्रंथकारांचे ग्रंथ छापून प्रसिद्ध करण्याचा किंत्ता आमचे कैलासवासी तीर्थरूप यांनीं आह्मांस घालून दिला आहे. त्यास अनुसरून रावसाहेब नागेशराव विनायक बापट, लोकविश्रुत ग्रंथकर्ते, यांचें 'चितूरगडचा वेढा' या नांवाचें पुस्तक हल्लीं आह्मी छापून प्रसिद्ध करीत आहों. या गृहस्थांचें नांव माहित नाहीं असे लोक आपल्या महाराष्ट्रांत विरळाच सांपडतील. यांचे 'बाजीराव पेशवे,' 'छत्रपति संभाजी महाराज', 'दादोजी कोंडदेव' वगैरे कित्येक लोकप्रिय ग्रंथ आह्मीं पूर्वींच छापून प्रसिद्ध केले आहेत. प्रस्तुतच्या पुस्तकाला त्यांनीं 'चितूरगडचा वेढा' असें नांव दिलें आहे, तरी त्यांत अकबर बादशाहा व रणशूर रजपूत लोक यांचीं थोडक्यांत विश्वसनीय चरित्रेंच दिलीं आहेत, असें ह्मटलें तरी चालेल. यांत चितूरगडच्या लढाईचा मुख्य कथाभाग आहे, ह्मणून तो किल्ला, अकबर बादशाहा, व ग्रंथकर्ते, असे तीन कट्र आह्मीं पुस्तकाला जोडले आहेत. लोकांकडून पूर्वींप्रमाणें या पुस्तकालाही उदार आश्रय मिळेल अशी उमेद आहे.

| | | |
|---|---|---|
| मुंबई. | } | तुकाराम जावजी, |
| जानेवारी १८९९. | } | "निर्णयसागर" छापखान्याचे मालक. |

## या पुस्तकाविषयीं नामदार न्यायमूर्त्ति महादेव गोविंद रानडे, हायकोर्ट जज्ज–मुंबई, यांचा

## अभिप्राय.

रा० रा० रावसाहेब नागेशराव विनायक बापट

यांस,

साष्टांग नमस्कार विनंति विशेष,

आपलें पत्र आलें तें पावलें. 'चितूरगडचा वेढा' हें हस्तलिखित पुस्तक तुह्मीं इकडे अभिप्रायाकरितां पाठविलें होतें. ज्या मूळ इंग्रजी ग्रंथावरून हें पुस्तक लिहिलें तोही ग्रंथ वाचून पाहिला. तुह्मीं लिहिलेली गोष्ट मूळ आधारभूत ग्रंथास जुळून आहे. त्यांत स्वकल्पित कांहीं भाग असेल असें वाटलें होतें; परंतु, तसा प्रकार दिसला नाहीं. ग्रंथाची भाषा आपल्या नेहमींच्या रीतीप्रमाणें पोक्त व फार रसभरित आहे, व रजपूत लोकांची स्थिति त्या वेळीं कशी होती, याचें चित्र तुमचें ग्रंथांत उत्कृष्ट रीतीनें वठलें आहे. कळावें, हे विनंति.

मुंबई.
ता० ४–१०–९७. } महादेव गोविंद रानडे.

---

### रा० रा० विष्णु दाजी गद्रे, प्रियदर्शिका वगैरे पुस्तकांचे कर्ते यांचा अभिप्राय.

आपलें 'चितूरगडचा वेढा' हें सर्व पुस्तक मीं वाचून पाहिलें. गोष्ट लहानशीच, पण चटकदार, मनोरंजक व हृदयद्रावक झाली आहे. संविधानक चांगलें असल्यामुळें आपल्या सारख्या कुशल ग्रंथकाराच्या हातून ती कशी वठेल याविषयीं शंकाच धरावयास नको.

## ग्रंथकार



रा० सा० नागेशराव विनायक बापट,
वडोदें.

॥ श्रीः ॥

# साक्या.

चिरंजीव जामाता माझा लक्ष्मणराव जयाचें ॥
वेळणकर उपनाम असे तो होवो पात्र जयाचें ॥
त्याला रक्षो सतत हरी ॥ उसळुनि करुणेच्या लहरी ॥ १ ॥

भाग्यवती सौभाग्यवती मनुताई प्रिय मम कन्या ॥
संतोषाचें संतत भाजन होवो तीही धन्या ॥
श्रीहरि तिजला सुख देवो ॥ संकट विलयाला नेवो ॥ २ ॥

साधुशिरोमणि हरिबोवाच्या आशीर्वचनें झाला ॥
त्या दोघांला पुत्र सदोदित पावो तोहि सुखाला ॥
निजवंशांतिल मोत्याला ॥ सन्मति देवो हरि त्याला ॥ ३ ॥

त्या मम दौहित्रास विराजे भालचंद्र हें नाम ॥
होवो गुरुच्या करुणेनें तो सकलगुणांचें धाम ॥
शंखगदारिसरोजधर ॥ होवो हरि त्या मोदकर ॥ ४ ॥

त्या सुकुमारासाठीं हें मी पुस्तकरूपी खाद्य ॥
करुनि ठेविलें याची गोडी देवो त्यास अनाद्य ॥
करुणासागर हरि त्यास ॥ रक्षो मानुनि निजदास ॥ ५ ॥

या खाद्याचें सेवन त्याच्या मतिला पुष्टी देवो ॥
वर्षद्वयमित शिशु तो याची अभिरुचि संतत घेवो ॥
ठेवो श्रीहरि त्यास सुखी ॥ विलसो वाणी मधुर मुखीं ॥ ६ ॥

सौजन्यादिक निजगुणवृंदें भूषित उभयकुलाला ॥
करो सदोदित बालक तो त्या रक्षो हरिहि मुलाला ॥
देवो हरि त्या आरोग्य ॥ आणिक वांछित उपभोग्य ॥ ७ ॥

# गद्यबोध.

चिरंजीव–व्यंकटेश, दामोदर, राजाराम, रामचंद्र व भालचंद्र यांस.

प्रियबालक हो,

शाळेंतील अंकगणित, बीजगणित व सिद्धांत यांच्याबरोबर खालील सात-कलमी सालंकार गणित शिकून विद्यारूप कामधेनूची कास धरा, ह्मणजे तुह्मी मान, धन, कीर्ति आणि परमेश्वरकृपा यांच्या लाभांस पात्र व्हाल.

१ सौंदर्य आणि सुस्वभाव यांची बेरीज करा.

२ मैत्रींतून मत्सर वजा करा.

३ प्रेमाला शुद्धांतःकरणानें गुणा.

४ काल-भाज्याला उद्योग भाजकानें भागा.


५ परनिंदेचा लघुतम काढा.

६ सुविचारांचा वर्ग व घन करा.

७ दया, क्षमा, शांति, नीति, सत्य आणि परमार्थ यांचीं समीकरणें सोडवा व सिद्धांत सिद्ध करा.

हा सोनेरी वर्खानें मढविलेला मधुर मेवा तुह्मांस (बंधुपुत्र व कन्यापुत्र यांस) पुष्टिप्रद होवो.

ग्रंथकर्ता.



चितूरगड किल्ल्याचा नकाशा.

# चितूरगडचा वेढा.

## भाग पहिला.

### उपक्रम.

या पुस्तकांत मुख्यत्वें चितूरगडच्या लढाईचा विस्तारपूर्वक वृत्तांत दाखल करण्याचा विचार आहे. ही लढाई मोंगल बादशाहा प्रसिद्ध अकबरशाहा व उदेपूरचें राजधानी शहर चितूरगड एथील रजपूत लोक, या उभयतांमध्यें इ० सन १५६७ सालीं झाली. परंतु, नुसतें लढाईचें वर्णन वाचल्यानें वाचकांची तृप्ति होणार नाहीं, सबब अकबराची पूर्वपीठिका व रजपूत लोकांची, विशेषेंकरून उदेपूरघराण्याची, थोडीशी माहिती एथें देणें अवश्य आहे.

अकबराच्या बापाचें नांव हुमायून. त्याचा पराभव होऊन तो वनवासांत दिवस काढीत असतां उमरकोट एथें अकबराचें जन्म इ० स० १५४२ त झालें. त्याच्या मातुश्रीचें नांव हमीदा. हीं नवराबायको पळून जात असतां रस्त्यांत उमरकोटचा अंमलदार राणाप्रसाद यानें हुमायूनला आश्रय दिला. त्याच ठिकाणीं हमीदा बेगम प्रसूत झाली. हुमायूनला पुत्र झाल्याची बातमी

कळतांच त्याच्या जवळ एक कस्तूरी भरलेली डबी होती, ती उघडून त्यानें जवळच्या लोकांस ती वांटली, आणि तो ह्मणाला—'या कस्तूरीच्या परिमलाप्रमाणेंच माझ्या पुत्राचा कीर्तिसुगंध सर्व जगभर पसरो.' ही त्याची इच्छा ईश्वरकृपेनें परिपूर्ण झाली. या पुत्राचें 'जलालुद्दिन महंमद अकबर' असें पुरें नांव होतें. पुढें हुमायूनास कंदाहाराकडे पळून जावें लागलें.



अकबर बादशाहा.

या मुलाला वाटेनें संभाळून नेण्याचें कठिण दिसलें, ह्मणून त्याला रस्त्यांत टाकून देऊन त्याचे आईबाप इराणाकडे निघून गेले. तें मूल कर्मधर्मसंयोगानें अकतरीच्या हातीं लागलें. पुढें इ० स० १५४५ च्या सालीं आक्टोबर महिन्यांत तें अर्भक आईबापांच्या स्वाधीन झालें. त्या समयीं त्याचें वय फक्त ३ वर्षांचें होतें.

इ० सन १५५५ सालीं, तारीख १८ जून रोजीं, सरहिंद रणभूमीवर शिकंदरशाहा व हुमायून या दोघांमध्यें घोर संग्राम झाला. त्या युद्धांत हुमायूनच्या बाजूला बहिरामखान हा नांवाजलेला सरदार होता. ते दोघे मोठ्या शौर्यानें लढले. त्या समयीं अकबराचें फक्त १३ वर्षांचें बाल वय होतें, तरी त्यानें विलक्षण शौर्यप्रभाव दाखविला. शेवटीं, शिकंदरशाहाचा पराभव होऊन तो डोंगरी प्रदेशांत पळून गेला, आणि हुमायूनास जय मिळाला. हुमायूनानें १५ वर्षें वनवास भोगिला. नंतर दि-

ह्णीपदावर तो कायम झाला. पुढें एक वर्षाच्या आंतच हुमायून वारला. त्या वेळेस अकबर तेरा वर्षांचा होता. हुमायूनाचा अंत आग्रा एथें झाला. पुढें कांहीं वर्षांनीं आपल्या पित्याच्या थडग्यावर अकबरानें अरसपानाची सुंदर कबर बांधविली, ती अद्यापि पाहण्यासारखी आहे.

अकबरावर हुमायूनाची अत्यंत प्रीति होती. दहाव्या वर्षा-पासूनच हुमायून त्याला राज्यकारभाराचें वळण व शिक्षण देऊं लागला.

अकबर एक वर्षाचा असतांना तो त्याचा चुलता कामरान याच्या हातीं लागला. कामरानाचें व हुमायूनाचें काबुलास युद्ध झालें त्या वेळेस तोफेचा गोळा अकबराला लागावा ह्मणून कामरानानें मुद्दाम त्या अर्भक राजाला तटावर नेऊन ठेविलें. त्या कठिण प्रसंगीं त्या ठिकाणीं केवळ परमेश्वरानेंच त्याचें संरक्षण केलें. या ठिकाणीं:—

'असतां विधिकवच नव्हे काळाच्याही विनाश कुंतांनीं' या शकुंतलाख्यानांतील मोरोपंतांच्या आर्यार्धाचें स्मरण झाल्याविना रहात नाहीं. असो.

पुढें त्यास अनेक वेळां कारागृहवास भोगावा लागला. ते त्याच्या जीवावरचेच प्रसंग टळले. सर्व संकटांतून तो पार प-डला. त्याच्या हातून पुढें मोठमोठीं कार्यें व्हावयाचीं होतीं, व त्याची सत्कीर्ति इतिहासांत अजरामर होऊन रहावयाची होती, ह्मणूनच तो बचावला गेला असें ह्मटलें पाहिजे.

त्याला लहानपणीं खरें शिक्षण मिळालेंच नाहीं. धामधु-मीच्या प्रसंगीं प्रत्यक्ष अनुभवानें जें शिक्षण मिळालें तें मात्र चांगलें भरपूर मिळालें. त्याची बुद्धि तीव्र असल्यामुळें त्या शिक्षणाचा ठसा त्याच्या मनावर अत्युत्तम उठला. बापाच्या

वेळचा एकनिष्ठ व शूर सरदार बहिरामखान हा लहानपणीं त्याचा उत्तम गुरु व पालनकर्ता होता. हुमायून मरण पावतांच बहिरामखानानें त्याला बादशाहीपदावर स्थापन केलें. त्या वेळेस त्याला नुकतें १३ वें वर्ष लागलें होतें. राज्यकारभाराचा सर्व भार बहिरामखानाच्या शिरीं होता. पुढें अकबरानें नीतीनें, मोठ्या चातुर्यानें व दक्षतेनें राज्यकारभार केला. त्याच्या कारकीर्दींत त्याची प्रजा सुखी झाली; त्यामुळें या पृथ्वीवर जे जे महान् महान् राज्यकर्ते झाले, त्यांच्यामध्यें इतिहासकारांनीं अकबराची श्रेष्ठत्वानें गणना केली. याचें श्रेय बऱ्याच अंशीं बहिरामखानाला मिळालें पाहिजे.

बहिरामखानानें कांहीं अपराध्यांस कडक शिक्षा दिल्यामुळें त्याचें व अकबराचें पुढें पुढें बनेनासें झालें. अकबर जसजसा मोठा होत चालला तसतशी राज्यसत्ता आपल्या हातीं असावी असें त्याला वाटूं लागलें. बहिरामखानाच्या ताब्यांतून मोकळा होण्यासाठीं त्यानें एक विलक्षण युक्ति योजिली, ती अशी:–एके दिवशीं तो व बहिरामखान दोघे मिळून जंगलांत शिकारीस गेले असतां आपली आई आजारी पडल्याचें निमित्त सांगून अकबर कोणासही न कळवितां एकाएकीं दिल्लीस परत गेला. तेथून त्यानें बहिरामखानास सांगून पाठविलें कीं, 'आजपर्यंत आमचा विद्याभ्यास आणि बाळपणचे खेळ चालले होते, ह्मणून राज्यकारभार तुमच्या हातीं असणें जरूर होतें; परंतु, आतां आमचें राज्य आह्मीं स्वतः चालवावें असें मनांत आहे. आमचें कल्याण व्हावें असा तुमचा हेतु असल्यास तुह्मीं आतां सर्व राज्यकारभार सोडून द्यावा. तुमचा वृद्धापकाळ झाला आहे, याकरितां संसाराचा त्याग करून उरलेलें आयुष्य ईश्वरचिंतनांत घालविण्यासाठीं तुह्मीं मक्केस जाऊन रहावें. तुमचा

इतमाम चांगला राहील, अशी तुह्मांस तेथें नेमणूक मिळेल.' त्याच वेळेस त्यानें आपल्या प्रजेस कळण्याकरितां एक जाहीरनामा प्रसिद्ध केला कीं, 'इतःपर आह्मीं आपल्या राज्याचा अधिकार आपल्या हातांत घेतला आहे. सबब यापुढें सर्वांनीं आमचाच हुकूम पाळला पाहिजे. दुसऱ्या कोणाचा अधिकार मानूं नये.'

पण, बहिरामखान मोठा महत्त्वाकांक्षी पुरुष होता. त्याच्या हातून तसें वर्तन झालें नाहीं. त्यानें राज्यांत बंडावा मांडला; पण, त्याचें कांहीं चाललें नाहीं. शेवटीं, तो बादशाहाला शरण आला व मानेला पागोटें बांधून सिंहासनासमोर आडवा पडून त्यानें अकबराची क्षमा मागितली. तेव्हां पूर्वींचे उपकार व त्याची खरी योग्यता स्मरून व त्याची दीनावस्था पाहून अकबराच्या मनाला कळवळा आला. मग त्यानें त्याला आपल्या हातानें उठवून आपल्या उजव्या बाजूस पूर्वींच्या जागीं बसविलें, व सन्मानार्थ एक उंची पोषाख दिला. नंतर तो त्याला ह्मणाला, 'खानसाहेब, आमच्या घराण्यावर तुमचे बहुत उपकार आहेत. तुमची इच्छा असेल तर तुह्मांस एकाद्या प्रांताची सुभेदारी देतों. तशी मर्जी नसेल तर एथेंच दरबारांत राहून कामकाज करीत जा. तसेंही पतकरत नसेल तर मक्केस जाऊन रहा. तेथें तुमच्या मोठेपणास साजे असा तुमचा बंदोबस्त करून देतों.'

पुढें बादशाहानें त्यास सालीना ५० हजार रुपयांचें वेतन करून दिलें. नंतर तो मक्केस जात असतां मुबारिकखान या नांवाच्या इसमाच्या हातून मारला गेला. नंतर त्याचीं बायकामुलें आग्र्यास पाठवून त्यांची त्यानें उत्तम प्रकारची बरदास्त ठेविली. आपल्या प्रथम गुरुजीचे अन्याय पोटांत घालून मोठ्या संतोषानें त्याला मक्केस जाण्यासाठीं रजा दिली. यांत अकबराच्या मनाचा मोठेपणा चांगल्या रीतीनें व्यक्त होतो. समर्थांनीं ह्मटलें

आहे कीं, 'उत्तम गुणें शृंगारला । तो बहुतांमध्यें शोभला । प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा' ॥ असो.

त्या वेळेस अकबर फक्त १८ वर्षांचा होता. पुढें त्यानें दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें सोडून देऊन स्वतःच्या अकलेच्या जोरावर आपली राज्यनौका हांकीत नेण्याचा निश्चय केला. पूर्वेकडील प्रांतांत कांहीं बंडें उठलीं होतीं, तीं त्यानें मोडून टाकिलीं. इ० स० १५६० पासून १५६७ पर्यंत सुमारें सात वर्षें बंडें मोडण्यांत गेलीं. हातीं धरलेलें कोणतेंही काम त्वरेनें व चांगलें करण्याची हातोटी आणि शत्रूसही क्षमा करण्याचें औदार्य, हे गुण त्या प्रसंगीं विशेष दृष्टोत्पत्तीस येऊं लागले होते.

आपलें राज्य चिरस्थायी करण्याच्या उद्देशानें अकबरानें रजपूत लोकांशीं शरीरसंबंध करण्याचा प्रघात घातला. त्यानें पुष्कळ प्रसंगीं रजपुतांस जर्जर करून सोडलें; तरी त्यानें त्यांचीं राज्यें खालसा केलीं नाहींत. त्यांच्याशीं शरीरसंबंध जोडून व त्यांस आपल्या दरबारीं, लष्करी व इतर खात्यांत मोठमोठीं कामें देऊन त्यांना आपलेसे करून घेतले. अफगाण लोक मोंगलांचे कट्टे शत्रू होते; ह्मणून त्यांचें नाक खालीं करण्यास रजपूत लोक फार उपयोगीं पडतील असें त्याला वाटलें; ह्मणून त्यानें बादशाहींत अशा प्रकारची व्यवस्था केली कीं, तींत सर्व जातींचा व सर्व प्रकारच्या लोकांचा समावेश व्हावा. रजपूत व मुसलमान यांस त्यानें एकाच मालिकेंत ओंवून ठेविलें. जयपूरचा रजपूत राजा बहारमल्ल यानें आपली कन्या अकबरास इ० स० १५६१ त दिली. नंतर त्या राजाला व त्याचा पुत्र भगवानदास यांना त्यानें आपल्या लष्करांत सरदाऱ्या दिल्या.

जोधपूर संस्थानचा मढतेकिल्ला अकबराच्या लवकर हस्तगत झाला नाहीं. तो किल्ला पाडाव करण्यास त्याला अतिशय प्रयास

पडले. किल्ल्यांतील अन्नसामग्री संपेपर्यंत तो मोंगलांच्या स्वाधीन झाला नाहीं. लढतां लढतां अर्धे अधिक रजपूत रणांगणावर पडले, तेव्हां राजा मालदेव अकबरास शरण गेला. त्याचा अकबरानें दिल्लीदरबारांत अत्युत्तम सन्मान केला. बादशाहानें आपल्या उजव्या बाजूस त्याला जागा दिली, व त्याचा मुलूख त्याच्या स्वाधीन केला.

मेवाडचा रजपूत राजा उदयसिंह यानें अकबराचें सार्वभौमत्व कबूल केलें नाहीं. तो आपल्याला स्वतंत्र राजा ह्मणवीत असे, आणि सर्व रजपूत राजांत आपण श्रेष्ठ व सार्वभौम आहों असें मानीत असे. त्याला पूर्ण रीतीनें जिंकल्याशिवाय राजपुतान्यावर आपला अंमल बसावयाचा नाहीं असें अकबरास वाटलें. त्या वेळेस चितूरगड ही उदयसिंहाची गादीची मुख्य जागा होती. उसबक लोकांचें बंड मोडून मोकळा होतांच अकबरशाहा स्वतः माळव्यांतून चितूरगडावर चालून गेला. त्या वेळेस (इ० स० १५६७) चितूरगडच्या संरक्षणार्थ बारा हजार कडवे रजपूत शिपाई ठेविले होते. राणा उदयसिंह जंगली प्रदेशांत निघून गेला होता. हा वेळपर्यंत अकबरानें आपल्या सैन्याबरोबर तोफखाना बाळगला नव्हता. चितूरगडाला वेढा देऊन तो हस्तगत करण्याचें काम त्यानें स्वतः केलें. तो किल्ल्याला वेढा देऊन बरेच दिवस लढत राहिला. या ठिकाणीं त्यानें आपलें युद्धकलानैपुण्य दाखविण्याची कमाल केली असें ह्मटलें पाहिजे.

त्याच युद्धाची गोष्ट या पुस्तकांत मुख्यत्वानें वर्णन केली आहे. उदयसिंह युद्धाचें काम किल्लेदारावर व किल्ल्यांतील रजपुतांवर टाकून आपण थोडक्या लोकांनिशीं जंगली प्रदेशांत जीव घेऊन निघून गेला. तरी मागें किल्ला बसंतसिंग किल्लेदाराच्या स्वाधीन राहिला होता. त्याचेंच दुसरें नांव जगमल् अगर

जयमल्ल होतें. तो मोठा नांवाजलेला शूर सरदार होता. त्याच्या हाताखालचे बारा हजार रजपूत शिपाई व बहुतेक सुखवस्तु रहिवाशी तरवारबहाद्दर होते. फार काय सांगावें, त्यांच्या बायकाही पुरुषांप्रमाणें मोठ्या हिंमतदार व शूर होत्या.

बसंतसिंग अकबराच्या सैन्याबरोबर किल्ल्याच्या तटबंदीवरून लढत होता. किल्ल्याभोंवतीं अकबराचा वेढा पडून बरेच महिने लोटले. नेहमीं चकमकींवर चकमकी झडत होत्या. वेढा पडून बरेच दिवस झाल्यावर एक दिवस रात्रीच्या वेळेस बसंतसिंग मशालीच्या उजेडानें सहजगत्या तटबंदीची टेहेळणी करीत होता. त्याजकडे अकबराची दृष्टि पोहोंचून त्याची 'संग्राम' या नांवाची भरलेली आवडती बंदूक जवळच्या शिपायाच्या हातीं होती ती त्यानें त्याजकडून मागून घेऊन तिचा नेम धरून झट्दिशीं सोडली. ती गोळी बसंतसिंगाच्या छातींत बसून तिनें त्याचा तत्काळ प्राण घेतला; तेव्हां रजपूत शिपायांचा एकदम दम खचल्यासारखा झाला. हें किल्लेदाराची स्त्री गुलाबबाई हिच्या लक्षांत येऊन तिनें पुढें सरून लोकांत नवा दम आणिला. तिनेंही बरेच दिवस अकबराला हात दाखविला; परंतु, शेवटीं आपला निभाव लागत नाहीं असें पाहून रजपुतांच्या रीतीप्रमाणें जोहार करून ती, तिच्या दोघी मुली, तिच्या आश्रित बाया व इतर रजपूत शिपायांच्या बायका यांनीं एका जुटानें आपले देह अग्निनारायणास अर्पण केले. चितूरगडावरील बहुतेक रजपूत शिपाई रणांगणावर मरून पडले! त्याच वेळेस चितूरगड अकबराच्या हातीं लागला. या कथेस आरंभ करण्यापूर्वी अकबराचे प्रतिपक्षी जे रजपूत लोक, त्यांची थोडीशी हकीकत अगोदर पुढील भागांत दिली पाहिजे.

# भाग दुसरा.

## रजपूत.

हिंदुस्तानाच्या बहुतेक इंग्रजी इतिहासांत रजपूत राजांच्या हकीकतीला स्वतंत्र स्थळ मिळालेलें दिसत नाहीं. वास्तविक पहातां रजपुतांचा इतिहास ह्मणजे हिंदुस्तानचा राष्ट्रेतिहास ह्मटलें तरी चालेल. त्या विषयावर एखादा स्वतंत्र ग्रंथ असणें अगदीं जरूर होतें. अठराव्या शतकांत मराठ्यांचा इतिहास जर स्वराष्ट्राच्या दृष्टीनें विशेष प्रधान गणला जातो तर मुसलमानांच्या अव्वल कारकीर्दींत रजपुतांचा इतिहास महत्त्वाचा व उपयुक्त असलाच पाहिजे. मुसलमानांचा प्रथम हिंदुस्तानांत प्रवेश झाला त्या वेळेस त्यांना जबरदस्त अडथळा रजपूत लोकांकडूनच झाला हें निर्विवाद आहे. बहुतेक मोठमोठे झगडे रजपूत लोकांबरोबरच झाले. त्यांजकडून मुसलमानांचा निःपातही होऊं शकता; परंतु, रजपूत जातीला कपटविद्या स्वप्नांतही ठाऊक नव्हती. आपलें वचन सत्य करण्यासाठीं आणि धर्मपालनासाठीं ते प्राण देणारे होते. अशा उदारपणाच्या स्वभावामुळें त्यांनीं आपल्या सर्वस्वाचा नाश करून घेतला. रजपूत घराण्यांची संगतवार हकीकत आजपर्यंत कोणींही टिपून न ठेवल्यामुळें त्यांच्या धीरोदात्त गुणांचा आपल्यास परिचय न होतां राष्ट्रेतिहासाच्या एका मोठ्या अंगास आपण अगदीं आंचवलों आहों. आमची आह्मांस पुरी ओळख राहिली नाहीं. रजपुतांचा उत्कर्ष विशेष

झाला नसला तरी त्यांच्या अपकर्षामध्येंही त्यांचे सद्गुण आढळून येण्यासारखे आहेत. हें कांहीं थोडें आहे असें नाहीं. ग्रीक, रोमन, वगैरे राष्ट्रांचे इतिहास पाहिले तरी हेंच आढळून येतें. रजपुतांचीं प्रथमपासून तीन घराणीं प्रमुख होतीं. त्यांचा खरा इतिहास खऱ्या कळकळीनें एक टॉड्साहेबानें मात्र बरीच मेहनत घेऊन लिहून ठेवल्याचें दिसून येतें. 'राजस्थान' या ग्रंथांत त्यांच्या सुरस कथा इतक्या विस्तारानें लिहिल्या आहेत कीं, त्यांचें सार काढलें तरी एक मोठा वाचनीय ग्रंथ होईल. त्यांत त्यांचे खरे गुण बरेच व्यक्त करितां येतील; परंतु, तसा प्रकार या लहानशा पुस्तकांत होऊं शकणार नाहीं हें उघड आहे.

सर्व रजपूत राजघराण्यांमध्यें मेवाडचा वंश फार प्राचीन व श्रेष्ठ गणला गेला आहे. मेवाडांत चितूरगड एथें सिसोदिया राजे राज्य करीत होते. चितूरगड–गादीचा मूळपुरुष बाप्पा रावळ या नांवाचा होऊन गेला. वायव्येकडे इराणापर्यंत सर्व प्रदेश बाप्पा रावळानें जिंकला होता, असें इतिहासग्रंथ सांगतात.

संग राण्याचा सर्वांत धाकटा मुलगा–उदयसिंह या नांवाचा होऊन गेला. चितूरास यापूर्वीं (ह्मणजे आह्मी गोष्ट लिहीत आहों त्यापूर्वीं) एक मोठा जोहार त्यांच्या चालीप्रमाणें झाला. त्या वेळेस उदयसिंहाची मातुश्रीही मरण पावली. पुढें दरबारच्या मंडळीनें उदयसिंहास दूर एका निर्भय स्थळीं नेऊन पोचविलें. याच उदयसिंहास बनबीरानें ठार मारण्याचा प्रयत्न केला होता; पण, पन्ना नांवाच्या दाईनें एका चमत्कारिक युक्तीनें–आपल्या मुलाला बळी देऊन, उदयसिंहाचें रक्षण केलें. ही गोष्ट करुण रसानें ओतप्रोत भरली आहे. उदयसिंहाचें संरक्षण बाहेरच्या बाहेर झालें. बनबीरानें कहर उसळून दिल्यामुळें तो सर्व लोकांस अप्रिय झाला होता. शेवटीं इ० स० १५४१ त उदय-

सिंहानें स्वारी करून आपलें राज्य परत घेतलें. नंतर वनवीर नागपूराकडे पळून गेला. तोच नागपूरकर भोंसल्यांचा मूळपुरुष होय, असें ह्मणतात.

याप्रमाणें चितूरगडचें राज्य चितूरगड–घराण्याच्या औरस संततीच्या ताब्यांत गेलें; पण, उदयसिंह जात्या शूर पुरुष नव्हता. अकबराचा बाप हुमायून याचा पराभव होऊन दिल्लींत अस्वस्थता बोकाळल्यामुळें चितूरगडच्या वाटेस लागलेंच कोणी गेलें नाहीं. पुढें अकबरशाहा बापाच्या गादीवर बसल्यावर त्यानें हळहळू सर्व रजपूत राजांस आपलें सार्वभौमत्व कबूल करावयास लाविलें. रजपूत राजघराण्यांशीं अकबराचे शरीरसंबंध होऊं लागले. जयपूरचा राजा बहारमल्ल यानें आपली एक सुंदर मुलगी अकबरास दिली, आणि अशा रीतीनें बादशाहाशीं स्नेहसंबंध जोडला.

सन १५६७ सालीं अकबरानें चितूरावर स्वारी केली. त्या वेळेस बेदनूरचा ठाकूर बसंतसिंग याच्या हातीं सर्व सत्ता होती. त्यानें मोंगल लोकांशीं बरेंच नेटानें युद्ध केलें. उदयसिंह पळून गेला; तरी इतर सरदारांनीं पलायन करून आपल्या पिढीजाद ब्रीदाला बट्टा लावून घेतला नाहीं. ते चितूरगडच्या संरक्षणासाठीं मोठ्या आवेशानें लढले.

वर सांगितलेला बसंतसिंग हा चितूरगडच्या युद्धांत पुढारी होता. तोच जगमल्ल किंवा बसंतसिंग या नांवानें प्रसिद्ध असून त्याला या युद्धांत अकबराची गोळी लागून पडला. तेव्हां आपल्यास जय येत नाहीं असें पाहून बसंतसिंगाचे शिपाई, त्याची शूर स्त्री गुलाबबाई, तिच्या उपवर झालेल्या दोन मुली, व इतर स्त्रिया, या सर्वांनीं जोहार करून आपले प्राण दिले. स्त्रियांनीं अग्नींत प्रवेश करून आपल्यास जाळून घेतलें; पण, त्या

माउल्या अकबराच्या हातीं जीवंत लागल्या नाहींत. हा चितूरांत तिसरा जोहार झाला.

अकबराच्या सैन्यानें चितूर शहरांत प्रवेश करून राहिलेल्या सर्व स्त्रिया व पुरुष यांची अंगावर कांटा उभा राहण्यासारखी कत्तल केली. तीस हजार लोक या कत्तलींत ठार झाले असें लिहिलें आहे! नंतर धर्माभिमानानें हिंदूंचीं देवालयें, मंदिरें, राजवाडे, वगैरे चांगल्या चांगल्या इमारती अकबराच्या लष्करानें जमीनदोस्त करून टाकिल्या. त्या ओसाड पडलेल्या जाग्यावर त्यानें पुढें मशीदी बांधविल्या. श्री नगरदेवीचें भव्य देवालय पाडवून तेथील नगारे, दिवे, नौबती, अलंकार, सोन्यारुप्यानें मढविलेले दरवाजे, वगैरे सर्व सामान त्यानें आपलें राजधानी शहर आग्रा एथें रवाना केलें.

उदयसिंह चितूरगड सोडून पळून गेला, तो प्रथम राजपिंपळ्याच्या अरण्यांत आणि तेथून पुढें अरवलीच्या डोंगरांत दडून राहिला. नंतर चार वर्षांनीं तो राज्यभ्रंशाच्या व्यथेनें मरण पावला. मरणापूर्वी अरवली डोंगराच्या एका खोऱ्यांत त्यानें उदयसागर या नांवाचा एक मोठा तलाव बांधविला. त्याच ठिकाणीं नंतर त्यानें एक लहानसें खेडें वसविलें. पुढें पुढील पिढीच्या पुरुषांनीं तेंच खेडें वाढवून त्याला शहराची शोभा आणिली. तेंच पुढें राजगादीचें मुख्य स्थान झालें. हल्लीं ज्याला उदेपूर ह्मणतात तेंच तें शहर होय. त्या नांवावरूनच मेवाडचे राणे यांस उदेपूरचे राणे असें ह्मणूं लागले. उदेपूरघराण्याची मूळपीठिका अशी आहे.

उदेपूर, जयपूर व जोधपूर हीं तीनच घराणीं राजपुतान्यांत ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं आहेत. या तीन घराण्यांमध्यें उदेपूरचें संस्थान आजमितीला अगदीं खालावलेल्या स्थितींत

आहे. तरी तें फार प्राचीन असून निष्कलंक राहिलें आहे. इ० स० १३०० पासून १८०० पर्यंत ५०० वर्षांच्या अवधींत उदेपूर संस्थानांत उदयसिंहाशिवाय नालायक राजा कोणी निपजला नाहीं. जयपूरच्या राजांनींही उज्वल कीर्ति मिळवून आपलें नांव कायम राखिलें. जोधपुरांतही कांहीं वीररत्नें होऊन गेल्याचे दाखले मिळतात. उदेपूरच्या राजांसारखे सज्जन राजे कोठेंही झाले नसतील. त्यांच्या राज्यावर शत्रूचे हल्ले वरचेवर इतके झाले कीं, त्या आघातांतून हें संस्थान निभावलें कसें, याचेंच आश्चर्य वाटणार आहे. अल्लाउद्दिन, बाबर, अकबर, औरंगजेब, वगैरे पराक्रमी पुरुषांपुढें उदेपूरघराण्याचे राजपुरुष अगदीं टेंकीस आले. अशा भयंकर वावटळी येऊन गेल्या तरी उदेपूरचें राज्य कायमचें कायम राहिलें. मुसलमानांस कधीं हार जावयाचें नाहीं व सत्याचरण सोडावयाचें नाहीं असा त्यांचा निश्चय होता. हें कडक व्रत पाळण्यासाठीं त्यांना व त्यांच्या अर्धांग्यांना, भगिनींना व कन्यादिकांना अनेक वेळां आपल्या प्राणांवर उदार होऊन स्वदेहांचे जोहार करावे लागले, मूळचीं राजधानीशहरें बदलावीं लागलीं व दुसरीं अनेक संकटें भोगावीं लागलीं, तरी ते आपल्या सत्यव्रतापासून च्युत झाले नाहींत. त्यांचें नित्याचरण सुटलें नाहीं. त्यांनीं आपला सदाचरणाचा धोपटमार्ग सोडला नाहीं. उदेपूर संस्थानावर मुसलमानांच्या स्वाऱ्यांवरस्वाऱ्या होत होत्या तरी तेथच्या राणाजींनीं आपलें स्वातंत्र्य दुसऱ्यांच्या हातीं जाऊं दिलें नाहीं, व दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हरण करण्याची दुष्ट बुद्धि त्यांना उपजली नाहीं. ही गोष्ट त्यांच्या संबंधानें विशेष संस्मरणीय होऊन राहिली आहे.

रजपूत जात जात्या मोठी हट्टी होती. क्षुल्लक मानपानांसाठीं देखील ती वाटेल तितका स्वार्थत्याग करण्यास तयार असे. केवळ

मानपानांसाठीं आणि स्त्रियांच्या पातिव्रत्यरक्षणासाठीं रजपूतांनीं मुसलमानांबरोबर मोठमोठे झगडे केले. टॉड्चा 'राजस्थान' हा एक मोठा इंग्रजी ग्रंथ आहे. त्यांत वीर व करुणरस यांनीं ओतप्रोत भरलेलीं अनेक कथानकें आहेत. बिकट प्रसंग पडले ह्मणजे सर्व रजपूत लोक एकत्र होत असत. असा त्यांच्यांत पूर्वी अपूर्व मित्रभाव वसत होता. शत्रू कितीही बलाढ्य असला तरी आपण एकजुटानें व नेटानें काम केलें असतां त्याच्या हातून आपलें कांहींएक वांकडें व्हावयाचें नाहीं, अशी त्यांची पूर्ण भावना असल्याचें चितूरगडावरचे रजपूत व अकबर यांच्या झगड्यावरून उघड उघड दिसून येतें. अकबरानें होते तेवढे प्रयत्न केले; पण, उदेपूरचे राणे दांतीं तृण धरून त्याला शरण गेले नाहींत. इतकेंच एथें सांगून आतां पुढील भागापासून चितूरगडाकडे वळूं.

# भाग तिसरा.

## त्रिपुरसुंदरी आणि त्रिभुवनसुंदरी.

किल्लेदार बसंतसिंग चितूरगडाच्या तटबंदीवर फिरत होता. तेथून तो आपल्या शत्रूच्या वेढ्याची हालचाल पहात होता. शत्रू तटबंदीजवळ येऊन भिडला होता. किल्ल्यांत धान्यसामग्री व दारूगोळा यांचा मनमुराद पुरवठा होता. आंत सुमारें बारा हजार रजपूत शिपाई होते. लढण्याचें व खाण्यापिण्याचें सामान असेपर्यंत शत्रूशीं नेटानें लढण्याचा सर्वांचा कट्टा निश्चय झाला होता. किल्ल्याला शत्रूचा वेढा पडून सुमारें दीड महिना झाला. वेढ्याचें काम खुद्द अकबरानें आपल्या देखरेखीखालीं ठेविलें होतें, तरी किल्लेदारास जेरीस आणण्याचा त्याचा हेतू तडीस गेला नव्हता. वेढ्यांत सांपडलेले सर्व एकजात रजपूत होते. ते शत्रूशीं किल्ल्याच्या तटबंदीवरून निकरानें लढत होते. तटबंदीच्या भिंती फारच मजबूद होत्या. त्यांवर उभे राहून बसंतसिंगाचे लोक वरचेवर शत्रूवर मारा करीत होते, तरी अकबराची मनुष्यहानि फारशी झाली नव्हती.

चितूराला वेढा देऊन फार दिवस बसावें लागलें; यामुळें अकबर बराच कंटाळून गेला होता. यापूर्वी जीं जीं शहरें व किल्ले त्यानें हस्तगत केले, तेथें तेथें त्याच्या फौजेला फार दिवस पडून रहावें लागलें नाहीं. त्याच्या नांवाचा व फौजेचा इतका दरारा बसला होता कीं, वेढा पडल्यावर आंतील लोक

दांतीं तृण धरून शरण येत असत, तसें एथें झालें नाहीं. चितूरची शिबंदी सामान्य प्रतीची नाहीं, ते लोक कट्टे लढवय्ये असून एकाएकीं आपल्याला दाद देणारे नव्हत, असें त्याला कळून चुकलें.

किल्ल्यावर बसंतसिंग उभा राहून व चोंहीकडे फिरून सभोंवतीं टेहेळणी करीत होता, त्या वेळेस त्याची पत्नी गुलाबबाई त्याला जाऊन भेटली. ती बाई रूपानें सुंदर असून तिचें वय सुमारें ३५ वर्षांचें होतें. तिला दोन मुली होत्या. त्याही सुंदर असून उपवर झाल्या होत्या. थोरलीचें नांव त्रिपुरसुंदरी व धाकटीचें त्रिभुवनसुंदरी होतें. गुलाबबाईचे डोळे रागानें लाल झाले होते.

गुलाबबाई—साहेबजी, शेवटीं आपल्या हिंदुधर्माचा छळ करणाऱ्यांचीच फत्ते होणार ना?

बसंतसिंग—कसें होणार आणि काय होणार, हें कांहीं निश्चयानें सांगतां येत नाहीं; पण, हा मुसलमान राजा मोठा शूर व दृढनिश्चयी आहे, ह्मणून मात्र जरा भीति वाटते.

गुलाबबाई—काय? आपल्या किल्ल्यांत इतके लोक असून यांच्यामध्यें त्याच्यासारखा एकही शूर पुरुष नसेल?

बसंतसिंग—मला नाहीं वाटत कोणी असेलसा. या राजाच्या नशीबाचा ताला असा आहे कीं, त्याला नेहमीं हटकून फत्ते मिळते. फत्ते नुसत्या नशीबानेंच होत नसते. तिला बुद्धीचेंही साह्य असावें लागतें.

गुलाबबाई—कां बरें? असें कां ह्मणतां? हीं दोन्हीं साधनें त्यांस अनुकूल असून आपण त्यांना यापूर्वीं लढून कधीं जेरीस आणलें नाहीं का?

वसंतसिंग—तें खरें, पण बुद्धिबुद्धींतही अंतर असतें. कोणाची जास्ती चालते, आणि कोणाची कमी चालते.

गुलाबबाई—तर मग आपल्या किल्ल्याचा वेढा उठण्याची आशाच नाहीं कीं काय ?

वसंतसिंग—तसेंच केवळ ह्मणतां येत नाहीं. रजपूत जातीला निराशा ही कधींच ठाऊक नाहीं. तरी इतकें खरें कीं, आपण जीवावर उदार होऊन शत्रूशीं सामना करून त्याचें अतोनात नुकसान करूं; तरच तो वेढा उठवून निघून जाईल.

गुलाबबाई—साहेबजी, त्याला ठाऊक नसेल कीं, आमच्या किल्ल्यांतल्या बाया देखील आपलीं शिरें हातीं घेऊन त्याच्या शिपायांबरोबर लढण्यास सिद्ध आहेत. तशी वेळ मात्र येऊं द्या, ह्मणजे त्याची खातरी होईल.

वसंतसिंग—गुलाब, तूं वेडी आहेस. दुसऱ्या बायका तुझ्यासारख्या हिंमतदार असतील असें समजत असलीस, तर ती तुझी चूक आहे. चितूरच्या सगळ्या बायका व मुली शूर आणि धैर्यवान् असतील तर आणखी काय पाहिजे ?

गुलाबबाई—साहेबजी, तशी वेळ येऊं द्या ह्मणजे माझ्या रजपूत भगिनी व कन्या यांविषयीं मी जें बोललें त्याची प्रतीति येईल. आतां माझी विनंति एवढीच आहे कीं, मला ह्या लढाईत आपली अर्धभागिनी करा. या शूर राजाबरोबर लढण्यांत आपल्याला जे श्रम होतील व जी कीर्ति मिळेल, त्यांत माझाही थोडा वांटा ठेवा. या वेळेस आपल्यालाच जय मिळेल असा माझा होरा वाहतो. पतीला सुखदुःख होतें त्याचा बायकोलाही वांटा मिळाला पाहिजे !

चितूरकिल्ल्याला तीस हजार सैन्याचा वेढा पडला होता.

खुद्द अकबरबादशाहा तो वेढा देऊन बसला होता. त्या काळीं अकबरासारखा यशस्वी वीर सगळया हिंदुस्तानांत कोणी नव्हता. अशी गोष्ट होती तरी, तीमुळें किल्लेदाराच्या स्त्रीचें धारिष्ट खचलें नाहीं. किल्ल्यांतील शिबंदीची सामग्री व शौर्य यांच्याविषयीं तिला जितका भरंवसा होता, तितका बसंतसिंगाला नव्हता. तिची वडील कन्या त्रिपुरसुंदरी एका तरुण रजपूत सरदाराच्या पुत्राला देऊं केली होती. ती अठरा वर्षांची लावण्यवती कुमारिका होती. चितूराला शत्रूचा वेढा पडूं लागला त्या वेळेस तो आपले लोक बरोबर घेऊन किल्लेदाराच्या मदतीला आला होता. त्याचे लोक थोडेच; पण, चांगले लढवय्ये होते. त्या सरदारपुत्राचें नांव प्रतापसिंग होतें. रजपूताच्या अंगीं धाडस, शौर्य आणि दृढनिश्चय, हे तीन गुण उपजतच असावयाचे. शिवाय, तो तरुण, बुद्धिमान् आणि चांगला देखणाही होता; यामुळें, दुधांत साखर पडल्यासारखें झालें होतें.

त्रिपुरसुंदरीच्या अंगीं अद्यापि मदनाचें विशेष वारें शिरलें नव्हतें. प्रतापसिंग मात्र तिजवर आषक झाला होता. तिच्या सौंदर्याला तो लुब्ध झाला होता. तिच्या आईबापांनीं तो तिच्याकरितां वर बघून ठेविला होता. तो तिच्याविषयीं लोलुप होता, तसा तिच्या मनाचा ओढा त्याजकडे अद्यापि लागला नव्हता. त्याच्या अंगचे गुण तिला कळले होते; ह्यामुळें, आईबापांची वरयोजना तिला नापसंत नव्हती; तरी त्याच्याविषयीं तिच्या मनांत अद्यापि प्रेमभावाचा उदय जसा व्हावा तसा झाला नव्हता.

तिच्याबरोबर आपलें लग्न लवकर व्हावें अशी प्रतापसिंगाला उत्कंठा लागली होती. किल्ल्याला अकबरशाहाचा वेढा पडला होता त्याच वेळेस तो लग्नाविषयीं उत्सुक झाला होता. किल्ल्याची शिबंदी व तटबंदी मजबूत असल्यामुळें शत्रू हट्टास

पेटला होता. वेढ्याचें काम पुढें वरेच दिवस चालेल असें वाटल्यावरून तो आपलें लग्न लवकर जुळवून आणण्याच्या प्रयत्नास लागला. नंतर त्याची व त्या रजपूतकन्यकेची एकदां गांठ पडली, तेव्हां त्या उभयतांचें याप्रमाणें भाषण झालें.

प्रतापसिंग—सुंदरी, तारुण्य हा आयुष्याचा उत्तम काल होय. पण, तो हां हां ह्मणतां झट्दिशीं निघून जातो. सुखोपभोगाचा काल आपल्या वांट्यास फारच थोडा येतो; यासाठीं शहाण्यानें तो फुकट जाऊं देतां कामा नये. तूं मजवर प्रीति करितेस असें कळल्यानें आनंद होईलच, पण तूं माझी असें ह्मणण्याचा सुदिन कधीं प्राप्त होईल याची मी वाट पहात आहें.

त्रिपुरसुंदरी—प्रतापसिंगजी, ज्यापेक्षां माझ्या आईबापांनीं तुह्माला कन्यादानाचें वचन दिलेलें आहे, त्यापेक्षां योग्य समय आला ह्मणजे ती गोष्ट घडून येणारच आहे. पण, आपल्याभोंवतीं आज सैन्याच्या वेढ्यावरोबर दुसऱ्या अनेक संकटांचा वेढा पडला आहे. तो समूळ उठल्याखेरीज पाणिदान करावयाचें नाहीं, असा माझा पण आहे. तुह्मी पराक्रम करून आपल्या बाहुबलानें शत्रूचा वेढा उठवून त्याला किल्ल्यापासून हांकून लावाल तरच मी तुमची ह्मणवीन, आणि माझें सर्वस्व तुह्मास अर्पण करीन.

प्रतापसिंग—पण, यापासून आपल्या दांपत्यसुखाला विलंब लागेल. अशा अविवाहित स्थितींत मजकडून जो पराक्रम होईल त्यापेक्षां विवाहित स्थितींत चांगला होणार नाहीं, अशी तुला शंका वाटते कीं काय?

त्रिपुरसुंदरी—चांगला होईल कीं कसा होईल हें माझ्यानें सांग-

वत नाहीं; पण, शूर पुरुषाचें पाणी पाहून मी त्याला पाणिदान करणार. तुह्मी मर्द गाजी असल्याची कीर्ति मीं ऐकिली आहे, तरी, माझ्या डोळ्यांना ती प्रत्यक्ष दिसली पाहिजे. या वेळेस घोडामैदान जवळ आहे. प्रतापसिंग या नांवाप्रमाणें कृति करून दाखविण्याला ही संधि उत्तम आहे. प्रत्यक्ष कृति करून दाखवा, मग लग्नाची गोष्ट बोला.

प्रतापसिंग—असें, असें. सुंदरी, एकूण मी तुझ्या प्रीतीला खरोखर पात्र आहें अशी तुझी आधीं खातरी करून दिली पाहिजे असें तुझें ह्मणणें आहे; पण, ही तुझी मागणी जरा अविचाराची आहे असें मला वाटतें.

त्रिपुरसुंदरी—यांत अविचार कसचा? तुमच्यासारख्या शूर पुरुषाला यांत भारी वाटण्यासारखें कांहीं नाहीं. हातीं शस्त्र धरून शूरत्व करून दाखविण्यांतच प्रतापशूराला भूषण आहे.

प्रतापसिंग—तुझ्याबरोबर माझा विवाहविधि होतांच तुझी खातरी करून देईन कीं, रजपूताच्या नांवाला शोभण्यासारखाच या प्रतापाचा प्रताप आहे.

त्रिपुरसुंदरी—तुह्मी ह्मणतां तें कदाचित् खरें असेल, पण बाहेरचा वेढा कांहीं अझून उठला नाहीं. तो यवन एथून जोंपर्यंत कोणीं उठवून लावला नाहीं, किंवा मारला नाहीं, तोंपर्यंत माझ्या लग्नाची गोष्ट बोलूं नका. प्रतापसिंगजी, तुमची तलवार त्या दुष्टाच्या छातींत शिरण्याबरोबर मी तुमची झालें असें खास समजा. तुमचें काम आधीं तुह्मी करून दाखवा.

अकबरबादशाहाच्या सैन्यांत एक रजपूत जवान शिपाई होता. त्याचें नांव माधवसिंग. तो चितूरकिल्ल्यावरची नोकरी

सोडून देऊन बादशाहाच्या फौजेंत जाऊन राहिला होता. त्यानें आपल्या जातभाईशीं निमकहराम होण्याचें कारण असें झालें होतें:—

किल्लेदाराची धाकटी मुलगी त्रिभुवनसुंदरी. तिजवर त्याचें मन फिदा झालें होतें. तिचेंही मन त्याजवर लागलें होतें. पण माधवसिंगाचें कुल, शील आपल्या बरोबरीचें नसल्यामुळें तिच्या आईबापांच्या मनांत त्याला आपला जामात करण्याचें येईना. मातापितरांस तो वर पसंत नव्हता; ह्मणून, तिनें त्याचा नाद सोडून दिला होता. पण, ही गोष्ट माधवसिंगाच्या मनाला फार लागली. तिचा आपला विवाहसंबंध होण्याची आशा राहिली नाहीं, ह्मणून तो फार खिन्न झाला. आणि बसंतसिंगाची नोकरी सोडून तो शत्रुसैन्यांत सामील झाला.

तापट स्वभावाचे योद्धे असतात त्यांचें माथें फिरून जाण्यास उशीर लागत नाहीं. तो लागलाच निमकहरामी करण्यास प्रवृत्त झाला. तो शत्रूला मिळून जाऊन आपल्या घरावर आपणच विस्तव ठेवण्यास सिद्ध झाला. वेढ्याचें काम शेवटास जाण्यास जीं जीं साधनें कमी होतीं तीं तीं सर्व त्यानें शत्रूला दाखवून दिलीं. अकबर मोठा चतुर व धूर्त राजा होता. माधवसिंगाच्या पाठीवर हात फिरवून आपल्याला उपयोगी माहिती होती ती सर्व त्यानें त्याजकडून काढून घेतली. त्यानें आपल्या कामापुरतें त्याला हाताशीं धरिलें, तरी आपल्याकडचा भेद त्याला कळूं दिला नाहीं, आणि त्याजवर त्यानें विशेष विश्वासही ठेविला नाहीं. तो पुनः तिकडचा भेद्या होऊन आपल्याकडचा बेत चितूरच्या किल्लेदारास कळवील अशी त्याला सवडच साधूं दिली नाहीं. बादशाहाची आपल्यावर पूर्ण कृपा असून आपल्यावर त्याचा भरंवसा चांगला बसला आहे अशा भ्रमांत तो होता.

पण, पुढें तो भ्रमाचा भोंपळा फुटला. आपल्याविषयीं बादशाहाचें मन आपल्यास वाटतें तितकें स्वच्छ नाहीं असें त्याच्या दृष्टोत्पत्तीस आलें. तसें कळतांच त्याच्या अंगाचा संताप झाला. ज्यापक्षीं आपल्या वर्तनाचा बादशाहाच्या मनांत किंतु आला आहे, त्यापक्षीं आतां त्याच्याशींही दगाबाजी केली पाहिजे असें त्याच्या मनानें घेतलें. तो अत्यंत खुनशी व तामसी स्वभावाचा मनुष्य होता. मनांतला दुष्ट हेतू सिद्धीस नेण्यासाठीं तो मोठ्या धाडसाचें एक कृत्य करण्यास प्रवृत्त झाला. एका कामांत दोन कामें उरकून घेण्याचा त्याचा विचार ठरला. पुनः किल्लेदाराकडे जाऊन बादशाहाचीं छिद्रें तिकडे कळवून त्याचें मन आपल्याकडे वळवावें आणि त्याला सांगावें कीं, तूं त्रिभुवनसुंदरीला मला देण्यास कबूल असशील, तर तुझा शत्रू बादशाहा याला मी ठार मारून येतों. असें केलें ह्मणजे बादशाहाचा सूड उगवून किल्लेदाराची मुलगीही बगलेंत मारतां येईल.

पण, चितूरच्या किल्ल्यांत पुनः माधवसिंगाचा प्रवेश होतो कसा? ही अडचण प्रथमदर्शनीं दत्त ह्मणून त्याच्या दृष्टीसमोर उभी राहिली. ज्या बाजूला तटाची भिंत फार उंच होती आणि जिकडून शत्रूचे लोक वर चढून येण्याचा संभव नव्हता, त्या बाजूकडे किल्लेदारानें शिपाई थोडे ठेविले होते. आणि तिकडच्या अंगाला भीति नसल्यामुळें तेथील शिपाईलोकही गाफील रहात असत. त्या वाटेनें वर चढून जाण्याचा माधवसिंगाचा निश्चय झाला. मग वीत दीडवीत लांबीच्या कांहीं लोखंडी मेखा त्यानें आपल्याबरोबर घेतल्या, आणि एका काळोख्या रात्रीं कोणालाही कळूं न देतां तो त्या तटाच्या भिंतीजवळ गेला. रात्रीं लष्करांतून गेलों तर आपल्याला अडवितील ह्मणून दिवसाढवळ्या कांहीं बहाणा करून राजरोस रीतीनें पहारेकऱ्यांच्या अंगावरून पुढें निघून गेला. तो

तटाच्या भिंतीपाशीं जाऊन पोहोंचला. ती तटाची भिंत सुमारें ८० फूट उंच होती. एकावर एक धोंडे रचूनच ती तटबंदी केलेली होती. धोंडे चुन्यांत बसवून मजबूद केलेले नव्हते. दोन धोंड्यांच्या मध्यें मोठमोठ्या फटी होत्या. त्या वरपर्यंत होत्या. प्रथमच्या फटींत त्यानें एक मेख मारिली, ती जमिनीपासून दीड •पावणेदोन हात उंचीवर असून तिजवर तो चढून उभा राहिला. पुनः वीत दीडवीत उंचीवर आणखी एक मेख ठोकून तिजवरही तो चढला. हें काम अतिशय जीवावरचें होतें, तरी अशाच रीतीनें त्या अंधाऱ्या रात्रीच्या पोटीं मेखा मारीत व चढत तो तटबंदीच्या भिंतीवर जाऊन पोहोंचला.

एकदां एकाद्याची एकाद्या कामांत एकतान वृत्ति झाली ह्मणजे पुढें कितीही संकटें आलीं तरी त्याला त्याचें भान रहात नाहीं, असें ह्मणतात तें खरें. इकडे त्याचें भिंतीला मेखा मारण्याचें व चढण्याचें काम अंधेरामध्यें धीरे धीरे चाललें असतां वरचा पहारेवाला शिपाई रात्रीच्या निवांत वेळीं मोठ्यानें ताना घेत पहारा करीत होता. ही गोष्ट माधवसिंगाच्या फारच पथ्यावर पडली. मेखा मारतांना थोडासा नाद निघत होता तो गाण्याच्या नादांत पहारेवाल्याच्या लक्षांत आला नाहीं, ह्मणून माधवसिंगाचें वर चढून जाण्याचें काम सिद्धीस गेलें.

## भाग चौथा.

### माधवसिंगाला देहांतप्रायश्चित्त.

भिंत चढून जातांना माधवसिंगानें आपल्या अंगावरचे सर्व कपडे काढून टाकले होते. एक लंगोटा मात्र कसला होता. अंधारांत भिंतीकडे कोणाची नजर जाऊं नये ह्मणून त्यानें ही सावधगिरी केली होती. पहारेवाल्याचा सफेत पोषाख असल्यामुळें तो मात्र माधवसिंगाला काळोखांत दुरूनही स्वच्छ दिसला. तो वर जाऊन उभा राहिला तेव्हां पहारेकरी शिपाई मागें पुढें फिरून खडा पहारा करीत होता. त्याची नजर चुकवून झट्दिशी खालीं उडी मारून पहारेवाला उभा होता तेथें तो एकाद्या संभावित मनुष्याप्रमाणें त्याच्या समोर जाऊन उभा राहिला, आणि किल्ल्यावरच्या मनुष्याप्रमाणें त्याच्याशीं बोलत उभा राहिला. हा कोणी शत्रूकडचा मनुष्य असेल असा त्याला तिळमात्र संशय आला नाहीं. तो पहारेवालाही रजपूत होता. यामुळें आपल्या शिबंदीपैकींच हा एक शिपाई असेल असें समजून त्यानें त्याची चौकशी केली नाहीं. त्याला त्यानें पुढें खुशाल जाऊं दिलें. तेथून थोड्या अंतरावर एक शिवालय होतें. तेथें तो प्रातःकालपर्यंत पडून राहिला. पहांटेस उठून तो किल्लेदाराच्या भेटीस गेला, आणि ह्मणाला—किल्लेदारसाहेब, पुन्हा मी किल्ल्यांत कां आलों आणि कसा आलों याचें तुह्माला आश्चर्य वाटेल. मी

दगलबाज मनुष्य आहें अशी तुमची समजूत झाली असेल; पण, ती समजूत खोटी व चुकीची आहे अशी आतांच्याआतां तुमची खातरी करून देतों. तुमचा चितूरगड जमीनदोस्त करण्याचा बादशाहाचा निश्चय झाला आहे. तरी त्याचा बचाव करण्याची किल्ली माझ्या खिशांत मी घालून आलों आहें.

बसंतसिंग—जो दगलबाज मनुष्य एकदां आपला पक्ष सोडून शत्रूला जाऊन मिळाला त्याजवर पुनः कोण भरंवसा ठेवील ?

माधवसिंग—किल्लेदारसाहेब, मजपासून तुमचा पुष्कळ फायदा होण्यासारखा आहे. मी शत्रूच्या छावणींत जाऊन राहि-ल्यामुळें त्याचीं वर्मस्थानें मला खडानखडा कळून चुकलीं आहेत. मी तुह्मांला अशी छानदार युक्ति सांगतों कीं, तिच्या योगानें शत्रूनें आपलें लष्कर उठवून चालतें व्हावें. माझी शक्कल ग्रहण कराल तर तिजपासून किल्ल्यांतील लोकांचे प्राण वांचतील, आणि किल्ल्याचाही नाश हो-णार नाहीं.

बसंतसिंग—तू यापुढें आमच्याशीं दगलबाजी करणार नाहींस आणि इतःपर तुजवर भरंवसा ठेवण्यास हरकत नाहीं अशी माझी खातरी होण्यासाठीं प्रथम तू तिकडे जाऊन शत्रूच्या नाशाचीं व आमच्या बचावाचीं कोणतीं साधनें मिळविलीं आहेस तीं सांग पाहूं.

माधवसिंग—किल्ल्यांतील एकंदर लोकांचा व तुमचा फायदा होईल अशी एक सूचना करण्यासाठीं मी फिरून तुह्मां-कडे आलों आहें.

बसंतसिंग—कोणती युक्ति योजून आला आहेस हें अगोदर मला सांग.

माधवसिंग—एका गोष्टीचें मला वचन द्याल तर तुमचा शत्रू बादशाहा याला ठार मारून येण्याला मी तयार आहें.

वसंतसिंग—कसलें वचन पाहिजे तें मला आधीं स्वच्छ कळलें पाहिजे.

माधवसिंग—मीं ही कामगिरी बजाविली तर तुह्मीं आपली त्रिभुवनसुंदरी मला दिली पाहिजे.

वसंतसिंग—एवढ्या मोठ्या कामगिरीला तू मागतोस हें बक्षीस अगदींच थोडें आहे असें मी समजतों. एक नाहीं अशा दहा मुली दिल्या तरी तुझ्या उपकाराची फेड होणार नाहीं! यवनराजा माझ्या किल्ल्याला वेढा देऊन बसला आहे. याला तू ठार मारून आलास तर तुला मी आपली त्रिभुवनसुंदरी देईन. इतकेंच नाहीं, तर तिच्याबरोबर तुला चांगलें आंदणही देईन.

माधवसिंग—तें काम मजकडे लागलें. त्याला जीवंत ठेवणें किंवा मारून टाकणें ही गोष्ट माझ्या खुषीवर अवलंबून आहे.

वसंतसिंग—तू प्रथम मजवर नाखुष होऊन माझा सूड उगविण्यासाठीं शत्रूला जाऊन मिळालास अशी माझ्या दिलाची पक्की खातरी आहे. हें तुला नव्यानें सांगितलें पाहिजे असें नाहीं. एकदां एकाद्याच्या अंतःकरणांत कोणतीही अढी बसलेली असली ह्मणजे ती काढून टाकण्याचें काम परम दुर्घट आहे. तुझ्याविषयीं माझें मन दूषित झालेलें अद्याप कायम आहे. तें फिरण्यासारखें नाहीं, तरी तू जें काम करीन ह्मणतोस तें शेवटास नेशील तर मात्र मनांतील किंतू काढून टाकून मी दिलेलें वचन पुरें करीन.

याप्रमाणें किल्लेदाराचें वचन मिळतांच माधवसिंगाला फार समाधान वाटलें, परंतु आधीं एक वेळ त्रिभुवनसुंदरीची भेट व्हावी अशी त्यानें आपली इच्छा दर्शविली. त्या वेळेस—

वसंतसिंग—छे ! छे ! भेटीची गोष्ट सध्यां बोलूंच नको. अजून तुझ्यावरचा दगलबाजीचा आळ नाहींसा झाला नाहीं. तो जेव्हां नाहींसा करशील तेव्हांच तुझी व तिची भेट होईल.

माधवसिंग—काय ? एकूण माझ्या प्रामाणिकपणाचा तुझाला अजून अंदेशा आहे ?

वसंतसिंग—तुझ्या बोलण्याचा प्रत्यय येईपर्यंत तुजवर माझा भरंवसा कसा बसेल ? तू चितूराहून नाहींसा झालास, परंतु तुझ्या नांवाला डाग लागण्यासारखें वर्तन करण्याचा तुझा इरादा नव्हता, अशी माझ्या मनाची खातरी होई-पर्यंत तू फितूरी मनुष्य आहेस, अशा दृष्टीनेंच मी तुज-कडे पाहीन.

माधवसिंग—तर मग किल्लेदारसाहेब, मी जर तुमच्या दृष्टीनें दगलबाज व फितूरी मनुष्य आहें, तर मला जीवंत ठेव-ण्यापेक्षां तटावरून कडेलोट करून खंदकांत टाका ह्मणजे मी सगळ्या संकटांतून मुक्त होईन !

वसंतसिंग—छे ! छे ! तसें मी करणार नाहीं. तूं आपल्या ध-न्याच्या व देशाच्या कल्याणासाठीं हें जोखमीचें काम पतकरिलें आहेस; ह्मणून, या कामांत तुला अडथळा करण्याचें मी कधीं करणार नाहीं.

माधवसिंग—उद्यां चंद्रास्त झाला नाहीं तोंच तुमचा शत्रू मोंगल बादशाहा जर या दुनयेंतून मीं नाहींसा केला, तर तुमचा मजवर पूर्ववत् विश्वास राहील, असें मला आश्वा-सन मिळालें पाहिजे.

बसंतसिंग—तू आमच्या दुस्मानाला मारून टाकिलेंस तर तुजवर माझा व माझ्या लोकांचा भरंवसा पूर्ववत् राहील, असें मी तुला वचन देतों.

इतकें भाषण झाल्यावर तो पुनः अकबराच्या छावणींत जाऊन घुसला. तो छावणींतून एकाएकीं नाहींसा झाल्याची बातमी अकबराला लागलीच समजली होती; ह्मणून, तो छावणींत जाण्याबरोबर त्याला तिकडचे लोक शाहापुढें घेऊन गेले. तो पुढें येऊन उभा राहिल्यावर त्याचा चेहरा त्यानें सूक्ष्म दृष्टीनें पाहिला; पण, त्या धाडसी रजपूतानें आपला चेहरा तिळमात्र बदलला आहे असें दिसूं दिलें नाहीं.

अकबरशाहा—काय रे हरामखोरा, तू काल रात्रीं आमच्या छावणींतून एकाएकीं नाहींसा झाला होतास याचें कारण काय? तू रात्रीं कोठें व कशासाठीं गेला होतास?

माधवसिंग—आप खावंदांच्या हितासाठींच मी छावणी सोडून बाहेर गेलों होतों.

अकबरशाहा—आमचा लष्करी कायदा मोडून कोणी आमचें हित करीत असला तरी तसल्या हिताची आह्माला गरज नाहीं.

माधवसिंग—खावंद आमचे दुस्मान आहेत, तरी आप हुजूरच्या फायद्याकरितां मी चितूर किल्ल्यांत जाऊन हेराचें काम करून आलों. यांत मीं खोटें काम कोणतें केलें?

हें ऐकून बादशाहा क्षणभर स्तब्ध राहिला; परंतु, त्याची नजर एकसारखी त्या दगेखोराच्या चेहऱ्याकडे लागली होती. जणूं त्याच्या चेहऱ्यावर लिहिलेलीं अक्षरें तो लक्ष लावून वाचीत होता. मग तो ह्मणाला, 'तू तेथें जाऊन काय करून आलास? तिकडची नवीन खबरबात कोणती आणिली आहेस?'

माधवसिंग—नवीन वर्तमान एवढेंच समजलें आहे कीं, कि-

ल्यांतील चांगले निवडक निवडक बहाद्दर शिपाई एकीकडे काढून त्यांसहवर्तमान बाहेर पडून बसंतसिंग किल्लेदार उद्यां आपल्यावर छापा घालणार आहे. लढतां लढतां सर्वजण रणांगणावर पडूं, पण शत्रूला शरण जावयाचें नाहीं, असा किल्लेदाराचा दृढ संकल्प झाला आहे. आपल्याला गुप्त रीतीनें ठार मारण्यासाठीं त्यानें एक मारेकरीही तयार करून ठेविला आहे.

बादशाहा—तो मारेकरी कोण व कोठें आहे याची तुला कांहीं माहिती आहे का ?

माधवसिंग—तो खावंदांच्या छावणींतच कोठें तरी गुप्त रीतीनें लपून बसला आहे, अशी बातमी मिळाली आहे.

अकबर फार धूर्त पुरुष होता. तो असल्या क्षुद्रबुद्धि मनुष्याच्या कपटी वर्तनानें फसण्यासारखा नव्हता. त्याला मनुष्यस्वभावाचीं स्वरूपें चांगलीं ओळखितां येत होतीं. मी परधर्मी मुसलमान राजा असून याचें कांहींएक हित नसतां केवळ माझ्या हितासाठींच हा रजपूत शिपाई आपला जीव धोक्यांत घालण्याचें धारिष्ट करील असें कधीं घडणार नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खातरी होती, तरी त्यानें आपलें हृद्गत माधवसिंगाला कळूं दिलें नाहीं. मनांत आलेले विचार मनांतच दाबून झांकून ठेविले, आणि माधवसिंग तीर मारण्याच्या कामांत प्रवीण असल्याचें त्याला कळलें होतें, म्हणून अकबर त्याला म्हणाला— 'माधवसिंग, तू आपला तीरकमठा घेऊन मजबरोबर शत्रूच्या किल्ल्याजवळ चल.' त्यानें आपल्याबरोबर अगदीं थोडे लोक घेऊन तो किल्ल्याकडे चालत गेला. त्याच्या मागून घोडा हातीं धरून त्याचा मोतद्दारही चालला होता.

किल्ल्यापासून एका बाणाच्या टप्प्यांत सर्व मंडळी जाऊन

पोहोंचली. शत्रूकडची एक लहानशी टोळी आपल्यावर हल्ला करण्यासाठीं पुढें वाढून येत आहे असें किल्ल्यावरील शिपायांनीं पाहून ते त्या बाजूच्या तटबंदीवर भराभर गोळा झाले. किल्लेदार भला उंच व धिप्पाड पुरुष होता; यामुळें, तो सर्वांमध्यें ठळक दिसत होता. त्याला पाहून—

अकबरशाहा—माधवसिंग, आतां तुझें बोलणें खरें करून दाखविण्याचा हा वखत आहे. तो पहा किल्लेदार बसंतसिंग तटावर उभा आहे. त्याचा नेम धरून नेमका तीर मार, आणि तुझें हस्तकौशल्य कसें आहे तें मला दाखीव. उशीर लावूं नको.

बादशाहाचा हुकूम होतांच कमानीला तीर जोडून नेम धरण्याचा त्यानें आव घातला. अकबरशाहाचा घोडा हातीं धरून कांहीं अंतरावर मोतद्दार मागें उभा होता. त्याजकडे तो हळू हळू पाठीमागें सरला. बादशाहाची मंडळी उभी होती, तिच्या डाव्या अंगाला पांच चार हातांवर तो उभा राहिला. मोतद्दाराच्या नजीक उभा राहून माधवसिंगानें धनुष्याला बाण जोडला, आणि प्रथम किल्ल्याच्या तटबंदीकडे त्यानें त्याचा नेम धरिला. त्याच्या शरसंधानाकडे बादशाहाची व इतर मंडळीची नजर लागली होती. आतां पाव अर्ध्या क्षणांत त्याचा बाण सूंसूं करीत तटबंदीकडे जाईल असें मंडळीला वाटत होतें. इतक्यांत माधवसिंगानें एका एकीं बाजूला वळून तोच बाण त्यानें अकबरशाहावर सोडला. तो त्याच्या खांद्याच्या हाडांत जाऊन घुसला. लगेच त्यानें आपलें धनुष्य खालीं टाकून देऊन कमरेची कट्यार उपसून ती मोतद्दाराच्या छातींत खुपसली. मग त्यानें हातीं धरलेल्या घोड्यावर स्वार होऊन घोड्याच्या बरगडींत टांचा मारून तो बिजेसारखा

चितूराकडे निघून गेला. हा प्रकार घडण्यास एकदोन अंक मोजण्याइतकाही काळ लागला नाहीं.

शाहाजवळ कांहीं सरदार उभे होते ते वेड्यासारखे एकमेकांकडे (इकडे तिकडे) पाहात उभे राहिले. शाहाचे डोळे क्रोधानें लालभडक झाले; पण, त्यानें तोंडांतून एक अक्षरही काढलें नाहीं. तो तसाच मुकाट्यानें आपल्या तंबूवर चालत गेला. तेथें त्याच्या खांद्यांत घुसलेला बाण ओढून काढला. कांहीं दिवस त्या व्यथेनें तो पलंगावर पडून राहिला. बाहेर पडण्याचें त्याला अवसान राहिलें नव्हतें. जखम भरून चांगली बरी होण्याला सुमारें पंधरा दिवस लागले.

तिकडे बाण मारून माधवसिंग चितूरच्या वेशीजवळ दौडत गेला. तो आपलाच मनुष्य आहे असें समजून वेशीचा दरवाजा उघडून आंतील लोकांनीं त्याला आंत घेतलें. त्याची वर्दी वेशीवरच्या अंमलदारानें लागलीच किल्लेदारास दिली. माधवसिंग किल्लेदारास जाऊन भेटला. तेव्हां—

माधवसिंग—किल्लेदारसाहेब, आपण सांगितलेली कामगिरी बजावून मी आलों. आतां आपलें वचन पुरें करा. आंताच्याआतां तुमच्या त्रिभुवनसुंदरीला माझ्यापुढें आणून उभी करा. एका बाणानें तुमच्या मुख्य शत्रूला ठार करून आलों.

बसंतसिंग—तूं कदाचित् बाण मारला असशील; पण, त्यानें तो ठार झाला असें कशावरून ?

माधवसिंग—हें काय विचारतां ? तो आतां जीवंत असल्याची शंका सुद्धां मनांत आणूं नका. माझा बाण, आणि तो वायां जाईल ?

बसंतसिंग—तूं केलेला करार बरोबर रीतीनें पूर्णतेस नेलास

अशी माझी पक्की खातरी होईल, तरच तुला दिलेलें वचन पुरें करीन.

या गोष्टीला कांहीं दिवस झाले. चितूरांत पक्की बातमी कळे-पर्यंत किल्लेदारानें माधवसिंगाला नजरकैदेंत ठेविलें होतें. शह-रांत बातमी पसरली कीं, बादशाहाला बाण लागला होता खरा; पण, ती जखम बरीच बरी होत चालली आहे.

वसंतसिंग—(मग माधवसिंगाला आपल्या पुढें बोलावून नेऊन) तूं पतकरलेली कामगिरी तुझ्या हातून बरोबर झाली नाहीं. (कपाळाला आंठ्या घालून) तेव्हां दिलेलें वचन पुरें कर-ण्याच्या बंधनांतून मी मुक्त झालों. तुझ्या कृतीनें तूं दो-घांशींही दगलबाजी केलीस, त्याचा आतां तुला मी मोब-दला देतों. तूं निमकहरामपणा केला होतास, तरी सोंप-लेलें काम तुझ्या हातून चांगलें शेवटास जातें तर त्यांत तुझा आपमतलब होता तरी तुला जीवदान देऊन माझी त्रिभुवनसुंदरीही तुला अर्पण करावी लागती; पण, तसें करण्याचें आतां प्रयोजनच राहिलें नाहीं. तू विश्वासघा-तकी आणि फितूरी मनुष्य आहेस, सबब तुला मृत्यूचीच शिक्षा देणें रास्त आहे.

इतकें बोलून किल्लेदारानें बादशाहाच्या नांवाचा एक खलिता लिहून बरोबर दहा वीस असामी शिपाई देऊन माधवसिंगाला अकबराकडे रवाना केलें. खलित्यांत त्यानें लिहून कळविलें कीं, या दगलबाज मनुष्याला तुह्मांकडे पाठविलें आहे. त्याला तुह्मांस योग्य वाटेल ती शिक्षा देण्यास तुह्मी मुखत्यार आहां! यानें दो-होंकडेही दगलबाजीचें वर्तन केलें आहे!

बादशाहा खूप होऊन त्यानें किल्लेदाराला बहुमानाचें उत्तर देऊन कैदी माधवसिंगाबरोबर गेलेले शिपाई परत पाठविले. पुढें

बादशाहानें एक मदोन्मत्त हत्ती आपल्या समोर आणविला. त्याच्यापुढें जाऊन उभा रहा ह्मणून माधवसिंगाला त्यानें हुकूम केला. त्याला त्याची बिलकूल भीति वाटली नाहीं. त्याच्या चेहऱ्याचा यत्किंचितही रंग बदलला नाहीं. तो आपले हात एकांत एक गुंडाळून छाती पुढें करून त्या गजराजापुढें जाऊन उभा राहिला. एक वेळ त्यानें बादशाहावर तिरस्कारपूर्वक नजर फेंकिली. तींत त्यानें स्पष्ट दर्शविलें कीं, मृत्यु मृत्यु ह्मणजे कःपदार्थ! मी त्याला रतीभरही भीत नाहीं! मग बादशाहाचा माहुताला करांगुलिनिर्देश होण्याबरोबर हत्तीच्या कानशिलांस त्यानें दोहींकडून अंकुश टोंचून तो कैद्याच्या अंगावर सोडला. त्यानें त्याला एका क्षणांत आपल्या सोंडेंत गुंडाळून घेऊन जमिनीवर उताणा पाडून त्याच क्षणीं त्यावर पाय दिला! त्याबरोबर त्याची शेंदाडासारखी स्थिति झाली! त्या निमकहराम रजपूताचा अशा रीतीनें अंत झाला!

# भाग पांचवा.

## अकबराला ठार करण्याचा दुसरा प्रयत्न.

चितूरच्या वेढ्याचें व लढाईचें काम बादशाहानें अधिक जोरानें चालविलें. त्यानें आपल्या सरदारांस हुकूम दिले कीं, मोर्चेबंद्या बांधून फौजेनें किल्ल्याकडे चाल करावी. ते एक एक गोळीच्या टप्यावर मोर्चेबंद्या करीत गेले. त्यांच्या आश्रयानें शिपाई लोक किल्ल्याच्या तटबंदीला जाऊन भिडले. नंतर सुरुंग्यांनीं पुढें चाल करून तटाच्या भिंतीच्या पायाशीं कांहीं सुरुंग पाडून त्यांत त्यांनीं दारू भरून ठेविली. सुरुंगांना प्रथम बत्ती देऊन हल्ला करणारे शिपाई पुढें वाढत गेले. सुरुंग्यांनीं प्रत्येक बुरजाखालीं ठिकठिकाणीं सुरुंग भरून ठेविले होते.

चितूरचा किल्ला पाडाव केल्याखेरीज माघारें फिरावयाचें नाहीं अशी अकबरानें प्रतिज्ञा केली होती. या कामांत कितीही घस सोसावी लागली, कितीही पैसा खर्च करावा लागला व कितीही मनुष्यहानि झाली, तरी हार घ्यावयाची नाहीं, असा त्याचा दृढ संकल्प झाला होता. सुरुंग पाडण्याच्या कामावर त्याची स्वतःची पैरवी होती; यामुळें, तें काम सुरुंग्यांनीं फारच जलद व चांगलें केलें होतें. शत्रू अगदीं तटाशीं येऊन भिडला असें पाहून, किल्ल्यावरच्या रजपूतांनीं तटावरून श्रावण-झडीप्रमाणें गोळ्यांचा वर्षाव केला. त्यांनीं गोळीबाराचा मारा

एकसारखा चालू ठेविला. अकबराची फौजही शिपायगिरींत चांगली नाणावलेली होती. तिनें किल्ल्यावरच्या माराला बिलकूल जुमानलें नाहीं. रजपूतांचा मारा मंद पडत चालला.

बादशाहा स्वतः उभा राहून आपल्या फौजेला उत्तेजन देत होता; यामुळें, फौजेला व सुरुंग्यांना अधिकच हुरूप येऊन त्यांनीं आपलें काम फारच तत्परतेनें व सुरेख रीतीनें केलें. मोंगल शिपायांनीं आपलें प्रचंड बाहुबल व्यक्त करून दाखविलें. किल्ल्यांतून जितके हल्ले त्यांच्यावर झाले तितके सर्व त्यांनीं माघारे फिरविले. रजपूतांच्या शौर्यश्रीला त्यांनीं अगदीं निस्तेज करून टाकलें. अकबरशाहा आपल्याकडचा कोण सरदार लढाईचें काम कसें करीत आहे हें लक्षपूर्वक पहात होता. त्याचें लक्ष नुसतें सरदारांवरच होतें असें नाहीं. कोणत्या शिपायानें ध्यानांत ठेवण्यासारखी मर्दुमी केली हेंही त्याच्या लक्षांत होतें; यामुळें, शिपायांचें प्रेम बादशाहाच्या ठिकाणीं फारच जडून प्रत्येक शिपाई उद्या झुंजाला न शिवतां सवतें सवतें यश संपादण्यासाठीं झटूं लागला, यामुळें सर्वांमध्यें वीरश्री उत्पन्न झाली. ती चढाओढ पाहून बादशाहा खूषखूष झाला. तें त्यांचें अचाट कर्म पाहून चितूरच्या बहाद्दर रजपूत शिपायांनींही आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. शत्रू जों जों नजीक भिडत चालला आणि त्याची जों जों सरशी होत चालली, तों तों रजपूतांमध्यें मोठी गडबड उडाली. त्यांनीं तटावरून शत्रूवर वरचेवर केलेले हल्ले अगदीं निष्फल झाले. किल्लेदाराची शूर पत्नी गुलाबबाई ही रोज तटावर उभी राहून लोकांना उत्तेजन देऊन आपल्या पतिराजाला मदत करीत होती. अशा शूर स्त्रीला अबला कोण ह्मणेल ? शेवटीं अकबराच्या शिपायांनीं तटाला शिड्या लावून वर चढण्याचा प्रयत्न चालविला; पण, वरच्या शिबंदीनें तो प्रयत्न सिद्धीस जाऊं दिला नाहीं. शा-

त्रूचे कांहीं लोक मोठ्या कष्टानें भिंतीवर जाऊन उभे राहिले, तेव्हां किल्लेदाराच्या शूर स्त्रीनें त्यांपैकीं कैक शिपायांना आपल्या हातानें तटावरून खालीं ढकलून दिलें! याप्रमाणें पुरुषाचें शौर्यकर्म त्या स्त्रीनें आरंभिलें.

गुलाबबाई—साहेबजी, एक वेळ दुस्मानाच्या गोटांत जाऊन त्याच्या काळजाला हात पोहोंचतो कीं नाहीं, हें पाहावें अशी मला इच्छा झाली आहे. मला तिकडे जाण्यास तुमची रजा मिळाली पाहिजे.

बसंतसिंग—गुलाब, तू त्याच्या काळजाला खचीत हात घालशील अशी तुझी खातरी असल्यास माझी ना नाहीं. जा पाहिजे तर, पण तूं त्याचा सूड घेण्यास युक्ति कोणती योजिली आहे?

गुलाबबाई—युक्ति आयत्या वेळेस सुचेल ती खरी. मी प्रथम अकबरशाहाच्या डेऱ्यावर एकटी जाणार, मग या किल्लेदारणीच्या हातानें जें काय घडेल तें पहालच!

शत्रूच्या गोटांत जाण्याचा तिचा निश्चय झाला. मग तिनें सभ्य चालीचा शुभ्र पोषाक केला, आणि फुटक्या तीनसांजा रुद्रवीणा हातांत घेऊन ती एकटी बादशाहाच्या छावणीकडे निघाली. पस्तीस वर्षांच्या उमरींतही तिचें सौंदर्य कायम होतें. ती थोरल्या दरवाजानें आंत शिरूं लागली, तेव्हां संत्र्यानें तिला मज्जाव केलें. ती ह्मणाली, 'मी रुद्रवीणा वाजविण्याची कला शिकलें आहें. मौला अल्काब् अकबरशाहाला आपल्या अंगचा थोडासा गुण दाखवावा ह्मणून एक स्त्री आली आहे अशी त्यांना वर्दी द्या.' ती एकटीच गेली होती, तिजबरोबर दुसरें कोणी नव्हतें, ह्मणून एकटीला आंत सोडिलें तर आपल्यावर जोखम नाहीं असें त्याला वाटलें, ह्मणून बादशाहाला तिच्या आगमनाची वर्दी

दिली. कोणी रुद्रवीणा वाजविणारी एक हिंदु स्त्री आपल्या अंगच्या गुणाची हजीरी द्यावी ह्मणून हुजूर कदमापाशीं येण्यास रजा मागत आहे, असें शाहाला कळविलें. बादशाहा दिवसा काम करून थकला होता. फार दिवसांपासून चितूराला गराडा दिला आहे; पण, या मोहिमेचा परिणाम कसा होणार या चिंतेंत तो निमग्न झाला होता. अशा समयास एकाद्या करमणुकीची कोणालाही आवश्यकता असतेच. तिची वर्दी मिळतांच आपल्या पुढें तिला रुजू करण्याची बादशाहानें परवानगी दिली. ती त्याच्या समोर जाण्याबरोबर तिची संभावितपणाची चर्या आणि भव्य मुद्रा पाहून तो चकित झाला. त्यानें लागलेंच ताडलें कीं, हिचा रुद्रवीणा वाजविण्याचा नेहमींचा धंदा नसावा. यांत कांहींतरी काळेंबेरें आहे. कांहीं दगाबाजीचा प्रकार असावा. त्यानें मग एका खास तैनातीच्या सरदाराला सक्त हुकूम दिला कीं, बायका असोत वा पुरुष असोत आणि ते कसलीही सबब सांगोत, माझ्या परवानगीवांचून आतां दरवाजांतून कोणालाही येऊं देऊं नये. नंतर तो तिच्याकडे वळून ह्मणाला, 'कां बाई, तुह्मी कोठें असतां ? इकडे कां आलां ? तुमची इच्छा काय आहे ?'

गुलाबबाई—गरीब परवर, आप खाविंदांची ज्यांच्यावर मर्जी बहाल होते, ते रंकांचे राव होतात. त्यांना मोठाल्या देणग्या मिळतात, अशी आप हुजूरची कीर्ति आहे. मी रुद्रवीणा वाजवीत असतें. आप हुजूर गुणपरीक्षक आहांत, ह्मणून या कदमापाशीं आलें आहें.

बादशाहा—ठीक आहे. मीं रुद्रवीणा बऱ्याच दिवसांत ऐकिला नाहीं. अशा जवळ येऊन बसा, आणि एक दोन रागदाऱ्या वाजवून दाखवा. तुमच्या स्वरूपाला अनुरूप तुमचा हा गुण असला तर खरोखर आह्माला ही एक क्षणभर करमणूकच होईल. मला या समयीं ती पाहिजेच आहे.

ती मग बादशाहाच्या समोर जाऊन बसली, आणि विण्याच्या तारा मिळवूं लागली. त्या वेळेस तो तिजकडे बारीक नजरेनें पहात होता. तेव्हां हा माझा कपटप्रयोग ओळखितो कीं काय, अशी तिला भीति वाटली; तरी, ती आपली चर्या बदलूं न देतां रागदारी काढूं लागली. प्रथम तिनें एक दोन राग छडून खडे केले. ते ऐकून अकबरशाहा खूष झाला. पुढें तिनें यमन, कल्याण, खमाज, वगैरे रागदाऱ्यांचें काम फारच उत्तम केलें. ती वाजविण्याच्या कामांत अगदीं गर्क झाली होती. इकडे बादशाहा तिचें वादनपटुत्व पाहून गारीगार झाला. बादशाहाला गाण्याचें व सतार, रुद्रवीणा, तौस, सारमंडळ, वगैरे वाद्यें वाजविण्याचें ज्ञान चांगलें होतें. त्यानें गायक लोकांसाठीं सुमारें २०० उडदू पद्यें स्वतः रचून ठेविलीं होतीं तीं अद्यापि गायनपटु लोकांच्या तोंडीं आहेत. त्याला गायन-वादन-शास्त्रांचें जितकें ज्ञान होतें, तितकें त्या कालीं कोणालाही नव्हतें. त्याच्या समोर नित्य गायन[1] व वादन होत असे. असो. गुलाबबाईचा रुद्रवीणा चालत असतां आनंदाच्या भरांत तो आपलें देहभान विसरला. डोळे मिटून तो मान डोलवीत होता. ती संधी साधून तिनें हळूच आपली लहानशी लखलखीत कट्यार बाहेर काढली आणि ती त्याच्या पोटांत खुपसण्याच्या बेतांत होती, इतक्यांत त्याची नजर

१. ऐन-इ-अकबारींत लिहिलें आहे कीं, अकबरशाहाच्या पदरीं एकापेक्षां एक वरचढ असे छत्तीस गवई होते. त्यांमध्यें जगविख्यात तानसेन हा मुख्य होता. त्याच्या खालोखाल दुसऱ्या प्रतीचा रामदास म्हणून होता. हिंदुस्तानांत तानसेनासारखा उत्तम गवई एक हजार वर्षांत दुसरा कोणी झाला नाहीं. बहुतेक सर्व गवई ग्वालेरकडचे राहणारे होते. एक कोट रुपये देऊन तानसेनास रेवाच्या राजानें नेलें होतें. परंतु अकबरशाहाला त्याच्यावांचून करमेना, म्हणून पुनः त्यानें त्यास आपल्या दरबारीं बोलावून घेतलें.

तिजकडे जाऊन तिचें मणगट धरून तिच्या हातांतलें हत्यार त्यानें काढून घेतलें. मग—

अकबरशाहा—(मोठ्यानें हांसून) बाई, तुझ्या वादनपटुत्वाचा शेवट फार चांगला झाला!

गुलाबबाई—(तरी त्या स्त्रीनें न डगमगतां उत्तर केलें तें असें.) माझा मूळबेत होता तो फसला! उपाय नाहीं! आतां माझ्या कर्माचें फळ भोगण्यास मी तयारच आहें! आप हुजूरचा काय हुकूम असेल तो सुनवावा! मी मृत्यूची बिलकूल पर्वा करीत नाहीं. पुढचा परिणाम जाणूनच मीं या घोर कृत्याला हात घातला होता. मी सतीचें वाण हातीं घेऊनच आलें होतें. आतां तुह्मी पाहिजे तसे हाल करा व पाहिजे ती शिक्षा करा. त्याची मला फिकीर नाहीं. ज्यांना तुह्मी वेढा देऊन बसलां आहां त्यांच्या शौर्याची व सूडाची अटकळ या माझ्या धाडसावरून तुह्माला थोडीशी तरी करितां येईल! तुह्मी आह्मा मूर्तिपूजक हिंदूंचे कट्टे दुस्मन आहां. तुमचा सूड उगविण्यासाठीं चितूरचा लहान मोठा प्रत्येक प्राणी आपलें शिर हातीं घेऊन तयार झाला आहे. मृत्यु कोणत्याही रूपानें आला तरी त्याच्याशीं सामना करण्यास आमचे पुरुष, स्त्रिया व मुलें सिद्ध आहेत!

अकबरानें तिला कांहीं उत्तर दिलें नाहीं. फक्त तिला एका तंबूंत ठेवून रात्रभर तिच्यावर सक्त पहारा ठेविला होता. दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं तिला मेण्यांत बसवून, व कांहीं शिपाई बरोबर देऊन तिला चितूरच्या रामपोळ दरवाजाजवळ सोडून दिलें. मेण्यांत बसवितांना त्यानें तिला आपल्या समोर आणवून इतकेंच सांगितलें कीं, 'मोंगलांचा बादशाहा स्त्रियांबरोबर लढण्यास आलेला नाहीं.' गुलाबबाई

## भाग सहावा.

### गुलाबबाईचा मानी स्वभाव आणि अकबरशाहाचें विलक्षण औदार्य.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बसंतसिंग व गुलाबबाई किल्ल्याच्या तटबंदीची तपासणी करीत होतीं. शत्रूच्या छावणींत विशेष गडबड उडाली, तेव्हांपासून किल्ल्यावर त्याचा मोठा हल्ला होईल असें घटकोघटकीं वाटूं लागलें होतें; म्हणून, त्याच्या निवारणार्थ जी जी तरतूद सुचली ती ती त्यानें आगाऊ करून ठेविली. जे बुरूज अधू व ठेंगणे होते ते मजबूद व उंच करून त्यांच्या पुष्टीसाठीं त्यांच्या मागें आणखी नवीन बांधकामें चालू केलीं होतीं. तीं कशीं चाललीं आहेत हें पाहण्यांत किल्लेदार गुंतला होता. इतक्यांत तटाच्या भिंतीशीं अकस्मात् भयंकर गडगडाट झाला. त्या गडगडाटानें वेढा घालणारेही घाबरले. त्या प्रचंड अपघातानें तटावर उभे राहिलेले शिपाई धडाधड तोंडघशीं पडले. जेथें तटाची भिंत अगदीं ठेंगणी होती तेथें तिचा बराच मोठा भाग खालीं ढांसळला. त्या ठिकाणीं मोठें खिंडार पडलें. पुनः पहिल्यापेक्षांही अधिक भयंकर असा आणखी एकदां आवाज झाला. त्यानें दुसऱ्या ठिकाणीं मोठें भगदाड पडलें. जाण्यायेण्याला दोन मोठे दरवाजे झाले. बाहेरून शत्रूच्या लोकांनीं दोन

ठिकाणीं सुरुंग भरून ठेविले होते ते उडाल्यानें तटबंदीची नासाडी झाली. पडलेल्या भगदाडांतून आंत शिरून शत्रूची फौज एकदम आपल्यावर हल्ला करील असें वाटून तिच्या प्रवेशाला प्रतिबंध करण्याकरितां आंतील लोक पडलेल्या खिंडारांपाशीं गोळा झाले. त्यांनीं जणूं तेथें माणसांची भिंतच उभी केली. शत्रूचे लोक एकदम किल्ल्यांत शिरून हल्ला करून कत्तल करतील असें वाटलें होतें; परंतु, तसें त्यांजकडून घडलें नाहीं. त्याचें कारण हें होतें:–सुरुंग उडाल्याबरोबर किल्ल्यावर हल्ला करण्यासाठीं निवडक निवडक दोन हजार शिपाई अकबरशाहानें निराळे काढून ठेविले होते. एक सुरुंग उडाल्याबरोबर ते लोक पुढें सरले. त्यांची कल्पना अशी होती कीं, दोन्ही ठिकाणचे सुरुंग एकदम उडतील; ह्मणून, हजार हजार लोकांच्या दोन टोळ्या निरनिराळ्या होऊन भगदाडांत शिरण्यासाठीं त्या एकामागून एक पुढें सरल्या. पण, त्या वेळेस एकच सुरुंग उडून त्या जागीं पुढची टोळी पोहोंचली, आणि दुसरी टोळी मागून जात होती तिला पायांखालीं अकस्मात् धरणीकंपासारखा अचका बसला. तिची लागलीच फांकाफांक झाली. पायांखालची जमीन फाटून दुभंग झाली. जे लोक सुरुंगावर उभे होते ते पतंगासारखे अस्मानांत उडाले. कित्येकांचे हस्तपादादि अवयव झाडावरच्या फांद्या विद्युल्लतेनें गळून पडाव्या तसे तुटून पडले. त्या वेळच्या भयंकर स्थितीचें वर्णन करण्यास आमची लेखणी असमर्थ आहे. तो देखावा कल्पनेनेंच मनांत आणावा! त्या ठिकाणीं शत्रूचीं चारशेंहून अधिक माणसें व पंधरा वीस सरदार ठार झाले!

या आकस्मिक अपघातानें हल्ला करणाऱ्यांच्या छात्या शिथिल झाल्या. त्यांना मूळचा हुरूप राहिला नाहीं. गडबड शांत होईपर्यंत राहिलेले लोक चित्रासारखे तटस्थ उभे राहिले. पण, तें त्यांचें उभें

महामानी स्त्री होती. त्याला ती ठार मारण्यास उद्युक्त झाली असून आपल्या मनाचें अशा रीतीनें त्यानें औदार्य व्यक्त केलें, तेव्हां तिला जखमांवर डागण्या दिल्यासारखें झालें. इतकें झालें तरी त्याला ठार मारण्याचा तिचा निश्चय ढळला नाहीं. तो बेत सिद्धीस नेण्यासाठीं ती आपल्या जीवावर उदार झाली होती. तो मोठा कीर्तिमान् राजा होता व त्याचें सैन्य अत्यंत बलाढ्य होतें; पण, त्याचें तिला महत्त्व व आश्चर्य वाटेनासें झालें होतें. तिचा योजलेला बेत फसला त्या घटकेपासून किल्ल्याभोंवतीं गराडा पडलेला होता तो उठवून लावण्याची तिला फारशी आशा राहिली नाहीं. शौर्य आणि मृत्यूला न भिणें हे रजपूतांचे दोन मुख्य गुण अकबरशाहाच्या अंगीं पूर्णपणें वसत आहेत असें तिला दिसून आलें. पराक्रमशाली पुरुषांमध्यें हे गुण असावयाचेच; पण, यांशिवाय आणखी कित्येक सद्गुण त्याच्यामध्यें होते ते तिला दिसून आले. ते गुण दुसऱ्या कोणांत नव्हते. तिनें आपला पतिराज बसंतसिंग याला स्वच्छ बोलून दाखविलें कीं, साहेबजी, ज्या लोकांना सुदैवानें असला सर्वोत्तम मोहोरा मिळाला आहे त्यांनाच शेवटीं जय मिळणार, हें खास आहे. पुन्हा ती आवेशानें ह्मणाली—आमच्या तटावर उभे राहून आमच्या धर्मासाठीं व किल्ल्यासाठीं शेवटपर्यंत लढून आह्मी प्राण देऊं; पण, शाहाला इतिहासांत आपल्या जयाचीं अक्षरें आमच्या रक्ताच्या शाईनें लिहावयास लावूं!

बसंतसिंग—गुलाब, इतक्यांतच आपण इतकें निराश होण्याचें कारण नाहीं. आपल्या शिबंदीची ईर्षा अद्यापि कायम आहे, लोक कायम आहेत आणि त्यांचा मनोत्साहही कायम आहे. आणखी पांच सहा महिने पुरेल इतकी आपल्या किल्ल्यांत अन्नसामग्री आणि दारूगोळी शि-

लक आहे. आणखी या लढाईचा निकाल आतां फार लांबणीवर पडेल असें वाटत नाहीं. लवकरच शेवट लागेल; पण, शेवटीं चितूरचे मालक मुसलमान होतात, कीं रजपूत राहतात, हें मात्र सांगवत नाहीं. जगदीशेच्छा कशी आहे न कळे.

गुलाबबाई—साहेबजी, जी बायको त्याचा प्राण घेण्यालाही तयार झाली होती तिला उलट जीवदान देऊन ज्या थोर व उदार अंतःकरणाच्या पुरुषानें फिरून तिला आपल्या गोटांत व गणगोतांत सुरक्षित नेऊन पोहोंचविलें तो पुरुष सामान्य कोटींत गणतां येत नाहीं. त्याच्या हाताखालचे सरदार तलवारबहाद्दर आहेत, त्याची फौज मोठी आहे आणि शूर आहे. तोही स्वतः रणशूर असल्याची ख्याति सर्वत्र गाजत आहे. इतक्या जरी गोष्टी खऱ्या आहेत, तरी शौर्यापेक्षां त्याच्या महौदार्याचीच भीति सर्वांनीं अधिक बाळगिली पाहिजे. या अलम दुनयेंतून एवढा जगप्रसिद्ध शत्रु माझ्या हातून नाहींसा झाला असता तर ज्या कीर्तीला मोल नाहीं, जरा नाहीं आणि मरण नाहीं, अशी माझ्या नांवाची कीर्ति मागें राहिली असती!

बसंतसिंग—अग वेडे, या तुझ्या भाषणांत शत्रूच्या स्तुतिस्तोत्राचीच तूं कमाल केलीस! बस, पुरे कर आतां!

गुलाबबाई—त्या पुरुषाची योग्यताच तशी आहे. मी त्याचें स्तुतिस्तोत्र जितकें गाईन, किंवा त्याच्याशीं जितका वैरभाव ठेवीन, तितका थोडा आहे! त्याला या जगांतून नाहींसा करण्यासाठीं सर्व आप्तस्वकीयांचा बळी पाडण्यासही मी तयार आहें!

राहणें रजपूतांच्या पथ्यावर पडलें. किल्ल्याच्या बचावाची तरतूद करण्यास त्यांना थोडा वेळ मिळाला. मुसलमान शिपाई छात्या काढून खिंडाराकडे निघाले; पण, त्यांचा मूळचा मनोत्साह कायम राहिला नव्हता. वेढ्यांत सांपडलेले रजपूत शौर्यश्रीनें उत्तेजित होत्साते शत्रूच्या अंगावर चालून गेले. मेलों तरी बेहेत्तर; पण, कुडींत प्राण असेपर्यंत खिंडारांतून शत्रूचा प्रवेश किल्ल्यांत होऊं द्याव-याचा नाहीं, असा त्यांचा दृढ निश्चय झाला. शत्रूनें खिंडारांत शिरण्याचा जितके वेळां प्रयत्न केला, तितक्या वेळां त्यांनीं त्यांना भोंसकून मागें हटविलें. शेवटीं नाइलाज होऊन मुसलमानी फौज माघारी परतली. ती अगदीं नाउमेदीनें निघाली. तिच्या चे-हऱ्यावर पराभवाची छाया नव्हती, तरी विजयीपणाचा तजेलाही तिजवर नव्हता. सुरुंगांच्या आकस्मिक अपघातानें मनांत धरलेला हल्ल्याचा बेत सिद्धीस गेला नाहीं, असें खुद्द अकबरशाहालाही कळून चुकलें. तो मग घोड्यावर स्वार होऊन मागें हटलेल्या लोकांकडे धांवत गेला. त्यांचा निरुत्साह पाहून त्यानें त्यांना दीलदिलासा दिला. त्यांचीं कोमेजून गेलेलीं सुमनें प्रोत्साहनानें प्रफुल्लित केलीं, तेव्हां त्यांना हल्ला करण्यास नवीन स्फुरण आलें. त्यांच्या उमेदी ताज्यातवान्या झाल्या. किल्ल्यावरच्या लोकांनीं खिंडारें बुझवि-ण्याचें काम फार झपाट्यानें चालविलें. एका रात्रींत, सकाळीं उजाडलें नाहीं तों, चिखलमातीची जाडी भिंत घालून त्यांनीं खिंडारें भरून काढलीं. चिखल ओला असल्यामुळें भिंतीवर निसरडें झालें होतें, हा एक त्यांचा फायदा झाला. वर चढून जाण्याला शत्रूचा इलाज चालेनासा झाला, तरी त्याची नाउ-मेद फार वेळ टिकली नाहीं. पुनः जास्ती उमेदीनें तो किल्ल्यावर हल्ला करण्यास तयार झाला. अडचणी आल्या तरी अकबरशाहा मागें हटणारा पुरुष नव्हता. त्या जों जों वृद्धिंगत होत तों तों

त्याला अधिकाधिक स्फुरण चढे. अढळ निश्चय ठेवून तो शांतपणें आपल्या हाताखालच्या सरदारांस हुकूम सोडीत होता. पूर्ण जय मिळाल्याखेरीज त्याच्या मनाचें पूर्ण समाधान व्हावयाचें नाहीं, असें त्याच्या कृतीवरून दिसलें. त्याचे शिपाई आपल्या अंमलदारांचे हुकूम मोठ्या आनंदानें झेलूं लागले. त्यांचा नुकताच हिरमोड झाला होता तरी ते लवकर ताजेतवाने दिसूं लागले. आंतील रजपूत लोकही कमी सावध होते असें नाहीं. आलेल्या व येणाऱ्या अडचणी दूर करण्याचे त्यांचे उपाय चालू होते. थोडक्याच अवकाशांत त्यांनीं भिंतीचें बांधकाम इतकें मजबूद करून टाकिलें कीं, तेथें सुरुंग उडून खिंडारें पडलीं होतीं अशी शंकाच येऊं नये.

पहिले सुरुंग उडाल्याला बरेच दिवस झाले. बादशाहानें पुन: दुसरे सुरुंग भरण्याचा हुकूम दिला. सुरुंगे सुरुंग पाडण्याचें काम रात्रीच्या वेळेस करीत. एक्या रात्रीं शाहा स्वत: त्या ठिकाणीं जाऊन काम करणाऱ्या लोकांस सुरुंग कसे व कोठें भरावयाचे हें दाखवीत होता. त्या वेळेस तटावर एके जागीं मशालीचा उजेड दिसला. त्या उजेडानें किल्लेदार तटबंदीच्या दुरुस्तीचें काम तपाशीत होता. भिंत बांधण्याचें काम बहुतेक पुरें होत आलें होतें. त्या समयीं शाहाची 'संग्राम' नांवाची आवडती बंदूक तोडा पेटविलेली एका शिपायाच्या हातीं होती. ती गोळी भरून तयार केलेली होती. ती त्यानें त्याजकडून मागून घेऊन छातीवर धरून लगेच किल्लेदारावर नेम धरून सोडिली. गोळी सूं सूं करीत निघाली ती नेमकी वसंतसिंगाच्या कपाळावर जाऊन आदळली. त्याबरोबर कपाळमोक्ष होऊन किल्लेदार खालीं पडला! तटावर अतिशय गडबड उडाल्याचें दिसून आलें. वरचे लोक घाबरे होऊन इकडे तिकडे धांवाधांव

करूं लागले. तेथें शिपायांची व रहिवाशांची गर्दी झाली. त्यावरून आपल्या गोळीचा नेम बरोबर लागू पडला अशी अकबरशाहाची खातरी झाली. किल्लेदाराच्या मृत्यूनें आंतील लोक अधिकच खवळले. रजपूत जात अडचणींत सांपडली ह्मणजे तिच्या अंगीं विरश्रीचें वारें भरतें आणि तिचें देहभान नाहींसें होऊन ती आपल्या जीवाकडे पहात नाहीं, अशी नेहमींची चाल आहे, तिला अनुसरून तिच्या शौर्याला ऊत आल्यावांचून राहणार नाहीं, या सर्व गोष्टी तो जाणून होता; ह्मणून, त्यानेंही आपल्याकडून जय्यत तयारी केली.

रात्र सरून उजाडत आलें होतें. इतक्यांत एकाएकीं एक दिवस अकबरशाहाच्या छावणीवर अकस्मात् छापा आला. त्याची फौज पुष्कळ होती आणि तिचें लष्करी शिक्षणही चांगलें होतें; ह्मणूनच रजपूतांच्या लोंढ्याला तिनें दाद दिली नाहीं. नाहींतर असा भयंकर छापा दुसऱ्या कोणाच्यानें सहन करवला नसता! अकबरशाहाचे लोक, ह्मणूनच त्यापुढें ते टिकले. किल्लेदार गोळी लागून पडतांच फौजेचें जूं गुलाबबाईनें आपल्या मानेवर घेतलें. तिच्या हाताखालीं रजपूत लोक कटून लढले. शत्रूच्या हरकतीला तिनें बिलकूल जुमानिलें नाहीं. त्याला तिनें तोबा तोबा करावयास लाविलें. तिनें आपला तुफान खंद्या घोडा अति त्वेषानें अकबरशाहाच्या डेऱ्यावर चालविला. त्या वेगांत तिला स्वतःच्या देहाचें भान राहिलें नाहीं. शाहाचा एक उमराव तिची राक्षसी दौड थोपविण्यासाठीं आडवा झाला. त्याच्या अंगांत तिनें आपल्या बर्चीची जोरानें फेंक करून रस्ता खुला केला, आणि पुन्हा घोड्याला टांच देऊन ती शाहाच्या तंबूवर जाऊन थडकली. तंबूवरचा पहारेकरी आडवा होऊन त्यानें तिला थोपून धरिलें; इतक्यांत पहाऱ्यावरचा मुख्य अंमलदार होता त्यानें तिच्या तोंडा-

वर तरवारीचा वार केला. त्यालाही तिनें बर्चीनें भोंसकून घोड्याखालीं उडी टाकिली, आणि तंबूंत प्रवेश करून नीट बादशाहाच्या पलंगाकडे चालली. पलंग रिकामा आढळला. पाहरेकरी शिपायांचा तिच्याभोंवतीं गराडा पडला. तिला पकडून कैद करण्यास बरेच श्रम पडले. कैद करतां करतां तिनें कांहीं शिपायांना जखमी केलें. तिच्या मानेवर एक जखम लागली. तींतून भळाभळा रक्त वाहूं लागलें. तिचा हात चालेनासा झाला. तिला घेऱ्या येऊं लागल्या. तिचें हत्यार बंद पडलें. तिच्या बरोबरच्या लोकांपैकीं बहुतेक मारले गेले. कांहीं लोक माघारे गेले. त्यांच्या मुखानें पराभवाची दुःखप्रद वार्ता किल्ल्यांतील लोकांस कळली. 'तेव्हां तेथें मोठा हाहाःकार झाला तो किती वर्णन करावा!

अकबरशाहा तंबूवर दाखल झाला. तेव्हां किल्लेदाराची शूर पत्नी गुलाबबाई मूर्च्छा येऊन जमिनीवर अस्ताव्यस्त पडली होती. तिनें सामनेवाल्यांच्या अंगांवर वार केले होते, त्यांचें रक्त आणि स्वतःच्या जखमांतून निघालेलें रक्त, या दोन्ही रक्तांनीं ती न्हाली होती. पतिनिधनाचा सूड घेण्यासाठीं तिनें शौर्याची पराकाष्ठा केल्याचें शाहाच्या नजरेस आलें! तिच्या जखमांना टांके मारण्याचा त्यानें हुकूम केला. रात्रभर तिची उत्तम शुश्रूषा ठेवण्याविषयीं आपल्या हकीम लोकांस त्यानें ताकीद दिली. तिचें शूरत्व पाहून तो थक्क झाला! तिला होत असलेले क्लेश पाहून त्याला दया आली! तिच्याविषयीं त्याच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न झाला. तो इतका कीं, तिचे लोक शरण आले तर त्यांजबरोबर तह करण्याचा त्याचा निश्चय झाला. आंतील लोकांचा स्वधर्माविषयीं आणि स्वराज्याविषयीं दृढ निग्रह पाहून त्यानें त्यांची तारीफ केली. त्या भरांत तो इतकेंही शब्द बोलून चुकला कीं, असे

निग्रही व शूर बहाद्दर माझ्या सैन्यांत असले तर त्यांच्या सहाय्यानें मी सगळी पृथ्वी जिंकण्यास समर्थ होईन! मग एका देशाची कथा काय ?

दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं गुलाबबाई आपल्या पलंगावर उठून बसली. तिनें बादशाहाच्या भेटीची इच्छा दर्शविली, ह्मणून तिला शाहाकडे घेऊन गेले.

गुलाबबाई—(न डगमगतां) जनाबे आली, आप हुजूर! मीं दोन वेळां हजरतीला ठार मारण्याचा प्रयत्न केला. आपण मजबरोबर कितीही दुस्मनगिरी केली तरी मी पर्वा करीत नाहीं. मीं स्वतःचे छातीवर हीं कामें केलीं आहेत; पण, तीं अखेर फसलीं! आतां आप हुजूर शिक्षा कराल ती भोगण्यास मी सिद्ध आहें. मृत्यूची व माझी भेट करविण्यास आतां विलंब करूं नये असा माझा अर्ज आहे! कोणता बेत योजिला आहे तो लवकर कळवावा, हुजूर!

अकबरशाहा—हातीं हत्यार धरून शत्रु मजबरोबर सामना करण्यास उभा राहिला आणि तो जीवंत हातीं लागला, तर त्याला ठार मारण्याचें माझें ब्रीद नाहीं. अशा पाडाव झालेल्या मनुष्यास शासन करण्याची बुद्धि हक्‌ताला-अल्ला मला कधींही न देवो. मीं तुझ्या प्रिय व शूर पतीचा प्राण घेतला, हें वाईट काम मीं शत्रुभावानें केलेलें नाहीं! त्याचा पराक्रम व स्वदेशाविषयींचा अभिमान पाहून मला मोठें कौतुक वाटत होतें. त्याच्या गुणांला मी फार चहात होतों; पण, या मोहिमेचा शेवट मला यशस्कर व्हावा, एवढ्याच हेतूनें मोठ्या कष्टानें मीं त्याचा प्राण घेतला! तू त्याची प्रिय धर्मपत्नी आहेस,

तेव्हां आपल्या पतीच्या निधनास जो कारण झाला त्याला ठार मारण्यास तूं उद्युक्त व्हावें, हें साहजिकच आहे. यांत आह्माला राग येण्यासारखें कांहींच नाहीं. दुस्मानगिरीचा परिणाम असाच व्हावयाचा. तू आपल्या प्रिय पतीला अंतरलीस याचें मला फार दुःख होतें. आतां चितूरच्या संबंधानें तुजबरोबर कसा तह करण्याची माझी इच्छा आहे तें तुला कळवितों–

गुलाबबाई—तहाच्या शर्ती माझ्या देशबंधूंच्या व राणाजींच्या मानहानीला कारण असतील, आणि तह कबूल करण्याचा अधिकार मजकडे असेल, तर मी आपल्या लोकांना साफ सांगेन कीं, तुह्मी शत्रूशीं लढत राहा. एकही मनुष्य जीवंत राहिलें नाहीं, असें होईपर्यंत तुह्मी हार जाऊं नका. आपल्या तहाचीं कलमें माझ्या रजपूत जातीच्या कीर्तीला हानिकारक असतील, तर तह कबूल करण्याची मला मुखत्यारी असली तरी मी आपले जातभाई व जात-भगिनी यांना निक्षून सांगेन कीं, तुह्मी आपल्या शत्रूशीं एकसारखे लढत राहा, किल्ल्यांतील सर्व तरुण पुरुष व बायका रणांगणावर पडेपर्यंत शत्रूला हार जाऊं नका आणि रजपूत जातीच्या नांवाला कलंक लागेल असें वर्तन करूं नका.

अकबरशाहा—पण गुलाबबाई, मी तुह्माबरोबर असाच तह करीन कीं, त्यांत तुमची, तुमच्या धन्याची व चितूरकिल्ल्याची मानहानि न होतां तुमचें नांव चिरकाल राहील. मग तर हरकत नाहीं ना?

गुलाबबाई—तुह्मी जातीचे मोंगल आहां व परधर्मी आहां, तेव्हां ज्यानें आमचा मान राहील असा तह तुह्मी कधीं करणार

नाहीं ! आमचा छल तुह्मीं इतका केला आहे कीं, तो कशानेंही विसरला जाणार नाहीं. तुह्मी आपला वेढा उठवून एकदम निघून गेलां तरच आमचा संतोष होऊन आमच्या जागीं आह्मी सुखासमाधानानें राहूं. आह्मी पूर्वीं होतों तसेंच आह्माला आमच्या जागीं राहूं द्याल तर, तशा तहाला मात्र मी कबूल करीन. दुसऱ्या कोणत्याही प्रका-रच्या तहाला मी राजी नाहीं. माझ्या स्वतःविषयीं पुसाल तर मी सर्वस्वीं तुमची गुन्हेगार आहें. तुह्मी आतां आपला सूड वाटेल तसा उगवून घ्या. त्याबद्दल माझी रदबदली नाहीं. वाघाच्या तडाख्यांत गाय सांपडली ह्मणजे त्या आनंदांत तो तिचे पाहिजे तसे हाल करितो! त्याचें मोजमाप तिच्या मर्जीवर नसतें! तिचें जगणें व मरणें, या दोन्ही गोष्टी त्याच्याच मर्जीवर अवलंबून असतात! माझी प्रस्तुतची स्थितिही तशीच झालेली आहे, ह्मणून या वेळेस मला हवी ती शिक्षा द्या. माझी ना नाहीं; पण, कुडींत प्राण असेपर्यंत मी तुह्माला हार जाणार नाहीं व शरणही येणार नाहीं!

अकबरशाहा—गुलाबबाई, मुसलमान आणि रजपूत यांच्यामध्यें किती फरक आहे, तो मी तुला सांगतों. रागाच्या भरांत तू मला दोनदां ठार मारण्यास सिद्ध झालीस. यांत सूड घेण्याशिवाय तुझें दुसरें कांहींएक कारण नव्हतें. तुमचा मान व प्रतिष्ठा राहील, अशाच रीतीचा तह करण्यास मी तयार असतां ती गोष्ट तूं मान्य करीत नाहींस. मजविष-यींचा तुझा द्वेषभाव तूं आपल्या तोंडानेंच बोलून दाख-विलास. तू आतां कैद झालेली मनुष्य आहेस. मीं या वेळेस मनांत आणिलें तर सर्व गोष्टींचा एका क्षणांत निकाल

लावण्याचें माझ्या हातीं आहे; पण, असलें अधम कृत्य खुदा-तालाला पसंत पडणार नाहीं. मी तुला प्रतिबंधनांतून मुक्त करून कांहीं शिपाई बरोबर देऊन चितूरच्या दरवाज्यापाशीं सुरक्षित नेऊन पोहोंचवितों. नंतर तुझी मर्जी असल्यास पुनः मजबरोबर लढण्यास तयार हो!

हें भाषण ऐकून गुलाबबाईनें आपली मान एका बाजूला फिरविली. तिच्या डोळ्यांत अश्रू आले होते; पण, तिची स्वाभिमानवृत्ति जागृत होऊन ते अश्रू तिनें आंतल्याआंत थोपून धरले! खालीं पडूं दिले नाहींत! पुढें चकारशब्द न बोलतां मुकाट्यानें बादशाहाला सलाम करून ती तंबूतून बाहेर पडली. तेथें तिच्यासाठीं एक मेणा आणवून ठेविला होता. त्यांत ती बसण्याबरोबर भोयांनीं मेणा थोडक्याच वेळांत चितूरच्या दरवाज्यापाशीं नेऊन थोपला. ती किल्ल्यांत निघून गेली, आणि शाहाचे लोक मेणा घेऊन परत गेले. तिनें किल्ल्यांत प्रवेश करण्याबरोबर पुनः तिच्या मनांत कांहीं विचार घोळूं लागले. अकबरशाहाच्या उदार व क्षमाशील स्वभावाची तिनें आपल्या मनांत तारीफ केली, तरी ती आपली जन्मभूमि, स्वदेशबंधु आणि भगिनी यांच्या संबंधाचें कर्तव्यकर्म करण्यास विसरली नाहीं! इतक्याही संकटांतून तें पवित्र कर्म करण्यासाठींच ती वांचली असें ह्मटलें पाहिजे! तें महत्कार्य शेवटास नेण्यासाठीं तिचा अंतरात्मा उचंबळूं लागला! आणीबाणीचा समय जवळ येऊन ठेपला!

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणे.

# भाग सातवा.

## कालयवन अकबरशाहा आणि कालभैरव प्रतापसिंह यांची खडेजंगी.

चितूरचे लोक बेफाम झाले. त्यांनीं आपल्या जीवाभावाची आशा सोडून दिली. किल्लेदार पूर्वीच पतन पावला होता. त्यांनीं अकबरशाहाच्या छावणीवर जाऊन छापा घातला. त्यांत चांगले चांगले पुष्कळ शिपाई ठार झाले. पुढच्या संकटांतून पार पडण्याची आशा दिसेना. परिणाम फार भयंकर वाटूं लागला. शत्रूच्या हातीं जीवंत पडण्यापेक्षां दोन हात करून मरून जावें, असा पुष्कळांचा निश्चय झाला. महंमदी धर्मवेडाप्रमाणें रजपूत जातीचेंही शौर्यवेड विलक्षण होतें! कैक कुटुंबांतील माणसें एकमेकांना मिठ्या मारून परलोकयात्रेस गेलीं! त्यांनीं परस्परांचे खून केले! अंतकाळीं आपल्या महंमदी शत्रूला शाप देऊन त्यांनीं प्राण सोडले! मेलेल्या व मरणोन्मुख झालेल्या मनुष्यांशिवाय चितूरांत घर सुनें राहिलें नाहीं! घरांत मरणोन्मुखांचे विलाप व बाहेर लढणाऱ्या शिपायांच्या रणगर्जना, यांचें मिश्रण होऊन एकच हाहा:कार झाला! जणूं, मृत्यूचाच दरबार खुला झाला!

बरेच दिवस लोटले. लढाई चालूच होती. राजरस्त्यांत प्रेतांचा खच झाला. त्यांना मूठमाती मिळेना, यामुळें तीं कुजूं

लागलीं. त्यांची विषारी वाफ हवेंत मिसळून मृतांची संख्या वाढत चालली. बसंतसिंगाची शूर स्त्री गुलाबबाई दोन तीन दिवस बिछान्याला खिळून राहिली होती. ती कांहीं बरी होऊन चितूरच्या बचावासाठीं बाहेर पडली. जरा उठण्याचें सामर्थ्य येण्याबरोबर तिनें आपला बिछाना सोडिला. ती लागलीच तटबंदीवर जाऊन उभी राहिली. गांवांत परस्परांमध्यें कत्तल चालल्याचें व लोक जीवावर उदार झाल्याचें तिला कळलें. त्या बातम्या मुकाट्यानें ऐकून घेऊन ती शांतचित्तानें आपल्या लोकांस हुकूम सोडीत होती. तिनें आपल्या सरदारांची सल्लामसलत घेण्याकरितां एक दरबार भरविला. त्यांत तिचा भावी जामात प्रतापसिंगही हजर होता. त्याला ती ह्मणते:—

गुलाबबाई—प्रतापसिंग, शत्रूचा जोर फार झाला आहे. त्यांना हांकून लावण्याचें आपल्या अंगांत आतां सामर्थ्य राहिलें नाहीं. आपला शेवटचा उपाय केल्याशिवाय आतां दुसरा इलाज राहिला नाहीं. अशा प्रकारचें संकट ओढवलें ह्मणजे रजपूत लोक काय करीत असतात, हें मीं तुह्माला सांगण्याची जरूर नाहींच!

प्रतापसिंग—मातुश्री, आपण अशा निराश कां होतां? अजून आह्मीं हार खाल्ली असा अर्थ नाहीं. अद्यापि किल्ल्यावर शिबंदी पुष्कळ आहे. आमचा एक एक शिपाई तिकडच्या दहांना भारी आहे. शत्रूवर आमचा छापा पडून ते बरेच जर्जर झाले आहेत. त्यांच्यांत पूर्वींची कुवत राहिली नाहीं.

गुलाबबाई—प्रस्तुत बळानें ते श्रेष्ठ आहेत, आणि आह्मी निर्बळी झालों आहों; ह्मणूनच, त्यांना शेवटीं जय मिळणार आणि आह्मी मरणार, ही गोष्ट खरी आहे. तरी

शौर्याचें रक्त आमच्या शिपायांत बीजरूपानें खेळत आहे, तें मृत्यूशीं शेवटपर्यंत टक्कर देणार, हें मला माहीत आहे; ह्मणून तुह्मी तयार असा असें ह्मणण्याचें मला कारण नाहीं.

प्रतापसिंग शूर असून सभ्य होता, तरी गुलाबबाईच्या मनांतला विचार त्याला पसंत पडला नाहीं. तिची थोरली मुलगी त्रिपुरंसुंदरी हिजवर त्याचें प्रेम जडलें होतें. तिच्यापासून आपल्याला सुखोत्पत्ति व्हावी अशी त्याची इच्छा होती, ह्मणून गुलाबबाईच्या धाडशी विचाराची त्याला जरूर वाटली नाहीं. शत्रूला शरण जाण्याची जरी पाळी आली तरी, अकबरशाहा निसर्गतः उदार स्वभावाचा राजा असल्यामुळें, तो पाडाव झालेल्या शत्रूस क्रूरपणानें वागवील अशी शंका बालाग्र मनांत आणावयास नको होती. त्या वेळेस अकबरशाहासारख्या उदार अंतःकरणाच्या पुरुषाबरोबर तह केला असतां त्यांतच आपलें हित व शहाणपण आहे, असें त्याला वाटलें. हा विचार त्यानें गुलाबबाईला कळविला. चितूरचा संपूर्ण अधिकार तिजकडेच होता ह्मणून त्याचा तो भागूबाईपणाचा विचार तिला पसंत न पडतां तिनें त्याजकडे क्रोधदृष्टीनें पाहिलें, आणि ह्मणते—

गुलाबबाई—काय? जो रजपूतपुत्र माझ्या प्रिय त्रिपुरसुंदरीला वरणार त्याच्या तोंडांतून असले दळबाईचे शब्द! रजपूतबीजाला हें बोलणें अघटित आहे! बस कर! यापुढें माझा वाडा तुला वर्ज्य आहे!

ती लागलीच किल्ल्यावरून खालीं उतरली. प्रतापसिंगाचें प्रत्युत्तर ऐकण्यास उभी राहिली नाहीं. शत्रूचा हल्ला एकाएकीं आला तर काय करावें याजबद्दल तिनें तटबंदीवरच्या लोकांस हुकूम देऊन ठेविला, आणि प्रथम जीवावर उदार होऊन जे लोक

कुटुंबहत्त्या करण्यास उद्युक्त झाले होते त्यांच्या घरोघर ती फिरली. तेथील भयंकर देखावे पाहून, तिचें अंतःकरण जास्तीच निष्ठुर झालें. घरोघर प्रेतें पडलीं होतीं त्यांजकडे पाहून तिनें दुःखाचा सुस्कारा सुद्धां टाकला नाहीं. मरत पडलेल्या लोकांबरोबर तिनें कांहींएक भाषण केलें नाहीं. मरतांना त्यांनींही दुःखाचा लवलेश दिसूं दिला नाहीं. रस्त्यांत फेंकून दिलेल्या प्रेतांची अतिशय घाण सुटली होती त्यांतून ती चालली होती, तरी तिच्या तोंडांतून एकही शब्द निघाला नाहीं. तिचा अंतरात्मा कांहीं अगाध विचारांत गुरफटून गेला होता; यामुळें, तिला बाह्य सृष्टीचें भानच राहिलें नव्हतें. ती आपल्या राहण्याच्या वाड्यांत जाऊन पोहोंचली, तेव्हां तिची थोरली मुलगी त्रिपुरसुंदरी तिला प्रथम भेटली तेव्हां—

गुलाबबाई—(शांतपणानें) बेटा त्रिपूर, मृत्यूनें आपल्याकडे कल्पांत प्रळय मांडला आहे. विजयश्रीनें शत्रूच्या गळ्यांत जरी हार घातला तरी तो हार सुवासिक नाहीं. त्याला कुजलेल्या प्रेतांची घाण लागलेली आहे. त्याचा सुगंध जाऊन त्याजवर दुर्गंधीचीं पुटें बसलीं आहेत. त्रिपूर, मला आतां असें वाटतें कीं आपण हा प्रेतरूप व कंटकमय लोक सोडून उत्तम आनंदस्वरूप लोकास जाण्याची तयारी करावी, तर तसें करण्याची तुझी खुषी आहे कीं नाहीं? जो अग्निनारायण या जड देहाचें भस्म करून टाकतो तोच आपल्या आत्म्याला परलोकीं शांतिसुख देण्याचें साधन आहे.

त्रिपुरसुंदरी—माताजी, तुझी आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मी जन्माला आल्यापासून जशी स्वतंत्रता भोगीत आहें, तशीच स्वतंत्रता जन्मभर मिळाली तरच जगण्याचें सा-

थँक! परतंत्र होऊन जगण्यापेक्षां मरण बरें! परधर्मी मुसलमानांच्या ताब्यांत राहून जगण्यापेक्षां अग्निकाष्ठें भक्षण करून देह ठेवण्यास मी सिद्ध आहें! पायांत बिड्या ठोकून आह्माला आमचा शत्रू कुजत ठेवील, किंवा आमचीं शरीरें अपवित्र करील, त्यापेक्षां अग्निप्रवेश करून मुक्तीचा मार्ग धरण्यांतच श्रेय आहे!

त्रिपुरसुंदरीचा हा पवित्र विचार ऐकून गुलाबबाईनें तिला मोठ्या प्रेमानें आलिंगन दिलें. हें भाषण धाकटी कन्या त्रिभुवनसुंदरी हिच्या कानांवर पडलें, तेव्हां तिचें ऊर धाडधाड उडूं लागलें! तिला जगण्यांतच मौज वाटत होती. जें कांहीं करावयाचें तें सर्व जगण्यासाठीं, असा तिचा समज होता; ह्मणून तिच्या वडील बहिणीचा विचार तिला पसंत पडला नाहीं; अग्निप्रवेश करून अंतरात्म्याची व देहाची ताडातोड करणें तिला कसेंसेंच वाटलें. तिची या वेळेस नुकती कौमार्यदशा संपत आली होती. मातृसुखांत ती रुळत होती. अंगापिंडानें निरोगी होती. खाण्यापिण्याचें सुख भोगीत होती. तिच्या अंगीं नुकतें थोडें थोडें चांचल्य येत चाललें होतें. अशा जोमांत येत असलेल्या मुलीला मरण कसें गोड वाटेल? अग्निप्रवेशाचें नांव निघण्याबरोबर ती थरथरां कांपूं लागली! तिच्या सुखाच्या आड हें एक मोठेंच विघ्न आलें! गुलाबबाई तिला आपल्यासमोर बोलावून—

गुलाबबाई—बेटा त्रिभुवन, आपल्यावर वरून यमराजाची चिटी सुटली आहे ती आतां फिरविण्याचें कोणाच्या हातीं नाहीं. वरचें बोलावणें आलें कीं, कांकूं चालावयाचें नाहीं! जगदीशइच्छेप्रमाणें चाललेंच पाहिजे. बेटा, आतां आपण मरण्यास तयार असलेंच पाहिजे. खरें सुख

मरण्यांतच आहे! जगणें हाच नरक होय! यासाठीं शेवटच्या तयारीस लाग!

हें भाषण ऐकून त्रिभुवनसुंदरीच्या अंगावर शहारे उभे राहिले! तिची बोबडी वळली! तिला आईचा कडक स्वभाव माहीत होता. बाप पूर्वीच स्वर्गवासी झाला होता. एक आई मात्र उरली होती. तिची मर्जी जात राहील ह्मणून तिनें आईला कांहींच उत्तर दिलें नाहीं. तिच्या ह्मणण्याला आपला रुकार आहे असें दर्शविण्यासाठीं तिनें नुसती मान मात्र हालविली; पण, त्या वेळीं तिच्या डोळ्यांना डवडवून अश्रू आले. ते आईच्या दृष्टीस पडतील ह्मणून तिनें आपलें तोंड किंचित् बाजूला फिरविलें. डोळ्यांला पाणी आलेलें पाहून तामसी आई आपल्यावर कदाचित् संतापेल; ह्मणून, तिनें आलेला हुंदका आंतल्याआंत दाबून टाकिला! इतकें झाल्यावर तिनें मुलींना जाण्यास सांगितलें. दोघी मुली आईचा निरोप घेऊन निघून गेल्या. मग, गुलाबबाई आपल्या मनाशीं विचार करीत बसली.

रजपूतांच्या चालीप्रमाणें जोहार करण्याचा तिचा निश्चय ठरला. लढाईच्या सुरवातीस चितूरच्या किल्ल्यांत बारा हजार रजपूत शिपाई होते त्यांपैकीं सात हजारांनीं पूर्वीच धारातीर्थीं देह ठेविले. बाकी पांच हजार शिपाई राहिले होते त्यांना तिनें एके ठिकाणीं गोळा केलें. ते जमल्यावर तिनें त्यांस सांगितलें कीं, आतां आपल्या किल्ल्याच्या संरक्षणाचा शेवटचा प्रयत्न करून पहा. एक, शत्रूला शरण जाऊन जगणें; किंवा दुसरें, तत्प्रीत्यर्थ मरून जाणें; या दोन तोडींशिवाय तिसरी तोड नाहीं. हें तिचें बोलणें त्यांनीं मुकाट्यानें ऐकून घेतलें. तिच्या मनाविरुद्ध तोंडावाटे एक अक्षरही कोणीं काढलें नाहीं. ज्या वेळेस एकाद्या मंडळीचा एकाद्या विवक्षित कामांत एक विचार आणि एक जूट असते, तेव्हां तेथें

गडबड नसावयाचीच ! जिकडे तिकडे सामसूम झालें होतें; परंतु, तिनें जोहाराचें नांव घेण्याबरोबर जो तो केशरी पोषाक चढवूं लागला. किल्ल्याच्या रामपोळ दरवाज्यानें एका जुठानें बाहेर पडण्याचा निश्चय झाला. प्रतापसिंग त्या मंडळींत होताच. तो बेफिकीर दिसत होता. त्यानें भाषण करण्याचें वर्ज्य केलें होतें. रजपूतांच्या नंग्या तरवारी उन्हांत चमकूं लागल्या. ते शूर वीर आपले प्रिय प्राण अर्पण करण्यास सिद्ध झालेले पाहून तिला पराकाष्ठेचा स्वाभिमान उत्पन्न झाला. हे लोक शत्रूच्या रक्तानें आपल्या तरवारींस न्हाऊं घालून त्यांचा सूड खचीत घेतील असें वाटून तिला परम संतोष झाला. लोक तयार होऊन आले तेव्हां भाई हो, पुढें चालते व्हा, अशी तिनें हातांतल्या तरवारीनें खूण केली. वेशीचा दरवाजा खुला होण्याबरोबर मोठ्यानें एकसमयावच्छेदेंकरून 'राधाकिसन्लालजीकी जय' अशी रणगर्जना करून शेवटचें तुमुल युद्ध करण्यास ते पुढें सरले ! त्या घनघोर गर्जनेनें पृथ्वी व आकाश दणाणून गेलें ! तो हिमाचलांतून जणूं महानदाचा लोंढा चालला आहे असा भास झाला ! उदकासारखा मृदु पदार्थ कोणताही नाहीं; पण, त्याच उदकसंचयाचा इत्तीच्या अंगासारखा लोंढा जोरानें निघाला, ह्मणजे तो मोठमोठ्या पहाडांना फोडून दुभंग करून टाकितो. इटेले रजपूतांचा हल्ला अशा प्रकारचा असतो ह्मणून मोंगल सैन्यांला अनेक वेळां चांगलें माहीत झालें होतें. ते एकदम अंगावर तुटून पडले तेव्हांचा देखावा महाभयंकर होता ! जोहार घेतलेल्या रजपूतांला मागें फिरणें स्वप्नांतही माहीत नाहीं ! त्यांचे जिकडे तिकडे मुडद्यांवर मुडदे पडले ! क्षमा करणें आणि क्षमा मागणें या दोन्ही गोष्टी ते अगदीं विसरून गेले ! रजपूत व मुसलमान एकमेकांच्या मानांवर खपाखप तरवारींचे घाव घालीत सुटले ! रजपूत लोक तर मृत्यूला तळ-

हातांवर घेऊन नाचूं लागले होते ! रणमदानें मस्त झालेल्या शूर रजपूतांच्या तरवारींनीं हजारों मुसलमान शिपाई कचाकच कापले गेले ! हिंदूंपेक्षां मुसलमानांची संख्या पांचपट अधिक होती. ह्मणजे एक रजपूत पांचांबरोबर लढत होता; पण, हिंदूंचा दृढनिश्चय व शौर्य पाहून मुसलमान फौजेची त्रेधा उडाली. त्यांना ते सैतानासारखे वाटूं लागले. प्रतापसिंगाच्या बाहुबलाचा अजब तमाशा पाहून खुद्द अकबरशाहानें सुद्धां तोंडांत बोट घातलें ! निकरानें हातघाईची लढाई चालली तेव्हां तो तेथें स्वतः उभा राहून आपल्या लोकांस उत्तेजन देत होता. त्याच्या अंगावर दोन वेळां एका रजपूताच्या तरवारीचे झटके लागले; पण, अंगांत चांगलें अभेद्य व मजबूद चिलखत होतें; यामुळें, त्याला जखमांची विशेष इजा झाली नाहीं. रजपूतांच्या केशरी पोषाकांवर मुसलमानांची तरवार चालली, तेव्हां त्यांच्या डोयांचे ऐटबाज शेले व शालनामे, किनखापी विजारा, पायघोळ अंगरखे व लांबलांब दाढ्यामिशा यांचें वैभव अधिकच खुलूं लागलें !

एथें ह्या भागाची मर्यादा संपली.

# भाग आठवा.

## त्रिपुरसुंदरीचें अग्निकाष्ठभक्षण.

मागें सांगितल्याप्रमाणें निकराची लढाई सुमारें चार तास चालली. तींत बहुतेक रजपूत शिपाई ठार झाले. समरभूमीवर दोन हजारांहून अधिक माणसें अकबरशाहाचींही पडलीं. चार हजारांहून अधिक लोक जखमी झाले. शूर रजपूतांनीं आपल्या भोंवतीं तें एक कायमचें स्मारकच करून ठेविलें. तें स्मरणांतून कधींही नाहींसें होण्यासारखें नाहीं. अकबरशाहानें रणांगणावर मुडद्यांचे ढीग पडलेले पाहिले, तेव्हां रजपूतांनीं शिपाइगिरीची कमाल केलेली पाहून त्याला मोठें आश्चर्य वाटलें! त्यांचीं प्रेतें पाहून त्याला दुःखही झालें! त्याच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या! शेवटीं तो विजयी झाला खरा; पण, त्या विजयाबद्दल त्याची मनुष्यहानि मोठी झाली! शंभर रुपये किंमतीच्या मालासाठीं एक हजार होन गमावल्यासारखें झालें! त्याची खातरी झाली कीं, आपली व शत्रूची फौज समसमान असती तर या समयीं विजयश्री शत्रूच्याच गळ्यांत माळ घालती! 'गड मिळाला पण सिंह गेला' अशी गत झाली! किल्ल्यांत उरलेले लोक तहाला कबूल झाले तर ठीकच आहे, नाहींतर शिपायांना नवा दम येण्याबरोबर संपूर्ण किल्ला पूर्ण रीतीनें सर करण्याचा त्याचा निश्चय झाला. त्याची फौज अगदीं थकून गेली होती, ह्मणून तिला त्यानें किंचित् विश्रांति दिली.

त्या दिवसाच्या युद्धांत जे थोडेबहुत रजपूत वांचून परत गेले त्यांमध्यें प्रतापसिंगही होता. त्यानें प्रथम त्रिपुरसुंदरीची भेट घेतली. भावी सुखाच्या आशेनें ती मजबरोबर पळून जाण्यास तयार होईल, असें त्याला वाटलें होतें; पण, त्यानें तिला चांगलें ओळखिलेंच नव्हतें, असें त्यांच्या पुढील संवादावरून लक्षांत येईल.

प्रतापसिंग—प्रिये त्रिपुर, आतां एथील सर्व ग्रंथ आटपला. नाश होण्यांत बाकी राहिली नाहीं. शूरानें जितका पराक्रम करावयाचा तितका आह्मी करून चुकलों. शेवटीं चितूरचा किल्ला शत्रूच्या हातीं पडला. पुढें त्याच्या मर्जीप्रमाणें सर्वांची विल्हेवाट लागणार! यासाठीं प्यारी, आतां एथून पळून जाणें हाच एक उपाय राहिला आहे. तसें करण्याला एकच रस्ता आहे. त्या रस्त्यानें आपण बाहेर पडलों तर जेथें तुझ्या केंसालाही धक्का लागणार नाहीं, अशा एका जागीं तुला नेऊन ठेवतों. कशी मर्जी आहे बोल.

त्रिपुरसुंदरी आपल्या मातोश्रीप्रमाणेंच मोठी मानी स्त्री होती. तिनें त्याला एवढाच प्रश्न केला कीं, तू आहेस कोण तें सांग?

प्रतापसिंग—काय? या प्रतापसिंगाला तू असला विलक्षण प्रश्न करशील असें मला वाटलें नव्हतें! ज्याला तूं एक वेळ मनानें वरिलें तोच प्रतापसिंग या समयीं तुझ्यापुढें उभा आहे. तो तुला या यमपुरींतून काढून जें सर्व सौख्याचें आगर, अशा ठिकाणीं तुला नेऊन ठेवण्यास तयार आहे!

त्रिपुरसुंदरी—ज्याला माझ्या मनानें एकदां वरलें, तो पुरुष आपल्या स्वकीयांच्या नांवाला कलंक लागेल असें वर्तन कसें करील? मी बसंतसिंगाची कन्या आहें. जो पुरुष जोहार घेऊन केशरी पोपाक करून शत्रूशीं निकरानें ल-

ढत होता, तो शेवटीं रणांगण सोडून पळून गेला आणि भागूबाईसारखा एकाद्या कपारींत दडून बसला, त्याचें मी कधीं पाणिग्रहण करणार नाहीं. प्रतापजी, शूर पुरुषानें कसें मरावें हें अजून तुम्हाला कळलें नाहीं! धिःक्कार असो तुमच्या जीविताला!

प्रतापसिंग—तसें नव्हे. मी मरणाला भितों असें मुळींच नाहीं. हा मनुष्यजन्म वारंवार मिळत नाहीं. नरजन्म ही एक परमेश्वराची मोठी देणगी आहे. त्याचा फायदा आपल्यास, व दुसऱ्यास करून द्यावा. त्या देणगीची उधळपट्टी करितां कामा नये. हा सोन्यासारखा देह देऊन जर तसेंच एकादें महत्कार्य होत असेल, तर त्याचा बळी देण्यास सिद्ध होणें हें आपलें कर्तव्य आहे; पण, भलत्याच एकाद्या शुष्क कामासाठीं जीवाचा नाश केला, तर ती निवळ आत्महत्त्या होईल. यांत मोठें शहाणपणाचें कृत्य केलें असें कोणीही ह्मणणार नाहीं!

त्रिपुरसुंदरी—देहाची आहुती देऊन आपला अपमान टळत असला, अब्रूचें रक्षण होत असलें, किंवा खानदानीला बट्टा लागत नसला, तर याहून दुसरें काय पाहिजे? मृत्यु टळतो, पण कपाळाला बदनामीचा डाग लागत असला, तर तसलें वांचणें काय कामाचें? ज्याला मानापमानांचा भेद कळत नाहीं तो नादान पुरुष होय! तू आपल्या नांवाला कलंक लावून घेऊन वांचण्याची आशा करणारा अधमप्रकृति पुरुष असलास तर, तुझा माझा विवाह होणार नाहीं! जा, येथून चालता हो कसा!

हें तिचें भाषण ऐकून प्रतापसिंगाच्या काळजाला काळइंगळ्या डसल्यासारख्या वेदना झाल्या. तिनें त्याला अगदीं झुगारून दिलें. पुढें त्याचें बोलणें न ऐकतां ती लागलीच तेथून निघाली. जातांना

त्याजवर तिनें तिरस्कारपूर्वक नजर टाकली, तेव्हां लज्जा आणि प्रेम या दोन मनोविकारांमध्यें तो त्रिशंकूसारखा लोंबूं लागला. जनलज्जा आणि मनलज्जा यांनीं त्याला एका जागीं जखडून टाकिलें. त्याचा चेहरा भूतासारखा काळाठिक्कर पडला. बराच वेळ उभा राहून पुढें काय करावें हें त्याला सुचेना. कांहीं वेळानें तो उभा होता त्या दिवाणखान्यांत अकस्मात् धुराचा लोंढा आला. हां हां ह्मणतां ती सर्व जागा धुरानें व्यापून गेली. मग तेथून तो निघून आंतल्या चौकांत गेला. धुरानें त्याला गुदमरल्यासारखें झालें. त्या धुराचें कारण एकदम त्याच्या दृष्टीस पडलें. तो देखावा पाहून भयानें त्याची बोबडीच वळली. वाड्याच्या तळमजल्यांत चिता पेटली होती. तेथें किल्लेदाराच्या कुटुंबांतील सगळीं माणसें गोळा झालीं होतीं. तीं सरासरी दीडशें माणसें होतीं. त्यांमध्यें गुलाबबाई आणि तिची धाकटी कन्या त्रिभुवनसुंदरी मात्र नव्हती. प्रतापसिंगानें तळघराच्या तोंडाशीं जाऊन डोकावलें, तों त्रिपुरसुंदरी आंतल्या अंगाला उभी होती. तिच्या हातीं एक पेटलेली मशाल होती. चिंध्या, तेल, गंधक, सोरा, दारू, वगैरे ज्वालाग्राही पदार्थ त्या ठिकाणीं पसरले होते. त्यांना ती हातीं धरलेल्या मशालीनें आग लावीत चालली होती. घटका दोन घटकांच्या अवकाशांत साऱ्या तळघरभर धूर कोंडून तेथील मनुष्यें त्याला दिसेनातशीं झालीं. पेटलेल्या सामानांतून फटाके, किंवा बंदुका यांच्या बारांसारखे फाड फाड आवाज होत होते. त्यांमध्यें जळत असलेल्या मनुष्यांचे अंतकालचे आक्रोश मिसळून गेले होते. अग्नीच्या राक्षसी ज्वाळा माणसांचे बळी घेऊन बाहेर पडून असमानांत आनंदानें नाचूं बागडूं लागल्या, आणि जणूं, ही ही करून मोठ्यानें हांसूं लागल्या! तो प्रचंड देदीप्यमान देखावा आणि त्यांतून निघणारा आवाज किती भयंकर होता, याचें वर्णन

करितां येत नाहीं. त्याची मनांत कल्पनाच केली पाहिजे. त्या विराट्-स्वरूपी चितेंतून त्रिपुरसुंदरीला बाहेर काढून नेण्याची सोय राहिली नव्हती. तिनें त्या प्रचंड चितेंत स्वसंतोषानें उडी घातली होती. तिला मग तेथून सोडविणार कोण ? अग्निनारायणाच्या साक्षीनें मृत्युराजानें त्या सुंदर कुमारिकेला वरिलें, त्या वेळेस त्रिपुरसुंदरीच्या मैत्रिणी, कर-वल्या, दासी व इतर बाया होत्या त्यांनाही तो आपल्या बरोबर निजधामास घेऊन गेला. अशी भयंकर स्थिति पाहून निराश झा-लेल्या प्रतापसिंगाला किती दुःख झालें असेल याचें वर्णन कर-वत नाहीं. शेवटीं, रडत, स्फुंदत व हुंदके देतच तो तेथून बाहेर गेला ! असो.

चितूरगडावरचे शिबंदीचे लोक लढाई करून थकून गेले आहेत असें पाहून अकबरबादशाहानें त्यांजबरोबर तहाचें बोलणें करण्यासाठीं त्यांजकडे आपला हुशार वकील राजा[1] बीरबल पाठविला. तहाच्या

---

१ राजा बीरबल हा जातीचा ब्राह्मण असून काल्पीचा रहाणारा होता. तो मोठा मुत्सद्दी व कवी असून गायनवादन–कलांतही फार निष्णात होता. तो उदार व खुषमिजाजी होता. अकबरबादशाहाचा तो एक पूर्ण भरंवशाचा सल्लागार व सेनापति होता. त्याचीं कवनें, ह्मणी आणि हा-स्यपर चुटके अद्यापि हिंदुस्थानांतील लोकांच्या तोंडी आहेत. त्याचें मूळचें नांव महेशदास होतें. तो भाटाचा धंदा करीत असे. तो फार गरीब, पण अतिशय बुद्धिमान् होता. त्याची स्मरणशक्ति फारच तीव्र होती. अकबराच्या दरबारांत त्याची लवकरच चाहा झाली. तो हिंदी भा-षेंत कविता फार चांगली करी, ह्मणून त्याला अकबरानें 'कविराज' अशी पदवी दिली होती. नगरकोट बिरबलाला जाहागीर देऊन त्याला राजा ही पदवी दिली होती. अकबराच्या स्वारीबरोबर तो हमेषा असे. तो दरबारी वकिलाचींही कामें करी. युसफ्झाई लोकांवर तो चालून गेला असतां तेथें तो रणांगणावर पडला. त्याच्या मरणानें अकबराला फारच खेद झाला. त्याला त्याच्या मरणाचें वर्तमान कळलें तेव्हां अकबर ह्मणाला—

अटी फारच थोड्या व सौम्य होत्या. त्यांत त्याचा औदार्यगुण स्पष्ट दिसत होता; पण, तो तहाचा खर्डा त्यांनीं रागारागानें दूर झुगारून दिला! त्या समयीं क्रोध अनावर होऊन तो त्यांच्या पोटांत मावेनासा झाला! ते संतापून ह्मणाले–'तुमच्या शाहाला सांगा, कीं ज्यानें आमच्या घरादारांचा सत्यनाश केला त्याच्या कोणत्याही अटी आह्माला कबूल नाहींत! शत्रूला शरण जाणें हीं अक्षरें आह्मां रजपूतांच्या भाषेंत नाहींत! जे दळ्बाई आणि षंढ असतील त्यांजकडे हा खर्डा घेऊन जा.' हा निरोप ऐकून, तो वकील थोबाडींत मारल्यासारखें वाईट तोंड करून अकबरशाहाकडे परत गेला. त्यानें आपल्या यजमानाला त्यांचा निरोप कळविला. मग काय विचारावें! त्या मानी पुरुषाला तो अपमान कसचा सहन होतो! चितूरगड तोफा व सुरुंग यांनीं एकदम उडवून टाकण्याचा त्याचा निश्चय झाला. त्याच दिवशीं गडाच्या तटबंदीखालीं दोन सुरुंग भरवून त्यांना त्यानें एकदम बत्ती देवविली. ते दोन्ही सुरुंग उडवून पूर्वीप्रमाणें तटबंदीला दोन ठिकाणीं दोन मोठालीं नवीं खिंडारें पाडलीं. शूर गुलाबबाईनें लगेंच तीं खिंडारें भरून काढण्याचा उद्योग आरंभिला. तिनें कित्येक लांकडाच्या चौकटी चिखलमातीनें पूर्वींच भरून ठेवविल्या होत्या. त्या चौकटी खिंडारांत आणून उभ्या केल्या, आणि त्यांच्या पुष्टीला आंतून दुसरी एक नवीन भिंत बांधली. गडाच्या भिंतीवर एक लहानशीच, पण पाणीदार व दृढनिश्चयी शिपायांची टोळी उभी केली होती. तिनें आपल्याजवळ डांबर व तेल

'या अल्ला! त्या रणभूमींतून त्याचें प्रेत देखील दहन करण्यास मिळालें नाहीं ना! असो, बीरबल आतां पार्थिव जडदेहरूपी शृंखलेपासून मुक्त झाला आहे. त्याच्या देहशुद्धीला सूर्यकिरणच बस आहेत. अग्निसंस्काराची कांहीं आवश्यकताच राहिली नाहीं.'

भरलेल्या मोठमोठ्या कढया विस्तवावर तापत ठेविल्या होत्या. डांबराला उकळ्या फुटत होत्या. तटाला शिड्या लावून शत्रूचे लोक वर चढूं लागले कीं, वरचे लोक त्यांच्या डोक्यांवर त्या कढलेल्या डांबराच्या कढया ओतीत होते! अशा रीतीनें कैक लोकांचीं त्यांनीं अंगें भाजून काढिलीं. शिवाय, लहानमोठ्या रजपूत स्त्रिया तटावर पुरुषांच्या मागें उभ्या राहून लढाईचें सामान हातीं देऊन त्यांना कुमक करीत होत्या. शेवटीं शेवटीं अन्य जातींच्या बायकाही आपल्या पुरुषांना करवेल तितकी मदत करूं लागल्या. किल्ल्यांत ठळक ठळक बाया होत्या, त्यांनीं आपल्या आप्त स्वकीयांकडून पूर्वींच जोहार करवून घेतला होता. पति, पुत्र, बंधू, इत्यादिकांकडून आपल्याला मारवून घेऊन त्यांनीं रणकुंडांत स्वदेहार्पणें केलीं होतीं! त्या रणयज्ञांत त्यांनीं आपल्या प्राणांचे स्वाहास्वधाकार केले होते! त्या दीव्यांतून वांचलेल्या बायका खिंडारापाशीं उभ्या राहून हातीं तरवारी घेऊन मरण्यास सिद्ध झाल्या होत्या. कांहीं बायका जातीनें पडकीं खिंडारें भरीत होत्या. आंतील स्त्रिया व पुरुष याप्रमाणें किल्ल्याचें संरक्षण करण्याच्या कामांत गुंतले असतां प्रतापसिंग त्रिपुरसुंदरीच्या मातेपुढें जाऊन उभा राहिला! त्याजकडे तिरस्कारयुक्त मुद्रेनें पाहून ती पुढें चालती झाली, तेव्हां—

प्रतापसिंग—मातुश्री, या बालकावर अशी रुष्ट मर्जी नसावी. माझें मन अगदीं उदास झालें आहे. ज्यापक्षीं रजपूताच्या नांवाला कलंक लागण्यासारखें मीं काम केलें आहे असें तुमच्या मनानें घेतलें आहे, त्यापक्षीं तो कलंक धुऊन टाकून तुमची मर्जी सुप्रसन्न करण्याचे उद्देशानें मी तुह्माकडे आलों आहें. जो मनोरथ माझ्या अंत:करणांत घोळत होता तो मी सोडून देऊन मोकळा झालों आहें!

आतां ब्रह्मदेवानें माझ्या नशीबीं जें लिहून ठेविलें असेल तें भोगण्याला मजकडून तयारी आहे !

गुलाबबाई—ज्या मनुष्याला नांवलौकिकापेक्षां जगणें अधिक प्यारें असेल तो शूर वीराच्या मरणाला मुकला असेंच समजलें पाहिजे. त्यानें हातीं कांकणें भरून सांधीकोपऱ्यांत बसून हिजड्यासारखें मरावें हेंच योग्य आहे. हल्लीं मजपाशीं शूर शिपाई उभे आहेत तेवढेच मला बस आहेत ! चितूरच्या संरक्षणासाठीं त्यांनीं केलेली मर्दुमकी बखरीकार आपल्या बखरींत लिहून ठेविल्याशिवाय राहणार नाहींत ! तू त्या परधर्मी मुसलमान राजाला शरण जाऊन त्याचीच क्षमा मागून घे ! त्याचा बंदा गुलाम होऊन रहा. आह्माला तुझ्या मदतीची गरज नाहीं !

असें त्या शूर बाईचें तिरस्कारयुक्त भाषण ऐकून प्रतापसिंगानें लाजून आपली मान खालीं घातली; पण, ती जागा सोडून त्याच्यानें माघारें जाववेना. शेवटीं तिकडून शत्रूच्या टोळ्या किल्ल्यापुढें वाढून येत असल्याचें त्याच्या नजरेस पडलें, त्या वेळेस एकदम धांवत जाऊन शत्रूच्या नरडीचा घोंट घ्यावा असें त्याच्या मनांत आल्याचें त्याच्या नेत्रचांचल्यावरून दिसलें. त्यानें तिकडे वाघासारखी क्रूर दृष्टि फेंकिली, आणि नंगी तरवार हातीं घेऊन ज्या खिंडारांतून शत्रूचा प्रवेश आंत होईल असें वाटलें त्या ठिकाणीं तो धैर्यानें धांवत गेला. तेथें शत्रूचे लोक भरदौडीनें येऊन दाखल झाले. नदीला बांधलेलें धरण फुटून जसें पाणी बाहेर फुटावें, तशी त्यांनीं खिंडारांतून आंत मुसंडी मारली. मुसलमानांची पुढची टोळी खंदकापाशीं येऊन भिडतांच तिला प्रतापसिंगाच्या टोळीनें मोठाच अडथळा केला. तिनें त्यांजवर मोठ्या जोराचा हल्ला करून त्यांना मागें हटविलें. त्याच वेळेस वरच्या लोकांनीं कढ आलेल्या

डांबराच्या कढया शत्रूंच्या डोक्यांवर भडाभड ओतल्या. त्याच्या योगानें भाजलेल्या वांग्याप्रमाणें त्यांच्या अंगाचीं सालडीं निघून, हाय हाय, तोबा तोबा, करीत ते खालीं पडले ! रजपूतांच्या या नवीन युक्तीनें मुसलमानांची त्रेधा उडाली. कांहीं लोक तट सोडून मागें परतण्याबरोबर त्यांची दुसरी टोळी पुढें सरून हल्ला करूं लागली. पुनः तिजवरही त्यांनीं डांबराचा कढत कढत रस ओतला; मुसलमान शिपाई हळू हळू मागें हटत चालले. खिंडारांत पोहों-चलेल्यांचे फारच हाल झाले. त्यांजवर रजपूत शिपायांनीं तो-ड्याची बंदुक सुरू केली. त्या गोळीबारानें शत्रूची फारच नासाडी झाली. त्या वेळेस मनुष्याचें रक्त पिऊन मस्त झालेला वाघ जसा खवळतो, तसा प्रतापसिंग आपलें देहभान विसरून जाऊन ल-ढत राहिला. त्याला दोन मोठ्या जखमा झाल्या, तरी त्यानें आपली जागा सोडिली नाहीं. रात्र पडतांच युद्ध करण्याचें काम सोडून अकबराचे लोक आपल्या छावणीस परतले. झालें, त्या दिवसाचें युद्ध संपलें !

वेढ्यांत सांपडलेल्या लोकांची किंचित् सरशी होण्याबरोबर ते गर्वानें फुगले; पण, दुसऱ्या दिवशीं तशाच नेटानें उभें राहण्याची त्यांच्यामध्यें ताकद राहिली नव्हती. नवीन दमाचे मुसलमान शिपाई वरचेवर पुढें सरून मारा करीत; यामुळें, रजपूतांची संख्या कमी कमी होत गेली. तटाच्या नवीन बांधकामांवर त्यांनीं वरचे-वर शिस्त धरल्यामुळें तीं कामें अधू झालीं. तरी रजपूतांचा कृत-संकल्प होता कीं अकबराचें एकूनएक मनुष्य खंदकाच्या पलीकडे जाईपर्यंत हत्यार खालीं ठेवावयाचेंच नाहीं !

## भाग नववा.

### अखेर अग्निकुंडांत गुलाबबाईची पूर्णाहुती.

दुसऱ्या दिवशीं सूर्य उगवला नाहीं तोंच पुनः युद्धास आरंभ झाला. जलालखानाची टोळी चितूरगडाकडे चाल करून तटाला शिड्या लावून जे लोक वर चढले, त्यांपैकीं पुष्कळांना वरच्या लोकांनीं धडाधड खालीं ढकलून दिलें. ते लोक 'या खुदा, या नभी' करीत खालीं पडले कीं, दुसरे नव्या दमाचे लोक शिड्या चढावयास लागत. वेढ्यांत सांपडलेल्या कांहीं हिंदूंनीं शत्रूला मागें हटविण्यासाठीं पराकाष्ठेचे श्रम केले, तरी इलाज चालेना. कांहीं मुसलमान शिपाई तटावर जाऊन नेटानें उभे राहिले. खंदक शत्रूच्या ताब्यांत गेला. प्रतापसिंगानें बरेच लोक तरवारीनें छाटून टाकिले; पण, आकाशच कोसळल्यावर तो बिचारा एकटा काय करील ? शेवटीं, शत्रूकडची एक गोळी त्याच्या मस्तकांतून पार झाली आणि तो लागलाच खंदकांत पडला !

तिकडे गुलाबबाईच्या अंगावर भयंकर जखमा झाल्या होत्य । तरी ती प्रतापसिंग, रणसिंग, जेतसिंग, वगैरे सरदारांना उत्तेजन देत उभी होती. प्रतापसिंग गोळी लागून पडल्याचें पाहून ती खंदकाकडे शत्रूवर चाल करून गेली. तिजबरोबर पृथाबाई, कुंवरबाई, वगैरे कित्येक शूर स्त्रियाही पुढें सरल्या. माझा देह शेवटीं खंदकांत तरी पडो; पण, शत्रूच्या हातीं न लागो, अशी

तिची इच्छा होती; पण, ती वीरश्रीमातेची आवडती कन्या पुढें वाहून गेल्याबरोबर, जलालखान, तकरीबखान, वगैरे सरदारांच्या तरवारी हातांतून गळून पडल्या. त्या वीरपत्नीवर हत्यार चालविणें योग्य नाहीं असें वाटून त्यांनीं आपल्या तरवारी मोठें पोट करून खालीं ठेविल्या, असें ह्मटलें तरी चालेल. तिच्यावर हत्यार न चालवितां तिला जीवंत धरण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्यांचा आपल्याला जीवंत धरण्याचा रोंख आहे असें कळतांच ती किल्ल्याकडे माघारी परतली. मागून मुसलमान शिपाई तिच्या पाठीस लागले. तिच्या अंगांतून रक्ताच्या धारा चालल्या होत्या, तरी तिनें घोडा वेगानें दामटून आपला वाडा गांठला. थोरल्या दरवाजानें आंत शिरून तिनें तो लावून घेतला, आणि त्रिभुवनसुंदरीला हांक मारून ह्मणाली—'बा त्रिभुवन, आपला इष्ट हेतु साधून घेण्याची हीच वेळ आहे. कांहीं झालें तरी शत्रूच्या हातीं जीवंत सांपडावयाचें नाहीं, असा माझा सत्यसंकल्प आहे.' ती मग बरोबरच्या दुसऱ्या स्त्रियांनाही ह्मणाली—'मायबहिणींनो, हे नोडगे आतां आपल्या अब्रूवर हात टाकण्यास येत आहेत. रजपूतांच्या स्त्रियांतही शौर्य किती आहे हें त्यांना कळून चुकलेंच आहे. त्यांच्या हातीं जीवंत सांपडण्यापेक्षां या पेटलेल्या चितेंत देह टाकून आपली कीर्ति अचल करून टाका. आपल्या पवित्र अंगाला त्यांच्या अपवित्र हातांचा विटाळ होऊं देऊं नका. पातिव्रत्यरक्षणाहून रजपूतकन्येला दुसरें भूषण नाहीं, याकरितां पवित्र अग्निनारायणाला आतां आपल्या देहाची आहुति देऊन रजपूतांच्या शुद्ध कुलाला धन्य करा.'

अशा प्रसंगासाठींच त्या ठिकाणीं कांहीं मशाली पेटवून ठेविल्या होत्या. त्या हातीं घेऊन वाड्याच्या चारी बाजूंला त्यांनीं प्रथम आग लावून दिली. वाड्याच्या मधल्या चौकांत एक प्र-

चंड चिता पेटली होती, तिच्या भोंवती गुलाबबाई, पृथाबाई, कुवरबाई, रूपावतीबाई, किसनकुवरबाई, पद्मिनीबाई, वगैरे सर्व अमीरस्त्रिया, सरदारस्त्रिया व नागरिकस्त्रिया सशस्त्र उभ्या राहिल्या. त्रिभुवनसुंदरी आपल्या आईइतकी निधड्या छातीची नव्हती. गुलाबबाई चितेकडे निघाली तेव्हां त्रिभुवनसुंदरी थरथरां कांपूं लागली ! तिनें मोठ्यानें एक किंकाळी फोडिली ! त्या क्षणीं ती माघारीही परतली; पण, गुलाबबाईनें तिचा हात धरून तिला जोरानें पुढें ओढीत नेलें आणि ह्मटलें,–'बेटा त्रिभुवन, मृत्यूशिवाय आतां आपल्याला दुसरा थारा नाहीं. चल, मी तुला उचलून घेतें.' असें बोलून तिला तिनें कडेवर उचलून घेतलें. मग सगळ्या दुःखांचा विसर पाडणाऱ्या चितेवर पाय ठेवून ती वर चढून गेली. आपल्या हातांतील मशालीनें तिनें ती पेटविली, आणि मोठ्या स्वरानें ती ह्मणाली– 'जय महाकाली, आह्माला आपल्या पोटांत घे'. गुलाबबाईनें उडी टाकण्याबरोबर तिच्या पाठोपाठ सर्व स्त्रियांनीं कालिकेचा उच्चार करून त्या चितेंत भडाभड उड्या टाकल्या. एका घटकेच्या आंत मृत्यूच्या बाहुपाशांत गुरफटून जाऊन त्या सर्व भस्मीभूत झाल्या ! नंतर राजवाड्याचे सर्व दरवाजे फोडून अकबराचे शिपाई 'दीन बोलो दीन' असें ह्मणतच एकदम वाड्यांत शिरले. ज्या शिकारीसाठीं त्यांनीं एवढा प्रयत्न केला ती तर हातीं लागली नाहींच. चितांचा लवकर भडका व्हावा ह्मणून त्यांजवर तेलाचे बुधलेही ओतले होते. अग्नीच्या ज्वाला रजपूत स्त्रियांचे गुण गात गात, गगनाला जाऊन भिडल्या ! स्वराजनिष्ठा, स्वधर्मश्रद्धा व स्वमातृभूमीचा अभिमान, यांचा तो अजब तमाशा पाहून कोणाचें हृदय विव्हल होणार नाहीं बरें !

खुद्द अकबरबादशाहाही आपल्या लोकांबरोबर किल्ल्यांत

शिरला होता. त्या ज्वालांचा भडका पाहून तो चितांजवळ जाऊन उभा राहिला, आणि तेथचा सर्व प्रकार पाहून तो खिन्न झाला आणि आपल्या भाषेनें ह्मणाला—'अल्ला परवरदिगार! अफ्-सोस! अफ्सोस! ये क्या हुवा! सब् रजपूत औरता जलके खाक हो गई!! तोबा, तोबा! क्या इनकी जवामर्दी है! बसंतसिंग और प्रतापसिंग सरीके तलवारबहाद्दर मर्द, और गुलाब, कुंवर-सरीके शूर औरता, रजपूत लोगोमें पैदा होती है, उनकी तकदीर क्या कहना? मगर, माधवसिंगके मुवाफिक कोइ कोइ बेइमान हरामजादेभी पैदा होते है! ऐसे निमकहरामके फितूरीसे, और फिसादसे, ये मुल्क काबू करनेको कुच देर लगनेका नही! अल्ला! क्या तेरी कुदरत है! गुलाबराणी! ये जलालुद्दिन महंमद अकबर तेरा फरजंद है! वो: तेरेको कुरनीसा करता है! (याप्रमाणें चितेला सलाम करून) परवरदिगार! मैं तेरा गुन्हेगार हूं! मेरा गुन्हा माफ कर!'

असो, अकबरशाहा याप्रमाणें अखेर विजयी झाला. त्याची सर्व फौज आंत शिरली. ज्या नागरिकांनीं जोहार घेतला नव्हता आणि ज्यांना आत्महत्या करून घेण्याची छाति झाली नाहीं, ते लोक घरें दारें सोडून देवालयांत जाऊन भरले. त्यांनीं त्यांचीं कवाडें आंतून लावून घेतलीं. मुसलमानांकडून सुनता करून घेण्यापेक्षां देवापुढें डोकीं फोडून प्राणत्याग करण्याचा त्यांनीं निश्चय केला. अकबरशाहाच्या लोकांनीं देवळांचे दरवाजे फोडले. ज्यांनीं डोकीं फोडून घेतलीं ते सुटलेच; पण, जे जीवंत हातीं सांपडले त्यांची त्यांनीं एकसा कत्तल केली! देवांपुढें जसे बकऱ्यांचे बळी देतात, त्याप्रमाणें हजारों लोकांचे तेथें बळी पडले; पण, ते धर्मांतर कर-ण्यास कबूल झाले नाहींत. त्यांचे गळे कापून घेतांना ते खुशाल हांसत होते. त्यांनीं शत्रूची अजीजी केली नाहीं. हिंदू देवाल-

यांचीं बांधकामें फार सुरेख व भव्य होतीं. त्यांतील मूर्ति भग्न केल्या, तरी धर्मवेडांत देवालयेंही जमीनदोस्त करण्याचा त्यानें मूर्खपणा केला नाहीं. पुरातन देवालयें जशींच्यातशीं कायम ठेविलीं. त्यांचीं बांधकामें पाहून तो फार चकित झाला. त्यांवरून हिंदू लोकांच्या कलाकुशलतेविषयीं त्याची बालंबाल खातरी झाली. त्यांच्या धर्मसमजुती मात्र त्याला मान्य नव्हत्या. ही गोष्ट प्रत्येक धर्माच्या लोकांस लागू आहे, तरी धर्मौदार्याविषयींही त्याची ख्याति होती. आपली थोरवी दुसऱ्यांनीं वानावी व आपला कीर्तिदुंदुभि सर्व जातींच्या लोकांचे कर्णविवरांत सदोदित दुमदुमत राहावा, अशी त्याची इच्छा होती; ह्मणून, बहुशः खरा धर्म व नीति यांना अनुसरून त्याचें आचरण असे, असो.

चितूरगड पूर्ण रीतीनें अकबरशाहाच्या ताब्यांत गेला. तेथील मनुष्यहानि झालेली पाहून त्याला अतिशय वाईट वाटलें. शत्रूच्या तिरस्कारानें पूर्वकालीन चालीप्रमाणें जोहार घेऊन हजारों रजपूत, बाल, तरुण व वृद्ध स्त्रियांनीं, आपले प्राण दिले. त्यांनीं आप्त स्वकीयांच्या हस्तें तरवारीनें आपल्यास कापून घेतलें. पेटलेल्या चितांत उड्या टाकल्या. घरोघर रक्ताचे पाट वाहले. कुजलेल्या प्रेतांच्या दुर्गंधीनें वातावरण कोंदटून गेलें. एवढ्या मोठ्या अनर्थाचें कारण काय ? तर मनुष्याची मूळची पशुवृत्ति, हें होय. त्याच्या मूर्खपणानें व दुर्वर्तनानें या जगांत कधींकधीं कोठें कोठें पातकांच्या डोंगरासारख्या राशी पडतात!

चितूरास रजपूत राजांच्या वेळीं पूर्वी सोन्याचा धूर निघत होता, असें ह्मणतात; पण, या युद्धांत तेथील स्थावरजंगम सृष्टीचा बहुतेक नाश होऊन गेला. बादशाहानें गडावर प्रवेश केला, तेव्हां त्याच्या हाताला फारच थोडी संपत्ति लागली. जोहार घेतांना तेथील नागरिकांनीं आपली दरोबस्त मौल्यवान् चीजवस्त बरबाद करून टाकली. कांहींवरून पाटा वरवंटा फिरविला,

आणि कांहीं जाळून पोळून फस्त केली. मागें शत्रूच्या हातीं कांहीं लागूं द्यावयाचें नाहीं, ह्मणून देवालयांतील लाखोंगणती पैसा अडका व देवांच्या अंगावरील कोट्यावधि रुपयांचा दाग-दागिना त्यांनीं विध्वंस करून टाकिला.

अकबरशाहानें चितूरांत विजयप्रवेश केला, त्या वेळेस त्या सर्व किल्ल्याला ओसाड व जळालेल्या रानाची कळा आली होती. मनुष्याची वस्ती उठून वन्य पशू व सर्पकीटकादि जीवजंतू यांनीं राहण्यायोग्य त्या जाग्याला भयंकर स्वरूप आलें होतें!

अखेरीस जे लोक किल्ल्याचे दरवाजे उघडून बाहेर पडले, त्यांच्या मनाची समजूत अशी झाली होती कीं, स्वदेशासाठीं व स्वधर्मासाठीं जर आह्मी रणांगणांत पडलों, तर पुढें स्वर्गलोकचें सुख चिरकाल भोगूं. मृत्युलोक ही दोन दिवसांची वस्ती आहे. एथें सुख आणि दुःख दोन्ही सारखींच आहेत. नश्वर ऐहिक विषयांचा त्याग करून तेथील चिरंतन सच्चिदानंदसुखाचा लाभ घेऊं. अशा बुद्धीनें प्रथम स्नानविधी करून ते शुचिर्भूत झाले, देवांच्या पूजा अर्चा केल्या, गोरगरिबांना दानधर्म केला, मस्तकांवर जिरे टोप घालून त्यांत तुळशीच्या मंजिऱ्यांचे तुरे खोविले, गळ्यांत एकेक शालिग्राम बांधला, अंगांत चिलखतें चढविलीं, आणि जोहाराचा केशरी पोषाक केला. मग त्यांनीं एकमेकांना कडकडून आलिंगनें देऊन शेवटची भेट घेऊन ते लढाईला निघाले! त्याचा परिणाम शेवटीं वरप्रमाणें झाला! असो.

किल्ल्यांतील ओसाड पडलेल्या रस्त्यांतून बादशाहा पायानें चालत गेला. तो देखावा पाहून त्याच्या मनाला फारच दुःख झालें. कांहीं ठिकाणीं हातपाय तुटलेलीं प्रेतें पडलीं होतीं. तीं कुजून हिरवींनिळीं झालीं होतीं. दुर्गंधीनें हवा अशुद्ध होत चालली होती. मृतांचीं स्वरूपें कुरूप झालीं होतीं. ज्यांनीं आत्महत्या केल्या होत्या, त्यांचे मुडदे जमिनींत खळगे खणून पु-

रून टाकले होते. खड्डे फारसे खोल खटलेले नव्हते; यामुळें, कित्येक प्रेतांचे अवयव बाहेर पडले होते. मग बादशाहानें सगळीं प्रेतें एका जागीं गोळा करवून त्या प्रेतपर्वताला एकदम अग्नि देवविला. हवा शुद्ध होण्यासाठीं लांकडांचे ढीग कांहीं दिवस जळत ठेविले होते. या सर्व कृत्यांचें मूळ कारण पाहिलें तर अकबरशाहाची अनिवार राज्यतृष्णा, द्रव्यतृष्णा, अधिकारतृष्णा व कीर्तितृष्णा, या होत ! या तृष्णांच्या पायीं आजपर्यंत कैक राजे व बादशाहा यांनीं या जगतितलावर दुःखाचे डोंगर उभे केले ! भर्तृहरीनें ह्मटलें आहे कीं:—

'तृष्णा न जीर्णा, वयमेव जीर्णाः'

ह्मणजे आह्माला जीर्णावस्था आली तरी तृष्णा कधीं जीर्ण होत नाहीं. तिची यौवनदशा कायमची कायमच राहाते. या तृष्णेच्या शांत्यर्थ लाखों मनुष्यांचे बळी पडतात, रक्तोदकाच्या नद्या वहातात व सदसद्विवेकसंपन्न मनुष्य प्राणि अत्यंत निंद्य कर्मे करण्यास प्रवृत्त होतात !

जगाला दिपवून सोडणाऱ्या अकबरशाहासारख्या प्रतापशाली पुरुषांचीं अचाट कृत्यें पाहून व त्यांची सदा यशस्वी तरवारबहाद्दरी पाहून आपणांस नवल वाटतें. त्यांचा उद्योग, तरतरी, कार्यकुशलता आणि आटोकाट धोरण पाहून आपलें मन थक्क होतें; पण, त्या गुणांबरोबर ते सदाचरणी नसले तर त्यांजविषयींची पूज्यबुद्धि कायम राहात नाहीं. त्यांच्याविषयीं आपलें अंतःकरण आदरबुद्धीनें विनम्र व प्रेमपूरित राहात नाहीं. त्यांच्या गळ्यांत विजयश्रीनें माळ घातल्यानें त्यांनीं सर्व कांहीं मिळविलें असें होत नाहीं. तिला सदाचरणरूपी पाठिंबा नसला तर तिची फारशी प्रतिष्ठा मानिली जात नाहीं. पानपतच्या प्रसिद्ध घोर संग्रामांत अतिशय रक्तपात झाला, लाखों पुरुष व हजारों स्त्रिया मारल्या गेल्या, महाराष्ट्रांतील हजारों स्त्रिया वैधव्यानलानें दग्ध झाल्या,

असंख्यात पोरेंवाळें उघडीं पडलीं ! असें झाल्याशिवाय मोठ्या युद्धाचा शेवट होत नाहीं, हें ठरलेलेंच आहे; परंतु, त्यामध्यें बलात्कार, क्रूरपणा, दुराग्रह, लुटीची हांव व विषयासक्ति, असल्या दोषास्पद प्रकारांची जर जरूर पडली तर जयलक्ष्मीला कावीज करणाऱ्या पराक्रमी पुरुषांचा मनापासून कोण गौरव करील ? भूतदया व नेमस्तपणा न राहिल्यामुळें अकबरशाहा, निदान या चितूरगडप्रकरणाच्या संबंधानें तरी, नरमेध करणारा एक राक्षस होऊन गेला असें ह्मणतील. व्यवस्थितपणा, पापाचा द्वेष, वाईट कृत्यांचा तिटकारा, स्त्रीपुरुषांबद्दल पूज्यबुद्धि, दातृत्व, बंधुप्रेम, विचारस्वातंत्र्य, सदाचारप्रियता, वगैरे गुणांचा प्रसार होऊन मानववध बंद होऊन मानवी शरीरांत जें पशुत्व आहे त्याचा वध झाला पाहिजे होता. अंगीं रणकौशल्य उत्तम प्रतीचें असल्यामुळें यापूर्वीच्या चार पांच लढायांमध्यें आपल्या शत्रूला अकबरशाहानें चांगलें जेरीस आणिलें, हें खरें आहे. शूरांमध्यें त्यानें अग्रेसरत्व मिळविलें, तरी स्वार्थासाठीं त्यानें परार्थहानि केली, आणि संपत्तीच्या व कीर्तीच्या लालसेनें त्याच्या नांवाला अनीतीचा काळा डाग लागला, तो कसा धुतला जाईल ? अंगीं दुसरे कितीही सद्गुण असले, तरी नीतिपथांतून एकादवेळीं एकाद्याचा पाय घसरला ह्मणजे त्याचा कीर्तिचंद्र मलिन झाल्याशिवाय राहात नाहीं. नुसती संपत्ति, अधिकार, शौर्य, मानमरातब, पराक्रम, विद्या, कला, इत्यादिकांत खरी प्रतिष्ठा नसते. ज्याचे विचार, उच्चार व आचार निर्मल असतात, तोच जगामध्यें खरी खरी प्रतिष्ठा पावतो. गुलाबबाईवर जय मिळविल्यानें अकबरशाहाची असामान्य प्रतिष्ठा वाढली असें ह्मणवत नाहीं. खऱ्या प्रतिष्ठेची भक्कम इमारत नैतिक पायावर उभारली गेली तरच ती चिरकाल राहते, असो.

चितूरगड हस्तगत होऊन मला जय मिळाला तर मी तुझ्या दर्शनास पायानें चालत येईन, असा मीर-माजू-इ-दीन अवलिया यास अकबरशाहानें नवस केला होता. हा इसलाम अवलिया शीजस्तानचा राहणारा असून हिंदुस्तानांत प्रथमच आला होता. हें प्रख्यात पीरस्थान अजमिराजवळ एका टेंकडीवर आहे. हें फार जागृत स्थान आहे असें ह्मणतात. शाहाला जय मिळाल्यावर केलेला नवस फेडण्याकरितां तो लागलाच तेथपर्यंत पायानें चालत गेला. इ. स. १५६७ सालीं त्यानें चितूरावर स्वारी केली, त्या वेळेस त्याचें अवघें २५ वर्षांचें वय होतें. तो आपल्या वयाच्या तेराव्या वर्षापासूनच राज्यकारभार पाहूं लागला होता. चितूरगड घेतल्यावर सुमारें ३८ वर्षें त्यानें राज्य केलें. त्याच्या राज्यवृक्षाच्या मुळ्या हिंदुस्तानच्या जमिनींत खोल शिरून त्या वृक्षाला सुखशांतीचीं गोड फळें येऊं लागलीं. त्यांचा सर्व जातींच्या प्रजेनें उत्तम उपभोग घेतला. याचें सर्व श्रेय अकबरशाहाला दिलें पाहिजे. त्याच्याच राज्यपद्धतीचा कित्ता इंग्रजांनीं घेतला आहे, असें अकबरशाहाच्या चरित्रांत कर्नल म्यालेसननें निष्प्रांजलपणें कबूल केलें आहे. शास्त्री, साधु, पंगु, कुलीन पण असमर्थ, या चार प्रकारच्या लोकांस त्याचा उदार आश्रय असे. शेवटीं सदर चरित्रकर्त्यानें त्याच्याविषयीं लिहून ठेविलें आहे कीं, तो काळ कसा होता आणि आपलीं कृत्यें शेवटास नेण्यास त्यानें कोणकोणत्या युक्तया योजिल्या, याचा विचार करूं लागलें ह्मणजे एकादें राष्ट्र संकटांत असून त्याला धर्मस्वातंत्र्य व शांतिसुख देण्यासाठीं जगन्नियंता प्रभु एकादी महाविख्यात विभूति जन्मास घालतो, तशाच प्रकारची विभूति हा अकबरबादशाहा होऊन गेला, असें अवश्य मानलें पाहिजे.

# भाग दहावा.

## गुण–दोष–वर्णन.

चितूरगडांत अनेक जीवांचा संहार व धूळधाण झाल्यावर रजपुतान्यांत जिकडे तिकडे स्वस्थता झाली. अकबरशाहा विजयी होऊन उत्तरहिंदुस्तानचे बहुतेक हिंदू राजे स्वसंरक्षणार्थ त्याला शरण गेले. एक उदयसिंह मात्र शरण गेला नाहीं. चितूरगडची गादी मुसलमानांच्या ताब्यांत गेल्यावर कित्येक वर्षेंपर्यंत उदयसिंहाच्या कुटुंबाच्या माणसांनीं अरण्यवासांत दिवस काढले; तरी शेवटीं अकबरशाहाच्या तोंडून त्या शूरवंशानें आपलें स्वातंत्र्य कबूल करविलें. याचें नांव स्वाभिमान आणि आपलेपणा!

पुढें सन १५६९ सालीं रतनभोर व कलिंजर हीं रजपूतांचीं ठिकाणें त्यानें काबीज केलीं. इ० स० १५७० त बिकानेरचा राजा कल्याणमल्ल याच्या सुस्वरूप मुलीशीं बादशाहानें लग्न करून त्या राजाला आपल्या लष्करी खात्यांत एक मनसबदारी दिली. अकबरशाहाच्या पदरीं राजा तोडरमल्ल[१] हा एक हुशार हिंदू मुत्सद्दी

---

१ हा तोडरमल्ल जातीचा खत्री होता. तो अयोध्या प्रांतांतला राहणारा होता. गुजराथ सर झाल्यावर तेथील वसुलाची पद्धत लावून देण्याचें महत्वाचें काम त्यानें केलें. त्याला आलम व डंकानिशाण मिळालें होतें. अकबरच्या कित्येक मोहिमांत तो प्रमुख होता. तो मोठा शूर पुरुष होता. राज्यांतील मुलकी कामांची सर्व जबाबदारी त्याज-

होता. काश्मीर, बंगाला, बहार, ओढ्या व आसाम, हे प्रांत त्याच्या साह्यानें अकबरशाहाच्या ताब्यांत आले. उदेपूरच्या राण्याशिवाय इतर सर्व रजपूत राजांनीं त्याचें सार्वभौमत्व कबूल केलें. सारांश, नर्मदेच्या उत्तरेस जेवढा प्रदेश अकबराच्या ताब्यांत आला, तेवढा एका राजाच्या ताब्यांत पूर्वीं कधींही आला नव्हता. याप्रमाणें तिकडे सर्वत्र स्वस्थता झाल्यावर दक्षिण देशाकडे लक्ष देण्यास अकबरशाहाला फुरसद मिळाली. अहंमदनगरास चांदबिबीबरोबर लढाई होऊन वऱ्हाडप्रांत मोंगलांस मिळून तिनें त्यांजबरोबर शेवटीं तह केला.

अकबरशाहाचे दोन तीन मुलगे त्याच्या देखत वारल्यामुळें त्याचें मन फार उदास व खट्टू झालें होतें.

त्यानें पूर्व वयांत कट्ट्या मुसलमानास साजण्यासारखी वर्तणूक केली; पण, तरुण वयांत त्यानें सर्वधर्मीयांस सारखें वागविण्याचा क्रम ठेविला. रजपूत जातीच्या राण्यांवर त्याची विशेष प्रीति असे. रजपूत घराण्यांतील स्त्रियांना खुष ठेवण्यासाठीं

---

वर सोंपली होती. पुढें त्याला त्यानें आपली वजीरीही दिली होती. तो हिंदू धर्माचा निःसीम भक्त होता. जमाबंदीची नवीन पद्धत चालू केल्याबद्दल सर्व देशांत अद्यापि त्याची प्रसिद्धि आहे. त्यानें नाण्यासंबंधीही बराच फेरफार केला. त्यानें हिशेबी जमाखर्चाचें काम फारशी भाषेंत लिहिण्याचें सुरू केलें, यामुळें हिंदू लोक फारशी भाषेंत प्रवीण होऊन त्यांना मोठमोठ्या जागा देण्याचा अकबरानें प्रघात घातला. अकबर स्वतः एकदां तोडरमल्लाच्या घरीं भेटीस गेला होता, यामुळें त्याचा फारच बहुमान झाला. तो वृद्धापकाळीं अकबराची रजा घेऊन हरिद्वारास गंगातीरावर जाऊन राहिला होता; परंतु, 'केवळ गंगातीरावर जाऊन स्वस्थ राहण्यापेक्षां आपलें कर्तव्यकर्म करणें यांतच अधिक पुण्य आहे' असें सांगून त्याला त्यानें परत आपल्या जवळ बोलावून घेतलें होतें.

तो ब्राह्मणजातीसही दानधर्म करी, व हिंदू देवतांची प्रार्थना करी. त्याच्या राज्याचा चौदा कोट रुपये वसूल असून तोडरमल्लानें लावून दिलेल्या शिस्तीप्रमाणें तो वसूल होत असे. त्यानें रजपूत राजांस आपल्या लष्करांत मोठमोठ्या हुद्यांच्या जागा दिल्या. अमीर व मनसबदार हे त्यांचे हुद्दे होते. धर्मसंबंधांत तो अगदीं उदासीन राहत असे. तो आपल्या रजपूत राण्यांकडून यज्ञयाग व वेदोक्त धर्मविधीही करवीत असे.

त्यानें ईश्वरविषयक वादविवादांची एक मोठी सभा फत्तेपूर शिक्रीं एथें स्थापन केली होती. तींत सुफी, पंडित, धर्मोपदेशक, वकील, सुनी, शिया, ब्राह्मण, बौद्ध, खिस्ती, यहुदी, पारशी व इतर सर्व पंथांचे विद्वान् लोक, यांची वादविवाद करण्यासाठीं योजना केली होती. त्या भव्य विद्यामंदिराला त्यानें इबादतखाना हें नांव दिलें होतें. तेथील धर्मसभेंत मुसलमान काजी ३८, हिंदू पंडित ३९, वैद्य १५ व कवी १५३ दाखल केले होते. फत्तेपूर शिक्री हें नवीनच शहर वसविलें होतें. तें आग्र्याच्या नैर्ऋत्य दिशेला अकरा कोसांवर आहे. धर्मसभेंतील विद्वानांस तो वरचेवर खैराता देत असे. दरगुरुवारीं रात्रीं तेथें सर्वांशीं मोकळ्या मनानें वादविवाद करण्याचा त्यानें प्रघात घातला होता.

मनुष्याची प्रवृत्ति जन्मतःच धर्माकडे असते, असें मुसलमान लोक ह्मणत. त्याची प्रचीती पहाण्यासाठीं अकबरशाहानें एक चमत्कारिक प्रयोग करून पाहिला. आयांच्या अंगावर पिणारीं कांहीं मुलें जमा करून तीं कांहीं वर्षेंपर्यंत एकांतवासांत त्यानें कोंडून ठेवलीं. तेथें त्यांच्या कानीं कोणत्याही भाषेचा शब्द पडूं दिला नाहीं. या प्रयोगापासून शेवटीं कांहीं निष्पन्न झालें नाहीं. कांहीं वर्षांनीं तीं मुलें बाहेर काढून पाहिलीं, तों तीं सर्व मुकीं निघालीं.

त्यानें सर्व धर्मांचा विचार करून एक नवीनच धर्म स्थापण्याचा बेत केला. महंमद पैगंबरानें ज्याप्रमाणें यहुदी आणि ख्रिस्ती अशा दोन धर्मांतील चांगल्याचांगल्या गोष्टी निवडून घेऊन मुसलमानी धर्म रचला, त्याचप्रमाणें सर्व धर्मांतून निवडक निवडक चांगल्या गोष्टी टांचून घेऊन अकबरशाहानें आपल्या नवीन धर्मांची रचना केली. त्याला त्यानें 'दिने–इलाही' हें नांव दिलें. मुसलमानी धर्मांतील सुनता व बहुपत्नीत्व, ख्रिस्ती धर्मांतील बाप्तिस्मा (तीर्थप्राशन) व येशूची उपासना, हिंदू धर्मांतील पुनर्जन्म व मूलप्रकृतीचें श्रेष्ठत्व, पारशी लोकांतील अग्निपूजा, इत्यादि विषय त्यानें आपल्या नवीन धर्मांत गोवून टाकिले. त्यानें कैक जुन्या मशीदी पाडून तेथें घोड्यांचे तबेले केले. सरकारी कामकाजांत जातिभेद व धर्मभेद पाळण्यांत येत होते ते सर्व त्यानें मोडून टाकले. सकाळीं, दुपारीं, संध्याकाळीं व मध्यरात्रीं तो सूर्याची उपासना करी. वर्षांतून एक वेळ नवीन अग्नि पाडून तो त्याची पूजा करी. आपल्याला ईश्वरी अंश असें समजून लोकांनीं भजावें अशी त्याची इच्छा होती. लोकांस अपूर्व चमत्कार करून दाखविण्याची त्याला फार आवड असे. रोग बरे होण्यासाठीं तो रोगी लोकांना आपल्या पायांचें तीर्थोदक देत असे. मुलें होण्यासाठीं पुष्कळ बायका त्याला नवस करीत. त्यांच्या इच्छा तृप्त झाल्या ह्मणजे त्या त्याजकडे नवस फेडण्यास मुद्दाम जात, तेव्हां त्यांनीं अर्पण केलेल्या वस्तूंचा तो मोठ्या आदरानें स्वीकार करी. त्याच्या दर्शनासाठीं वाड्यापुढें पुष्कळ लोकांची गर्दी होत असे. लोकांस दर्शनाचा लाभ देण्यासाठीं पहिल्या मजल्याच्या खिडकींत बसण्याची त्यानें एक जागा तयार केली होती. तेथें तो दररोज जाऊन बसला ह्मणजे लोक खालीं उभे राहून त्याला देवाप्रमाणें वंदन करीत.

त्याच्या राज्यांत गोहत्त्या व गोमांसभक्षण कोणीं करूं नये, असा त्यानें जाहीरनामा फिरविला होता. दाढ्या राखणें व चुलत वहिणीशीं लग्न करणें या चाली त्यानें बंद केल्या. सन १५८३ सालापासून तो हिंदू लोकांप्रमाणें कपाळाला गंध लावूं लागला. डुकर व कुत्रें या जनावरांस अपवित्र मानूं नये असा त्यानें हुकूम सोडला.

नवीन धर्माच्या अनुयायांत त्यानें १८ जणांचीं नांवें दाखल केलीं होतीं. त्यांत राजा बिरबल हा एकच हिंदू होता. नवीन धर्माच्या स्थापनेंत बिरबलाचें अंग विशेष होतें. सूर्योपासनेच्या संबंधानें राजा बिरबलानें अकबरशाहाची खातरी करून दिली असें ह्मणतात, ती अशी. शेतें, भातें, धान्यें, फळफळावळ, इत्यादि पदार्थ उत्पन्न होण्यास तेजाची अत्यंत जरूर असून सूर्यापासूनच अखिल विश्वाला प्रकाश मिळतो. सर्व ब्रह्मांडाला सूर्यापासूनच जीवनकला प्राप्त होते. तो सूर्यनारायण परमात्म्याचा प्रतिनिधी आहे, ह्मणून सर्व देवतांपेक्षां सूर्याची उपासना करणें अधिक आवश्यक आणि श्रेयस्कर आहे, असें त्याच्या मनांत राजा बिरबलानें बिंबवून दिलें होतें. तसेंच अग्नि, उदक, धेनु, वनस्पति, इत्यादि उपयुक्त सृष्ट पदार्थांच्या अंगीं ईश्वरी अंश अधिक असतो, ही कल्पनाही त्याच्या मनांत त्यानेंच भरून दिली होती.

सूर्य, अग्नि व उदक, यांचें महत्व आमचे समर्थ रामदासस्वामी यांनीं असें वर्णन केलें आहे:—

## सूर्य.

'नाना योग नाना मतें । पाहों जातां असंख्यातें ।
जाती आपुलाल्या पंथें । सूर्यउदय झालिया ॥ १ ॥
प्रापंचिक अथवा पारमार्थिक । कार्य करणें कोणी एक ।
दिवसेंविण निरर्थक । सार्थक नव्हे ॥ २ ॥

सूर्याचें अधिष्ठान डोळे । डोळे नसतां सर्व आंधळे ।
याकारणें कांहींच न चले । सूर्याविण ॥ ३ ॥
ह्मणाल अंध कवित्वें करिती । तरी हेही सूर्याचीच गती ।
थंड झालिया आपुली मती । मग मतिप्रकाश कैंचा ॥ ४ ॥
उष्ण प्रकाश तो सूर्याचा । शीत प्रकाश तो चंद्राचा ।
उष्णत्व नसतां देहाचा । घात होतो ॥ ५ ॥
जितुके संसाराशीं आले । तितुके सूर्याखालीं वर्तले ।
अंतीं देह त्यागून गेले । प्रभाकरा देखतां ॥ ६ ॥
विश्वचक्षु हा भास्कर । ऐसें जाणती लहानथोर ।
याकारणें दिवाकर । श्रेष्ठाहून श्रेष्ठ ॥ ७ ॥
अपार नभमार्ग क्रमणें । ऐसेंच प्रत्यहीं येणें जाणें ।
या लोकोपकाराकारणें । आज्ञा समर्थाची ॥ ८ ॥
सूर्यापुढें आणिक दुसरें । कोण आणावें सामोरें ।
तेजोराशि निर्धारें । उपमेरहित ॥ ९ ॥
सकळ दोषांचा परिहार । करितां सूर्यास नमस्कार ।
स्फूर्ति वाढे निरंतर । सूर्यदर्शन घेतां ॥ १० ॥

## अग्नि.

अग्निकरितां सृष्टि चाले । अग्निकरितां लोक धाले ।
अग्निकरितां सकळ झाले । लहान थोर ॥ १ ॥
पोटामध्यें जठराग्नी । तेणें क्षुधा लागे जनीं ।
अग्निकरितां भोजनीं । रुचि येते ॥ २ ॥
अग्नीनें आळलें भूमंडळ । लोकांस रहावया झालें स्थळ ।
दीप दीपिका नाना ज्वाळ । जेथें तेथें ॥ ३ ॥
अग्नि सर्वांगीं व्यापक । उष्णें राहे कोणी एक ।
उष्ण नसतां सकळ लोक । मरोन जाती ॥ ४ ॥
आधीं अग्नी मंद होतो । पुढें प्राणी तो नासतो ।
ऐसा हा अनुभव येतो । प्राणिमात्रासी ॥ ५ ॥
असतां अग्नीचें बळ । शत्रु जिंके तात्काळ ।
अग्नि आहे तावत्काळ । जिणें आहे ॥ ६ ॥

नाना रस निर्माण झाले । अग्निकरितां निपजले ।
महा रोगी आरोग्य झाले । निमिषमात्रें ॥ ७ ॥
अंत्यजगृहींचा अग्नि आणिला । त्यास दोष नाहीं बोलिला ।
सकळांगृहीं पवित्र झाला । वैश्वानरू ॥ ८ ॥
नाना लोक रोगी होती । उष्ण औषधें सेविती ।
तेणें लोक आरोग्य होती । वन्हिकरितां ॥ ९ ॥
जीत असतां सुखी करी । मेल्या प्रेत भस्म करी ।
सर्वभक्षक त्याची थोरी । काय ह्मणोन सांगावी ॥ १० ॥

## उदक.

आतां सकळांचें जन्मस्थान । सकळ जीवांचें जीवन ।
जयास आपोनारायण । ऐसें बोलिजें ॥ १ ॥
पृथ्वीस आधार आवरणोदक । सप्तसिंधूंचें शुद्धोदक ।
नाना मेघांचें मेघोदक । भूमंडळीं चालिलें ॥ २ ॥
नाना तीर्थांचीं पुण्योदकें । नाना स्थळोस्थळीं शीतळोदकें ।
तैशींच नाना उष्णोदकें । ठायीं ठायीं ॥ ३ ॥
नाना वल्लींमध्यें जीवन । नाना फळीं फूलीं जीवन ।
नाना कंदीं मूळीं जीवन । गुणकारक ॥ ४ ॥
उदकाचे देह केवळ । उदकाचेंच भूमंडळ ।
चंद्रमंडळ सूर्यमंडळ । उदकाकरितां ॥ ५ ॥
जें जें बीजीं मिश्रित झालें । तो तो स्वाद घेऊनि उठिलें ।
उंसामध्यें गोडीस आलें । परम सुंदर ॥ ६ ॥
उदकाचा बांधा हें शरीर । उदकचि पाहिजे तदनंतर ।
उदकाचा उत्पत्तिविस्तार । किती ह्मणोनि सांगावा ॥ ७ ॥
उदक तारक, उदक मारक । उदक नाना सुखदायक ।
पहातां उदकाचा विवेक । अलौकिक आहे ॥ ८ ॥
पृथ्वीतळीं पाणी भरलें । पृथ्वीमध्यें पाणी खेळे ।
पृथ्वीवरी प्रगटलें । उदंड पाणी ॥ ९ ॥
तीर्थें एकाहून एक । महा पवित्र पुण्यदायक ।
अगाध महिमा शास्त्रकारक । बोलोन गेले ॥ १० ॥

किती मार्मिक वर्णन! केवढी तात्कालिक स्फुर्ति! यांत ओढून आणलेलें चंद्रबळ कांहींतरी आहे का? असो.

अकबरशाहा कोमल अंतःकरणाचा व अत्यंत कनवाळू होता. त्याची आकृति फार उंच नव्हती व फार र्‍हस्वही नव्हती. त्याची छाती रुंद असून तो आजानुबाहु होता. एकंदरीनें त्याचा बांधा फार सुबक आणि सुंदर होता. वर्ण साधारण गोरा होता. त्याचें अंगबळ विलक्षण असून धैर्य अप्रतिम होतें. एका प्रसंगीं हत्तीनें माहुताला ठार मारलें असतां, तो हत्तीच्या पाठीवर उडी मारून बसला व त्याला त्यानें अंकुशानें ताळ्यावर आणिलें! तो दूरदूरच्या मजला अतिशय जलद चालणाऱ्या सांडणींवर बसून करी. त्यानें डांक पोंचविण्यासाठीं दरसहा मैलांवर सांडणी स्वारांच्या चौक्या बसविल्या होत्या. त्याचे खासगी बसावयाचे घोडे बारा हजार होते. त्याची एक 'संग्राम' नांवाची आवडती बंदूक होती. त्याच बंदुकीनें किल्लेदार बसंतसिंग याला त्यानें ठार मारल्याचें वर्तमान वर येऊन गेलें आहे. त्या त्याच्या बंदुकीनें प्रसंगोपात्त शेंकडों माणसांचे बळी घेतले होते.

अकबरशाहाच्या स्वारीचा व दरबाराचा थाट आणि डौल फारच वर्णनीय असे. त्याच्या स्वारीबरोबर हजारों हत्ती चालत. त्यांच्या गंडस्थळांना ढाला, सोंडांना तलवारी, व दातांना कट्यारी बांधलेल्या असत. प्रत्येक हत्तीवर चारचार तिरंदाज व बंदुकवाले असत. स्वारीचा असा डामडौल असे, तरी त्याचा स्वतःचा साधेपणा फार असे. लोकांस ताबडतोब न्याय देण्याकडे त्याचा कल असे. ज्या शहरांत त्याचा मुकाम असे, तेथील सर्व खटले तो स्वतः पाहून त्यांचा निकाल करी. फांशीं देणें, किंवा सुळावर चढविणें, या शिक्षा त्याच्या मंजुरीशिवाय अमलांत येत नसत. त्यानें तीन वार उच्चार केल्या-

शिवाय कडक शिक्षा अमलांत येत नसत. त्याच्या दरबारांत पाहिजे त्या मनुष्याला जाण्याची मोकळीक असे. त्याजपाशीं मोठमोठे बारा विद्वान् पंडित हमेषा बसलेले असत. कसाही मनुष्य त्याजकडे भेटीस जावो, त्याजवर आपली छाप बसविल्याशिवाय तो रहात नसे. सामान्य लोकांशीं तो फारच ममताळूपणें वागे. सरदार आणि बडे लोक त्याच्यापुढें चळचळां कांपत. अंतःकरणाची मृदुता आणि कठोरता हे दोन्ही गुण त्याच्या स्वभावांत होते. तोफा ओतविणें व बंदुका तयार करण्याचें काम तो स्वतःच्या देखरेखीखालीं करवी. कुस्ती, कसरत, जनावरांच्या टकरा, साठमाऱ्या, वगैरे खेळ पहाण्याची त्याला फार हौस असे. त्याला शिकारीचाही नाद फार असे. खेळ चालतांना सुद्धां तो मधून मधून दरबारचीं कामें करीत असे. तो मांसान्न विशेष खात नसे. दूधभात व मेवामिठाई यांवर त्याची विशेष भक्ति असे. त्याची पाचनशक्ति फार तीव्र असे. मांसाहाराविषयीं तो ह्मणे कीं, 'परमेश्वरानें मनुष्यासाठीं नाना प्रकारचे भक्ष्य पदार्थ पृथ्वीवर उत्पन्न केले असून इतर प्राण्यांचा जीव घेऊन खादाड मनुष्यप्राणी आपल्या सुंदर पोटांत त्याची भरती करतो, हें केवढें अज्ञान आहे! मी राजा झालों नसतों तर मांसाला कधींही शिवलों नसतों, तरी तें हळू हळू सोडून देण्याचा माझा विचार आहे.' तो रात्रीं तीन तासांपेक्षां जास्त झोंप घेत नसे. तो दिवसाही क्वचितच निजे.

नाना प्रकारचीं सुवासिक फुलें व सुवासिक अत्तरें यांची त्याला फार आवड असे. त्याच्या निजण्याचे व बसण्याचे सर्व दिवाणखाने, चंदनकाष्ठें, अगरु, ऊद, लोभाण, वगैरे पदार्थ जाळून त्यांच्या सुवासिक धुरानें घमघमत असत. फुलें व अत्तरें यांच्याविषयीं त्यानें एक लेखी पुस्तकही तयार केलें होतें.

# भाग अकरावा.

## समारोप.

सर्व मोंगल बादशाहांमध्यें अकबर बादशाहाच्या तोडीचा एकही बादशाहा झाला नाहीं. किंबहुना सर्व भूमंडलावर कोणच्याही राष्ट्रांत असा सर्वमान्य, दुर्बलांचा कैवारी, सत्पक्षाचा अभिमानी, आणि धीरोदात्त पुरुषांत अग्रणी राजा झाला नाहीं. पानपतची पहिली लढाई झाल्यानंतर हें हिंदुस्तानचें प्रचंड राष्ट्र त्याच्या हातीं आलें. त्या वेळेस तो फक्त १४ वर्षांचा लहान मुलगा होता. संकटें व विघ्नें यांतच तो लहानाचा मोठा झाला. त्याचीं लहानमोठीं फारशी, इंग्रजी व मराठी चरित्रें झालीं आहेत, तीं वाचून पाहावीं ह्मणजे त्याचा साद्यंत इतिहास कळेल. त्याचें बालपणचें संक्षिप्त वर्णन आह्मीं प्रथमारंभींच दिल्हें आहे. आतां गोळाबेरजेनें त्याची थोडीशी हकिकत देऊन पुस्तकाचा समारोप करूं.

सर्व हिंदुस्तान देशांत एकछत्री राज्य करण्याचा त्याचा मानस होता, आणि तो हेतु प्रजेच्या मदतीनें सिद्धीस न्यावा असा त्याचा उद्देश होता. आपल्या शत्रूंना अगदीं निराश न करतां त्यांचा थोडाबहुत मानमरातब, उत्पन्न व योग्यता कायम ठेवून त्यांना आपलेसे करून घेण्याचें तत्व त्याला कळलें होतें.

त्याचें सर्वांशीं समतेचें प्रांजल वर्तन असे. त्याचीं वर्तनतत्वें फार प्रौढ व उदार असत. हिंदू, बौद्ध, मुसलमान, पारशी, किंवा खिस्ती या सर्वांना तो सारखेपणानें वागवी. त्याच्या कृपा-

छत्राखालीं सर्व पंथांचे व सर्व धर्मांचे लोक मोठ्या सुखानें नांदत होते.

त्याचा मुसलमानी धर्मांत जन्म झाला होता, तरी त्याचें मन उपजतच चौकस व चिकित्सक होतें. मुसलमान राजा असला ह्मणजे तो सर्व मानवजातीला उत्तम गति देणारा होय, असा त्याचा समज नव्हता. निरनिराळीं धर्ममतें व धर्मपंथ यांचा तों जों जों आंत शिरून विचार करूं लागला, तों तों त्याच्या मनांत अधिकाधिक उजेड पडत गेला. सर्व धर्मांच्या ग्रंथांचा त्यानें संग्रह केला होता. ते वाचून पाहून 'सर्व धर्मांच्या लोकांमध्यें शाहाणे, सारासार विचार करणारे व अलौलिक सामर्थ्य अंगीं असणारे पुरुष असतात, थोडथोडें ज्ञान प्रत्येक धर्मांत मिळण्यासारखें असतां ज्या धर्माला प्रचारांत येऊन पुरीं हजार वर्षेंही झालीं नाहींत, असा नवीन मुसलमानी धर्मच काय तो सत्य आहे, असें कां मानावें? तसेंच एका पंथानें खरी मानलेली गोष्ट दुसऱ्यानें खोटी कां ह्मणावी? व एकाला पूर्णश्रेष्ठता नसून त्यानें इतर धर्मांहून आपला धर्मच श्रेष्ठ आहे, असा डौल कां मिरवावा?' असें तो ह्मणे.

ब्रह्मज्ञान हेंच हिंदू, बौद्ध, पारशी, ख्रिस्ती व महंमदी धर्मांचें मूळ आहे; पण, कालावधीनें व मतभेदानें त्याचीं निरनिराळीं रूपें होऊन अनेक धर्म प्रसवले. अध्यात्मज्ञान हें प्रत्येक धर्माचें सार असून खऱ्या धर्माचे मूळ हेतु तीन आहेत, असें त्यानें ठरविलें होतें; ते हेतु येणेंप्रमाणें:—

(अ) तमाम प्राणिमात्रावर बंधुवत् प्रीति करणें.

(ब) प्रत्येक धर्माचीं धर्मशास्त्रें वाचून त्यांचें सार काढणें.

(क) मनुष्याच्या अंगभूत ज्या ईश्वराच्या शक्ति आहेत त्या योगाभ्यासानें समजून घेणें.

यांपैकीं (ब व क)चें अध्ययन शक्त्यनुसार पाहिजे असल्यास करावें; परंतु, (अ) हेतु मात्र सर्वांनीं अवश्यमेव पाळावा. बंधुवत् प्रीति ह्मणजे सर्वांनीं खाणेंपिणें एकत्र करून वर्णसंकर करावा असा त्याचा अर्थ नाहीं. बंधुवत् ह्मणजे बंधूसारखी प्रीति करावी, हाच या शब्दाचा ध्वनित अर्थ आहे. ती बंधुप्रीति तर्कानें अध्यात्मिक विषयापुरतीच असावी. काल, देश, वर्तमान याला अनुसरून सामाजिक व्यवस्था असली तरी बंधुप्रीतीला बाध येत नाहीं. प्रत्येक कुटुंबामध्यें स्थितिवैचित्र्य असलें तरी कुटुंबांतील सर्व माणसें परस्परांशीं प्रेमभावानें राहतात, तसेंच समाजव्यवस्थेमध्येंही सर्वसाधारण केंद्र एकच असलें पाहिजे. कोणत्याही धर्मांत राहून कोणतेही विधि करा; पण, सर्वांचा मोक्षमार्ग एकाच पायावर रचलेला असला पाहिजे. त्या मोक्षमार्गाकडे वळून परमेश्वराची कृपा संपादन करावी, असें त्याचें मत होतें.

आपल्या व आपल्या फौजेच्या स्वाऱ्यांमुळें जमीनदार व शेतकरी लोकांचें नुकसान न होऊं देण्याकडे त्याचें लक्ष असे. आपल्या छावणीच्या तळाची जागा पसंत झाली ह्मणजे आसपासच्या पिकाला नुकसान न पोंचावें ह्मणून तो छावणीभोंवतीं पाहरेकरी ठेवी. स्वारीचा, किंवा लष्कराचा तळ उठतांना शेतकऱ्यांस झालेली नुकसानी पंचमार्फत अंदाज करून वसुलाच्या आंकड्यांत मजुरा देत असत. ही वहिवाट सर्व स्वाऱ्यांत त्यानें जारी ठेविली होती. केव्हां केव्हां तर नुकसानीचा पैसा तेथच्यातेथें थैल्या सोडून देऊन टाकीत; यामुळें, जमीन वाहणारांला त्याच्या लढाया व स्वाऱ्या यांपासून पीडा होत नसे.

शत्रूचीं बायकामुलें व आश्रित कैद करून त्यांना जबरदस्तीनें विकण्याची, किंवा आपल्या घरीं गुलाम करून ठेवण्याची परंपरागत चाल होती, ती त्यानें अगदीं बंद करून टाकली. नवऱ्यानें

वाईट काम केलें तर त्यांत बायकोचा काय दोष, किंवा बापानें वंड केलें तर त्याच्या मुलांला प्रायश्चित्त काय ह्मणून? असें तो ह्मणे.

त्याचें असें ह्मणणें असे कीं, प्रत्येक धर्मांत कांहींनाकांहीं चांगलें असावयाचेंच. चांगलें असेल त्याचा स्वीकार करा आणि वाईटाचा त्याग करा.

अकबरशाहानें आपल्या राजवाड्यापुढें एक मोठी घंटा टांगून ठेविली होती. तिची सांखळी बाहेर देवडीवर नेऊन सोडली होती. ती ओढली ह्मणजे बादशाहाकडे लागलीच दाद लागे.

त्यानें पुष्कळ खर्च करून भागीरथीच्या उगमाचा शोध लावला होता.

पृथ्वीवर परमेश्वराव्यतिरिक्त सद्गुणाचा पुतळा कोणी नाहीं. कोणाचें चित्र असो, वा चरित्र असो, तें निर्दोष कधीं सांपडावयाचें नाहीं. कितीही मार्मिक चित्रकार असो, त्याच्या चित्रांत दोष हा असावयाचाच. तसेंच कोणाचें कितीही चांगलें चरित्र असो, त्यांत चरित्रनायकाचे थोडेबहुत तरी दुर्गुण असावयाचेच. मात्र दुर्गुणांपेक्षां गुणांची संख्या अधिक असली ह्मणजे तें चित्र किंवा चरित्र चांगलें समजावयाचें. अकबरशाहाच्या अंगीं दुर्गुण मुळींच नव्हते असें नाहीं. प्रथम प्रथम, त्याच्या हातून अत्यंत क्रूर कर्मे घडलीं. एकदां क्षुल्लक अपराधावरून दिवाबत्ती करणाराचा त्यानें कडेलोट करविला. पाहरेकरी कामांत चुकला तर त्याला चाबकाचा मार देई. त्यानें आपल्या कारकीर्दीच्या अठराव्या वर्षी दोन हजार लोकांचीं सपासप डोकीं उडविलीं; पण, हीं सर्व अमानुष कृत्यें त्याजकडून पूर्ववयांत घडलीं. पुढें शेख अबूफजल[1]ची गांठ पडल्यावर त्याची वर्तणूक

---

१ शेख अबूफजल हा महाविख्यात मुसलमान पंडित होऊन गेला.

हळू हळू सुधरत गेली. पूर्ववयांत त्याच्या हातून पुष्कळ अक्षम्य आचरण घडलें, तरी पुढें त्याजकडून प्रजाहिताच्या पुष्कळच गोष्टी घडल्या.

त्यानें आपल्या कारकीर्दींत चितारी लोकांस बक्षिसें देऊन चित्रकलेला चांगलें उत्तेजन दिलें. त्याचें ह्मणणें असें असे कीं, चित्रकाराच्या अंगीं परमेश्वरास ओळखण्याची विशेष शक्ति असते. त्यानें हुबेहूब चित्र काढलें ह्मणजे त्यांत जीव घालण्याचें सामर्थ्य मात्र त्याच्या अंगीं नसतें. ती शक्ति परमेश्वरानें आपल्या हातीं ठेविली आहे; त्यामुळें, मनुष्याला आपला उणेपणा आणि परमेश्वराची थोरवी व अचिंत्य शक्ति हीं आपल्या डोळ्यांपुढें उभीं राहतात.

तो गायनविद्येचाही चांगला भोक्ता होता. त्या कलेची त्याला उत्तम माहिती होती. या गायन[1]लुब्धतेच्या पायीं या चितूरगडच्या

---

अकबरशाहाची एवढी दिगंत कीर्त्ति होण्यास पुष्कळ अंशीं तो व त्याचा बंधु शेख फैजी हे कारण झाले. अकबरशाहाच्या बाणापेक्षां अबूफजलच्या लेखणीचा दरारा लोकांना फार असे. त्याची लिहिण्याची शैली मोठी मर्मभेदक व मोहक होती. तो चोख, निस्पृह, निर्मल व उदार स्वभावाचा मुत्सद्दी होता. राज्याचीं बहुतेक कामें त्याच्या सल्लामसलतीनें चालत होतीं. त्या दोघां बंधूंनीं त्याच्या धर्मविचारास चांगलें वळण लावून दिल्हें.

१ अकबरशाहाच्या पदरीं एकंदर उत्तम उत्तम ३६ गवई होते. त्यांपैकीं सहाजण ग्वालेरीकडचे राहणारे होते. ते सर्व हिंदू होते, ते येणेंप्रमाणें:—

१ तानसेन, २ सुभान, ३ मीनचांद, ४ बाबारामदास, ५ श्रीज्ञान, विचित्र. सुभान आणि विचित्र भाऊ भाऊ होते. तानसेनाला तानतरंग, मानतरंग आणि बिलास, असे तिघे पुत्र होते. बिलासाचा लालखान हा जांवई होता. त्याला शाहाजहानानें 'गुणसमुद्र' असा किताब दिला होता. बाबा-

वेळ्याच्या वेळीं त्याच्या प्राणांवर कशी बेतली होती, हें वाचकांस पूर्वींच कळलें आहे.

अकबरशाहाची शक्ति क्षीण होत चालली, तेव्हां सर्व अमीर-उमरावांस एक दिवस आपल्या जवळ पाचारण करून त्यानें सर्वांचा शांतपणें निरोप घेतला. माझ्या हातून कधीं कोणाचा अपराध घडला असल्यास त्यानें मला क्षमा करावी, असें मागून घेतलें. शेवटीं त्यानें आपला मुलगा जाहांगीरशाहा याला जवळ बोलावून बोध केला कीं, 'तू कुटुंबांतील मनुष्यांचा, माझ्या मित्रांचा, आणि आश्रित मंडळीचा माझ्यामागें चांगला परामर्ष घेत जा. ज्यांनीं मला एवढी कीर्त्ति मिळवून दिली त्यांशीं तू कधींही वैरभाव धरूं नको. मोठ्या पहांटेस उठून आज काय काय कर्तव्य आहे याचा विचार करीत जा.' इतकें सांगून तो १३ अक्टंबर सन १६०५ या वर्षीं आग्रा एथें मरण पावला. त्या वेळीं त्याचें वय ६३ वर्षांचें होतें. आग्र्यापासून ४ मैलांवर सिकंदरा एथें त्याला मूठमाती दिली. त्या ठिकाणीं पुढें जाहांगीरशाहानें एक सुंदर कबर बांधविली, ती अद्यापि पाहण्यालायक आहे.

## समाप्त.

---

रामदासाचा सुरदास या नांवाचा मुलगा होता. (अमृतबझारपत्रिका, ता० ५ सप्तंबर १८९८.)

१. आग्रा एथें त्यानें एक लाल दगडाचा सुंदर किल्ला बांधविला. पूर्वीं तेथें एक फुटकीतुटकी वीटबंदी ओबडधोबड गढी होती. त्या मजबूत व भव्य किल्ल्याचें काम पुरें होण्यास ८ वर्षें लागलीं, व ३५ लक्ष रुपये खर्च लागला. त्याचा पाया पाणी लागेपर्यंत खोल खणला होता. त्याचें जोडकाम फार सुंदर आहे. प्रत्येक जोडांत लोखंडी कड्या बसविल्या आहेत. हा किल्ला इ. सन १८९२ सालीं आमच्या प्रत्यक्ष पाहण्यांत आला आहे.

# विक्रीस तयार.

आनंदराव—एक उपदेशपर गोष्ट. ... ...

[illegible]आहाम लिंकन यांचें चरित्र—याचे नऊ भाग आहेत. स्वदेशाच्या व स्वदेशबांधवांच्या उपयोगीं कसें पडावें हें ज्याच्या वाचनापासून स्पष्टपणें कळेल असें हें पुस्तक आहे. छापई बाइंडिंग. .

[illegible]हा[illegible] गोष्टी व [illegible]युक्त माहिती—भा[illegible] [illegible]शाईतील व मराठेशाईतील प्रसि[illegible] गोष्टीवरून ही माहिती दिली आहे. यांत आले[illegible] ऐतिहासिक माहिती फारच अपूर्व व इतर साधार[illegible] इतिहासग्रंथांत न मिळणारी अशी आहे. ग्रंथार[illegible] ग्रंथकार लोकहितवादी यांचें चित्र घातलें आहे.

ऐतिहासिक गोष्टी व उपयुक्त माहिती—भा[illegible] २ रा. ... .. .. ... ...

छत्रपति संभाजीमहाराज.—अथवा "राजाचे [illegible] एकमेराजाला भोंवतें आणि प्रजेलाही भोंवतें." या[illegible] अविचारी थोर पुरुषांस कसकशीं दुःखें भोगा[illegible] [illegible] त्याचें विवेचन सुरेख रीतीनें केलें आहे[illegible]

[illegible]अश्रुमार्जन—[illegible] [illegible] मनुष्यांस प्राप्त होतात[illegible] त्या प्रसंग[illegible] त्याच्या अंतःकरणाचें सांत्वन करण्यास हें पुस्त[illegible] फार उपयोगीं आहे. अवश्य संग्रहीं असावें. ..

नशीब आणि उद्योग—पन्नास रुपये बक्षिसा[illegible] जाहिरात दिल्याप्रमाणें आठ[illegible] निबंधांतून प[illegible] ठरलेला उद्योगप्रधान निबंध ... .

ही पुस्तकें मुंबईंत निर्णयसागर छापखान्यांत वि[illegible]

संग्रहालय क्रमांक
पुस्तकाचे नांव